गांधीवादाचे खरे मारेकरी कोण?

## गोडसे की यशवंतराव


-पन्नालाल सुराणा

# माणूस

८ ऑक्टोबर १९७७ * १। रुपया

## यशवंतराव कमी पडले ते त्यांच्या सैद्धांतिक अपयशामुळे

--अनंतराव भालेराव



## इतिहासाचे पान: भोवऱ्यात सापडलेले

- दीर्घस्मृती विश्वनाथ

# एक भाकीत ! १९६६

' आक्रमक ' यशवंतरावजी एक तपापेक्षा अधिक काळ भारताच्या राजधानीमध्ये ' तळ ' ठोकून बसलेले असले तरी अद्याप ' बचावात्मक ' भूमिका घेऊनच ' दबकत दबकत ' ( काही अंशी बिचकत बिचकतच ) का वावरताना दिसतात, असे कोडे अनेकांना, ज्यात अनेक अमराठीभाषी पण समाविष्ट आहेत, पडत असते !

या सुमारे पंधरा वर्षांत, विशेषतः गेल्या अकरा वर्षांत, प्रंतप्रधानपदी श्री. यशवंतरावजी लौकरच आरूढ होतील, असे अनेकाना रास्तपणी वाटूनही हे न घडल्याने वर उल्लेख केलेले कोडे अधिकच गुंतागुंतीचे झाल्यागत सर्वांना वाटू लागले आहे. ( या संदर्भात एक संभाव्यता नाकारता येऊ नये अशी अवस्था असल्याचेही बऱ्याचशा मंडळींना ज्ञात आहे व ही संभाव्यता म्हणजे खुद्द श्री. यशवंतरावजीना पण राजधानीतील त्यांची सध्याची अवस्था हे एक कोडेच वाटू लागण्याची शक्यता ! अशी मोठी चमत्कारिक वस्तुस्थिती आहे. )

का कोणास ठाऊक पण १९६६ सालच्या जानेवारी महिन्यात त्या वेळचे पंतप्रधान श्री. लालबहादूर शास्त्रीजी यांच्या निधनानंतर राजधानीतील एका अनौपचारिक चर्चेच्या ओघात त्या वेळचे जनसंघीय खासदार श्री. उत्तमरावजी पाटील यांनी काढलेले सहजस्फूर्त उद्गार आजच्या घटकेला अगदी ( राजकीय ) भविष्यवाणीसमान वाटू लागलेले आहेत. यापूर्वी श्री. चव्हाणांच्या ' ६० ' व्या वाढदिवशी या ऐतिहासिक उद्गारांचे स्मरण झाले होते; पण त्यापेक्षा सद्य.स्थितीतील संदर्भात ते विशेष संस्मरणीय झालेले आहेत.

त्या वेळी श्री. उत्तमरावजी म्हणाले होते की, ' काँग्रेस पक्ष सत्तास्थानी असेपर्यंत या गृहस्थाला ( यशवंतरावजीना ) पंतप्रधानपदी येण्याचा योग कदापी येण्याची शक्यता नाही ! ' आणखीही बरेच श्री. उत्तमरावजीनी त्या वेळी सागितले होते, परंतु त्यातील मुख्य व अर्थपूर्ण आशय आज आठवला म्हणजे आश्चर्य वाटू लागते. कारण त्या काळचे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् श्री. यशवंतरावजीना ' अविवादास्पद व्यक्ती ' ( नॉन कॉन्ट्राव्हर्शियल व्यक्ती ) म्हणत असत व श्री. उत्तमरावजीना हे सर्व ज्ञात असूनही त्यांनी वरील परखड अभिप्राय ( अगदी भविष्यवाणीसमान ) प्रकट केलेला होता !

क्रिकेटच्या परिभाषेत या सर्व वस्तुस्थितीचे विश्लेषण करताना काही वर्षांपूर्वी मी स्वत.च असे लिहिले होते, की हा सारा दैवदुर्विलास व परिपाक ' अतिसावध राहून खेळण्याचा ' ( प्लेइग सेफ ) आहे ! काँग्रेस पक्षाच्या दृष्टीने ते ' संथ पण दमदार ' ( स्लो बट स्टेडी ) खेळाडू असले तरी धावा काढण्याचे दृष्टीने ( स्कोअरिंग ) मात्र ते ' अविश्वासू ' ( अनरिलाएबल ) असे खेळाडू आहेत ! आपण ' एल्. बी. डब्ल्यू. ' ( पायाला चेंडू लागून बाद होणे ) तर होणार नाही ना, अशा भयग्रस्त व चिंतित मनाने खेळणाऱ्या खेळाडूचे राजकीय क्षेत्रातले प्रतीक म्हणजे श्री. चव्हाण आहेत, असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरू नये !

राजकीय क्षेत्रातला आजपर्यंतचा अनेकाचा अनुभव ( आणि इतिहास पण ) असाच आहे की ' झोकून दिल्याविना ' ( रिस्क घेतल्याविना ) या क्षेत्रात पुढे पाऊल पडणे, प्रगती साधणे, जवळजवळ अशक्यच असते. एके काळी रेलमंत्री श्री. लालबहादूर शास्त्रीजीनी रेलअपघात होताच त्यागपत्र देऊन सर्वांसमोर एक नवा आदर्श प्रस्थापित करून आपले आगळे व्यक्तिमत्त्व प्रकट केले होते. त्यानंतरच्या पंतप्रधान श्रीमती इंदिराजीनी तर श्री. यशवतरावजींसमोर आणखी एक नवाच आदर्श प्रस्थापित करून ठेवलेला आहे व तो म्हणजे एकूणच काँग्रेसचे सत्ताकारण हा एक सट्टयाचा खेळ असून त्यात ' धोका ' पत्करल्याविना पुढे जाताच येत नाही ! असे असूनही ' हिशोबी धोका ' ( कॅलक्युलेटेड रिस्क ) धोरण सोडण्यास वा त्या आपल्या धोरणात काही चुकले असे मानण्यास श्री. यशवंतरावजी तयारच नाहीत, असे राजधानीत अनेकांना वाटू लागले आहे. [ मलपृष्ठ १ वर ]

# साप्ताहिक माणूस

वर्ष सतरावे–अंक एकोणिसावा

८ ऑक्टोबर १९७७

मूल्य १·२५ पैसे



संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

□

वार्षिक वर्गणी :

चाळीस रुपये

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

□

दूरध्वनी : ४३४५९

□

मुखपृष्ठ : बाबू उडुपी

मुखपृष्ठ छायाचित्र : एम्. डी. शिंदे


# काँग्रेस आणि लोकशाहीचे भवितव्य

देशात लोकशाही राजवट टिकून राहण्यासाठी काँग्रेस वाचली किंवा वाचविली पाहिजे, हे खरे आहे का ?

काही विचारवंत या मताचे आहेत. यात प्रा. कुरुंदकरासारखे काँग्रेसविरोधक आहेत, तसेच तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यासारखे आजवर काँग्रेसला साथ देणारेही काहीजण आहेत.

गेल्या तीस वर्षांत केंद्रात काँग्रेसची एकछत्री सत्ता होती. प्रांतात वेगवेगळ्या प्रादेशिक किंवा भिन्न भिन्न विचारसरणीच्या पक्षाची सत्ता अपवाद म्हणूनच येतजात राहिली. केंद्रस्थानी असणारे विरोधी पक्ष नेहमीच नगण्य स्वरूपात वावरले. काँग्रेसचा याप्रमाणे एकछत्री अंमल असूनही या तीस वर्षांच्या काळात देशात लोकशाही राजवट होती असे सर्वसाधारणपणे मानले जाते. इंदिरा गांधींनी शेवटच्या ४-५ वर्षांत ही २५-३० वर्षांची लोकशाही परंपरा तोडूनमोडून टाकली, म्हणून तर पुढचे सगळे रामायण घडले. जो न्याय या २५-३० वर्षांच्या काँग्रेसी कालखंडाला लावला जातो तो जनतापक्षाच्या राजवटीला का लावला जात नाही असा प्रश्न या 'लोकशाहीसाठी काँग्रेस वाचली पाहिजे' या मताचा पुरस्कार करणाऱ्या काँग्रेसी किंवा गैरकाँग्रेसी विचारवंतांना विचारण्यासारखा आहे. निदान काँग्रेसने टिकविली इतपत लोकशाही तरी दिल्लीतील एकपक्षीय जनताशासन टिकवून धरणार नाही, असे मानायला अद्यापपर्यंत कोणताही पुरावा पुढे आलेला नाही. आला असल्यास तो पुढे मांडूनच या विषयाची चर्चा व्हायला हवी; नाही तर हा केवळ एक शंकासमाधानाचा कार्यक्रम ठरेल; चर्चा संभवणार नाही !

दुसरे असे : केंद्रात आज जे जनताशासन आले आहे त्याचे स्वरूप पूर्वीच्या काँग्रेसपेक्षा मूलत. भिन्न नाही. ध्येयधोरणे फारशी बदलली गेलेली नाहीत. गांधी-नेहरूंचे आदर्श जनताशासनालाही मान्य आहेत. प्रमुख पदावर असलेले नेते तर पूर्वी काँग्रेसमध्येच होते, काँग्रेसपक्ष-शासनात त्यांनी महत्त्वाच्या पदांवर दीर्घकाळ कामही केलेले आहे. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री त्यामुळेच म्हणू शकतात की, दिल्लीत गेल्यावर काही बदल झालेला आहे असे जाणवतच नाही. पूर्वीच्या आपल्याच लोकांशी आपण बोलतो आहोत, वाटाघाटी करीत आहोत असे वाटते. जनतापक्षाच्या भवितव्याच्या दृष्टीने हे सारखेपण तितकेसे चांगले नाही हे खरे असले तरी निदान काँग्रेसपेक्षा ही नवी मंडळी लोकशाहीला वाईट दिवस आणणार नाहीत, एवढा विश्वास बाळगायला हे सारखेपण पुरेसे आहे.

यशवंतराव चव्हाण नेहमी म्हणत असतात की, काँग्रेसने त्यांना खूप दिले. हे खरेही आहे. तेव्हा त्यांनी किंवा ज्यांना काँग्रेसने काही दिले असेल, त्यांनी परतफेड म्हणून काँग्रेस वाचविण्याची धडपड करणे, हे त्यांचे किमान कर्तव्य ठरतेच. त्यांच्या धडपडीमुळे काँग्रेस वाचली किंवा न वाचली तरी कर्तव्यपूर्तीचे रास्त समाधान तरी त्यांना नक्कीच मिळविता येईल. पेशवाई कोलमडत असताना बापू गोखले लढत राहिले, एखाद-दुसऱ्या लढाईत जयही त्यांना मिळत होता. तरी पण पेशवाई काही ते सावरू शकले नाहीत. नाना फडणिसांचे चातुर्य, महादजी शिंद्यांची उत्तरेतील प्रतिष्ठा, याचाही फारसा उपयोग झाला नाही कारण दुही आणि स्वार्थ यामुळे पेशवाई आतूनच किडलेली-सडलेली होती. तरी पण हे बुडते जहाज न सोडता ज्यांनी ज्यांनी ते वाचविण्याचा अखेरपर्यंत प्रयत्न केला, त्यांच्यासाठी इतिहासात गौरवाचे शब्दच आहेत. निदान अशा गौरवाचे धनी होण्यासाठी, ज्यांना काँग्रेस वाचवायची असेल त्यांनी तसा प्रयत्न अवश्य करावा, नव्हे तो करणे त्यांचे किमान कर्तव्यच आहे; पण भारतात लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी काँग्रेस वाचविली पाहिजे वगैरे युक्तिवादात काही तथ्य नाही. तर्कतीर्थांनी आपल्या चालू अंकातील मुलाखतीत ठीकच म्हटले आहे की, स्वातंत्र्यप्रेमी नागरिकवर्ग हा लोकशाहीचा खरा मूलाधार आहे. हे स्वातंत्र्य जपणारे-विकसित करणारे व्यक्ती व समाजजीवन आपण कसे संघटित करतो, यावर येथील लोकशाहीचे भवितव्य अवलंबून आहे काँग्रेस वाचण्या न वाचण्यावर नाही.

आणि 'आक्रमक' वगैरे होऊन तर काँग्रेस कुणीच वाचवू शकणार नाही कारण दुही आणि स्वार्थ यामुळे आतूनच ती किडलेली-सडलेली आहे. नवीन ध्येयवादाचे खतपाणी तिला वेळेवर पुरविले गेले तरच ती या अधःपातातून वाचणे शक्य आहे. आज तरी हे बळ असणारा कोणी नेता, अनुयायीवर्ग काँग्रेसजवळ दिसत नाही. मूळच बिघडलेले आहे. फांद्यांची वरवर कापाकाप करून काय होणार ?

—संपादक

# मुक्ताफळे

## □ आचरट कुठला !

आमचा निवडणुकीवरील विश्वास उडाला आहे ! विश्वास उडाला तो आमचा पराभव झाला म्हणून नाही. निवडणूक म्हटली की कुणाचा तरी पराभव व्हायचाच अरे, पण कुणाला कुणी पाडायचे याला काही धरबद ! मध्यप्रदेशचे मुख्य मत्री श्यामाचरण शुक्ला घ्या केवढा देशभक्त ! केवढा थोर माणूस ! त्याच्या विरुद्ध कोण उभा ? तर अगावर कपडे नसलेला एक फाटका माणूस ! पवन दिवाण नावाचा. हा माणूस कमरेला नुसता पंचा नेसतो. गाधीजी खाद्यावरून उपवस्त्र तरी घेत. हा कमरेच्या वर नुसता उघडा बंब. पायात खडावा. दाढी छातीपर्यंत. केस मागे मानेवर वाढविलेले एखाद्या हिप्प्यासारखे. चागल्या वस्तीत म्हणजे डेक्कन जिमखान्यावर म्हणा, किंवा कॉलनीत म्हणा, दुपारच्या वेळी आला तर लफगा म्हणून लोक हाकलूनच देतील. पुराणे सांगणारा हा बैरागी राहिला उभा ‘राजीम’ मतदारसघातून श्यामाचरणांविरुद्ध आणि निवडून आला ! जवळ पैसे नसताना निवडून आला. ११००० मतानी श्यामाचरण पडले. अरे, ही काय निवडणूक आहे ! एक उघडा-नागडा माणूस श्यामाचरणांना पाडतो म्हणजे उघडावाघडा मनुष्य लोकानी पत्करावा इतके का श्यामाचरण नगे ठरले होते ? ही काय पद्धत झाली !

इदिराजीना पाडणारा तो राजनारायण. आचरट कुठला ! १९७१ च्या निवडणुकीत १,००,००० मतांनी इदिराजीनी याला पाडला. लगेच अलाहाबाद हायकोर्टात २४ एप्रिल १९७१ ला याने इदिराजीवर दावा लावला इंदिराजीनी निवडणुकीत गैरप्रकार केले. त्यांची निवडणूक रद्द करा. इंदिराजीना ३५,०००/– रुपये खर्च करण्याची परवानगी असताना त्यांनी १५ लाख रुपये खर्च केले ! धोतरे वाटली. घोंगड्या वाटल्या. सरकारी नोकर कामाला जुपले ! असे नाना आरोप होते. लोक म्हणाले, ‘वेडा दिसतोय झालं !’ अहो, इंदिराजी असं कस करतील ?’ सगळ्यानी याला वेड्यात काढला, पण याने खटला चालूच केला. कोर्टात इदिराजी हिरवी साडी नेसून साक्ष द्यायला आल्या, तर हा मुद्दाम डोक्याला हिरवी टापशी बाधून आला होता. आचरट कुठला !

चार वर्षांनी कोर्टाचा निकाल लागला. इंदिराजीची निवडणूक रद्द झाली. हा बरोबर ठरला. होतं अस कधी कधी ! तर शिक्षेची अंमलबजावणी व्हावी म्हणून हा राष्ट्रपतीच्या घरांसमोर धरणे धरून माडी ठोकून बसला. हा काय आचरटपणा !

देशावर असे घोर संकट आणणाऱ्या वेड्याला इदिराजीनी २६ जूनला पहाटे कैद करून टाकला तुरुगात ! पुढचा अनर्थ टळला.

तुरुंगातून सुटल्यावर पुनः याने इंदिराजीच्या वाटेस जाण्याचे काय हो कारण ? नेमका ‘रायबरेली’ मतदारसंघात इदिराजीच्या विरुद्ध पुन उभा राहिला इदिराजी तिकडे रायबरेलीत मतदारांना भेटत हो,या तर हा निवडणूक सोडून मुबईत आलेला. लोकाना सांगत होता–

‘मैं तो जीत गया हूँ !’

निवडणूक होण्याआधी असं सागून हा इदिराजीची थट्टा करीत होता. अस करतात थोर माणसाना ? आचरट कुठला !

२१ मार्चला हे माकड निवडून आले. इदिरा गाधीसारख्या, खानदानी, देशभक्त, थोर पतप्रधानाचा पराभव करून हा आचरट रायबरेलीतून निवडून आला ! लाख मतानी इदिराजी पडल्या ! निवडून आल्यावर इदिराजीना म्हणतो काय–

‘हायकोर्टाचा निकाल लाथाडून आम्हाला तुरुंगात टाकून काही काळ राज्य केलेत. आता हा जनताकोर्टाचा निर्णय कशा लाथाडता ते पाहतो !’

अरे, तू कोण ? इदिराजी कोण ? असे बोलतात थोर माणसांना ! आचरट कुठला!

लोक मत्री होण्यासाठी किती हपापलेले असतात ! कधी एकदा मत्री होतो असे सर्वांना झालेले असते. या माणसाला मोरारजीभाईंनी मत्री केले शपथ घेताना चागले सर्वांना पेढे वाटले आणि बाहेर येऊन म्हणतो–

‘मंत्रिपद ही मला बढती वाटत नाही. सन्माननीय जनसेवक होतो तो पगारी सेवक झालो. मला हे कमीपणाचे स्थान वाटते !’

कमीपणाचे वाटते तर पेढे का वाटलेस म्हणतो आम्ही ! पेढे वाटायचे आणि पुनः असे म्हणायचे ! आचरट कुठला !

या सर्व मर्कटलीला आम्ही शाप मानला असावा; पण परदेशात गेल्यावर तरी या माणसाने नीट वागावे की नाही ? त्याची अपेक्षा बी. के.नेहरू या लडनमधल्या आपल्या हायकमिशनरनी विमानतळावर स्वागता-साठी जावे. अरे, कुठला नेहरू घराण्याचा कुलदीपक असे करील ? नेहरू घराणे खालसा करणाऱ्या या माणसाला बी. के. नेहरू काय म्हणून भेटतील ? त्यानी हाताखालच्या माण-साला निरोप दिला की रात्री घरी जेवायला यायला साग ! राजनारायण यानी त्या निरोप्या अधिकाऱ्याला सांगितले–

‘ज्यांना मला भेटायला वेळ नाही त्याला मला भेटायची गरज नाही ! जेवायचे काय घेऊन बसलात ? मी तुमच्या लेकीकडेही जेवेन–’

हायकमिशनर बी. के. नेहरूना हा माणूस असा आडवा मारतो ! या बी. के. नेहरूंची आणीबाणीकाळातील लडनमधील तेजस्वी कामगिरी कोण विसरू शकेल ? पण जिथे तिथे भाडण ! आचरट कुठला !

इंग्रजीत बोलावे, इग्रजीत विचार करावा ’ ही एक दुष्ट खोड आहे असे जिचे वर्णन इतिहासाचार्य राजवाडे करतात व खत प्रदर्शित करतात, तशी इंग्रजी भाषेच्या स्वतंत्र भारतातील वर्चस्वाविषयीची खंत राज-नारायण यांनी इग्लडमध्ये व्यक्त केली. नेह-रूनी याबाबतीत संधी असून काही केले नाही हे स्पष्ट करताना राजनारायण म्हणाले–

‘भारतातून इग्रज निघून गेल्यानंतरही भारतात इग्रजी भाषेचे वर्चस्व राहील असा गुप्त करारच नेहरू व ब्रिटिश सरकार याच्यात झाला असावा !’

करार गुप्त असला, अलिखित असला तर तो इतर कुणाला कळणार कसा ? पण अशी आपली एक बोलण्याची पद्धत असते; पण ही गोष्ट काय इग्लडमध्ये सागायची ? राज-वाड्यानी नाही आपली ग्रथातून सागितली; पण ग्रंथ लिहायला फुरसत कुठाय् ! असे परदेशात बोलू नये, आपलीच अब्रू जाते हे. या माणसाला कळत नाही ! आचरट कुठला !

९–९–७७ च्या ‘महाराष्ट्र टाइम्स’ मध्ये सपादकांनी या माणसावर काय फर्मास अग्र-लेख लिहिला आहे हो ! आमची तर हसता हसता पुरेवाट झाली ! राजनारायण हे ‘आच-रटाचार्य’ आहेत असे संपादकानी पुन पुन्हा म्हटले आहे ते अगदी बरोबर आहे हे आम्ही दिलेल्या या माणसाच्या कर्तृत्वआलेखावरून कुणाच्याही लक्षात येईल पु. ल देशपांडे यांची देखील या लेखाने ‘बऱ्यापैकी’ कर-मणूक झाली असे त्यानी मुद्दाम पत्र लिहून सपादकाना कळविले आहे ! आम्ही म्हणतो बऱ्यापैकी’ का ? ‘उत्तम’ म्हणायला काय झाल ?

एवढ्या आचरट, मूर्ख आणि फक्त माकड-चेष्टा करणाऱ्या माणसाने इदिराजीसारख्या गादीवरच्या पंतप्रधानाचा पराभव करावा याचा अर्थ मात्र फार भयंकर होतो ! इदि-राजी आणि त्याच्या गोतावळ्याने केलेल्या आचरटपणापेक्षा या माणसाचा आचरटपणा मतदारानी बरा म्हटला असा नाही का हो याचा अर्थ होत ?

म्हणूनच आमचा तर आता निवडणुकी-वरचा विश्वासच उडाला आहे ! सगळाच आचरटपणा आहे झाल !

– ज्ञानबा

# यशवंतराव आक्रमक पवित्रा घेतील म्हणजे जातीयवाद आणखी माजवतील ! दुसरं काय करणार ?

## अनंतराव भालेराव

शिरीष सहस्रबुद्धे
संजीव मंगरूळकर




माणूस प्रतिनिधी म्हणून शिरीष सहस्रबुद्धे व संजीव मंगरूळकर यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या नव्या 'आक्रमक' धोरणाच्या संदर्भात मराठवाड्याचा एक लहानसा दौरा केला. या दौऱ्यावर आधारित लेख व मुलाखती मागील अंकात (कृष्णा-कोयना अंक १) प्रसिद्ध झाल्या. जागेअभावी मराठवाडा दैनिकाचे संपादक श्री. अनंतराव भालेराव यांची ही मुलाखत मागील अंकात जाऊ शकली नाही.

मुलाखतीत प्रश्नोत्तरे सुरू होण्यापूर्वी श्री. अनंतराव यांनी परखडपणे प्रथमच आपली सर्वसाधारण भूमिका प्रतिनिधींना मोकळेपणाने सांगून टाकली. ते म्हणाले–

'यशवंतरावांशी माझा संबंध आला तो मुख्यतः संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीपासून. अर्थात फारसा जवळचा नव्हे; पण त्या वेळी त्यांचं दुटप्पी आणि संधिसाधू राजकारण स्पष्टपणे जाणवलं. एकाच वेळी संयुक्त महाराष्ट्राची मागणी आणि पंडित नेहरू या दोघांनाही पाठिंबा देत राहण्याची कसरत त्यांनी राजकीय स्वार्थासाठी केली. तेव्हापासूनच मी म्हणत आलो आहे, की यशवंतराव सावध राजकारणी आहेत. गाफीलपणाचा एकही क्षण त्यांच्या राजकीय आयुष्यात नाही ! त्यांच्या हातून चुका घडतात त्याही अतिसावधपणानं वागल्यामुळंच घडतात. दुर्लक्षामुळे किंवा आक्रमक स्वभावामुळे नव्हे. अशा सावध संधिसाधूपणापोटीच त्यांना अनेक विसंगतीही पदरी घ्याव्या लागल्या. त्यांनी द्विभाषिकही राबविलं आणि संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश आपणच आणल्याची बतावणी करून संयुक्त महाराष्ट्रही राबविला. अशाच मार्गांनी ते दोन दशकांहून अधिक काळ प्रत्यक्ष सत्तेवर राहिले आणि पस्तीस वर्षे राजकारणात टिकून राहिले. त्यांचं हे लौकिक यश निर्विवादपणे मानलं पाहिजे; पण नुसत्या दीर्घकाळाला महत्त्व किती द्यायचं ? आय्. ए. एस्. अधिकारीसुद्धा तितकीच वर्षे कारभार हाकतात. तेव्हा राजकारणाचा उद्देश सत्तेला चिकटून राहणं हाच मानला तर हे यश मोठं आहे; पण तो उद्देश जर लोककल्याण हा असेल तर त्यांचं यश मोठं नाही !

'यशवंतरावांच्या राजकारणाला चांगली बाजूही नाहीच असं नाही. नेहमी समाजाबरोबर राहणारा हा पुढारी आहे. महाराष्ट्रात तरी काँग्रेसमध्ये सगळ्या जातीजमातींना आणि सगळ्या वर्गांना (बुद्धिमंतांपासून शेतमजुरांपर्यंत) आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला. काँग्रेसअंतर्गत निरनिराळ्या पातळ्यांवर व्यापक नेतृत्वाचा पाया त्यांनी घातला. यशवंतराव कुशल संघटक आणि प्रशासक आहेत हेही खरं. महाराष्ट्रातल्या बहुजनसमाजाला फार काळानंतर मिळालेला हा नेता मोठा कर्तबगार आणि बुद्धिमान होता; पण व्यवहाराची चौकट मोडून झेप घेण्याची कुवत तो दाखवू शकला नाही. डॉ. आंबेडकर, म. फुले, विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील,

लो. टिळक या महाराष्ट्राच्या नेत्यांपेक्षा यशवंतराव कमी पडले ते त्यांच्या सैद्धांतिक अपयशामुळे ! यशवंतराव व्यवहारी राजकारणी आहेत; पण तत्त्वनिष्ठ नाहीत. कुठलेही तत्त्वज्ञान त्यांच्या नावे ओळखले जात नाही. तत्त्वज्ञान किंवा तत्त्वनिष्ठा हा त्यांच्या राजकारणाचा स्थायीभाव नव्हेच. सत्ता हा केंद्रबिंदू आहे. त्यामुळेच कॉंग्रेसअंतर्गत डाव्या व उजव्या शक्तींचा जो लढा झाला त्यात यशवंतराव कुठेही दिसले नाहीत. ते स्व.ला समाजवादी म्हणवितात पण समाजवादाच्या मूल्यांसाठी त्यांनी स्वत.ला झोकून देऊन काही घडवलं, असं कुठेही दिसत नाही. कोणत्याही आर्थिक, राजकीय किंवा सामाजिक विचाराचा त्यांनी हट्टाने पाठपुरावा केला नाही. सत्तेवर असेल त्याच्याबरोबर राहायचं, मग तत्त्वाची सेवा झाली तर झाली. तो उद्देश दुय्यम, त्याच्यासाठी कोणतीही जिद्द धरणं किंवा जोखीम पत्करणं नाही. कॉंग्रेसमधल्या आपल्या कारकीर्दीत पं. नेहरू, जयप्रकाश नारायण ही मंडळी सतत काही तत्त्वं आग्रहानं मांडत आली. तसा काही तात्त्विक आग्रह यशवंतरावांनी कधीच धरला नाही. त्यांनी फक्त कामचलाऊ आणि कातडीबचावू व्यवहारी राजकारण केलं !

'आर्थिक प्रश्नांच्या सोडवणुकीत यशवंतरावाची Contribution नक्की काय ? काही सांगता येईल ? माझ्या मते शून्य ! विखे पाटलांनी महाराष्ट्रात सहकारी चळवळीचा पाया घातला. वसंतदादा पाटलांनी ती वाढविली. यशवंतरावांनी स्वत. काही केलं नाही. आता हे नेते त्यांना गुरुस्थानी मानत असतील तर तेवढंच काय ते त्यांचं पैतृक धन. पण या सहकारी चळवळीसमोर त्यांनी काही तत्त्वज्ञान, काही सामाजिक आशय मांडलाय् असं झालं नाही. त्यामुळं ही चळवळ ग्रामीण भागातील शोषकाच्या हाती एक हत्यार म्हणून गेली आणि खेडोपाडी एक नवा धनवान शोषकवर्ग तयार झाला.

'केंद्रामध्ये गेल्यापासून यशवंतरावांनी चार मोठी खाती सांभाळली–संरक्षण, गृह, अर्थ आणि परराष्ट्र ! यांच्यापैकी एखाद्या तरी खात्यात त्यांनी खास स्वतःचे असे काय कर्तृत्व गाजविले ? त्यांनी फक्त खात्यांचे कामकाज चालू ठेवले. त्या चाकोरीतून गाडी ओढली. ज्या कृष्णमेनन यांच्याकडून त्यांनी संरक्षणखातं घेतलं, त्यांचीसुद्धा वेगळी Contribution तिथं दाखविता येईल. संरक्षण, उत्पादनाचं राष्ट्रीयीकरण त्यांनी चांगलं व झपाट्यानं केलं. यशवंतरावांच्या खाती तसं काही जमा नाही !'

'बुद्धिमान असूनही यशवंतराव भेकड व लबाड आहेत. शत्रू दिसला की आव्हान स्वीकारण्यापेक्षा शरणागतीची धावपळ करण्याकडेच त्यांचा कल असतो. कुठल्याही समरप्रसंगी यशवंतराव ताठपणे, निर्धारानं उभे राहिले आहेत असं आठवत नाही ! एकच अपवाद म्हणजे १९६९ च्या राष्ट्रपति–निवडणुकीत ते संजीव रेड्डींच्या बाजूनं उभे राहिले. पक्षशिस्तीला अनुसरूनच इंदिराजींच्या विरोधात त्यांनी स्वतःचं व महाराष्ट्राचं मत रेड्डींना टाकलं; पण तेव्हाही तो डाव अंगाशी येणार असं दिसल्याबरोबर लगेच त्यांनी पलटी खाल्ली आणि सत्ताधाऱ्यांची बाजू धरली. आपलं तत्त्व अशा तऱ्हेनं त्यांनी आपणच दूर सारलं.'

यशवंतरावाच्या नेतृत्वाचं आणि राजकारणाचं अभ्यासपूर्ण विश्लेषण करून अनंतराव थांबले आणि आम्ही आमचे प्रश्न पुढे सरकाविले. महत्त्वाचा प्रश्न होता अर्थातच यशवंतराव व मराठवाडा यांचे परस्पर संबंध.

**प्रश्न :** मराठवाड्याच्या विकासाचं काय ? हा विकास अपुरा झाला हे खरं का ?

**उत्तर :** होय. महाराष्ट्रात सामील होण्यासाठी मराठवाड्यानं चळवळ केली. विदर्भात अशी चळवळ झाली नाही. त्यानंतर नागपूर करार झाला; पण महाराष्ट्रात आल्याचा आम्हाला अजूनही आनंदच वाटत असला तरी ज्या अपेक्षेनं आम्ही आलो ती पुरी होऊ शकली नाही. मराठवाड्याच्या विकासाकडे दुर्लक्ष झाल्याची तक्रार केली की मराठवाड्याचा जुना बॅकलॉग पैशाच्या स्वरूपात चौथ्या योजनेअखेर भरून काढल्याचं उत्तर दिलं जातं, पण विकासाची ही आकडेवारी फसवी, दिशाभूल करणारी आहे. नागपूर करारात ठरल्याप्रमाणे extra weightage यशवंतरावांनी मराठवाड्याला दिलं नाही.

**प्रश्न :** मग यशवंतरावांनी जाणूनबुजून मराठवाड्याच्या विकासात अडथळे आणले ही तक्रार खरी म्हणायची का ?

**उत्तर :** नाही ! खरं सांगायचं तर यशवंतरावांना मराठवाड्याविषयी खास काही आकस आहे असं मला वाटत नाही. असायचं काही कारणच नाही; पण आमच्या मागास भागाच्या हिताला प्राधान्य देऊन पुढे आणायचे प्रयत्न त्यांनी फारसे केले नाहीत हे मात्र खरं ! कारण मुंबईतले भांडवलदार आणि पश्चिम महाराष्ट्रातली शुगर लॉबी व ग्रामीण बागायतदार यांचे हितसंबंध जोपासताना यशवंतराव व त्यांच्या पठडीतल्या राज्यकर्त्यांनी कोकण व मराठवाड्यांसारख्या अविकसित भागाकडे दुर्लक्ष केले. गोडीनं वागले पण दिले काही नाही !

**प्रश्न :** पण मराठवाडा मागे पडला याचा दोष यशवंतरावापेक्षा शंकरराव चव्हाणाकडेच अधिक जातो असा जो आरोप केला जातो त्याचं काय ?

**उत्तर :** शंकरराव मुख्य मंत्री झाले तेव्हा किंवा ते कॅबिनेटमध्ये असतानासुद्धा मराठवाड्याच्या त्यांच्याकडून ज्या अपेक्षा होत्या त्या त्यांनी पुऱ्या केल्या नाहीत हें खरं आहे; पण माझ्या मते असे प्रादेशिक हितसंबंध निभावणं हे मुख्य मंत्र्याचं कामच नव्हे ! आहे रे वर्गाचे हितसंबंध सगळ्या क्षेत्रात सांभाळायचे हे कॉंग्रेसचं धोरण एकदा ठरल्यानंतर त्याच चौकटीत शंकररावही सापडले एवढंच. त्यामुळच यशवंतरावांपासून शंकररावांपर्यंत सर्वांच्याच कारकीर्दीत, मुळात विकसित असलेल्या पश्चिम महाराष्ट्राचीच, त्यातही मुंबईचीच, भरभराट जास्त झाली. उद्योगधंद्यातही मक्तेदारी वाढली, मुंबईच्या अवाजवी विस्ताराचा वेग वाढला, तसे उद्योगधंद्याचे केंद्रीकरणही वाढले.

**प्रश्न :** यशवंतरावावर महाराष्ट्रात जातीयवादी राजकारण खेळविल्याचा गंभीर आरोप केला जातो. त्याच्याबद्दल आपले मत काय ?

**उत्तर :** एवढं खरं की त्यांच्या राजकारणात पददलितांपेक्षा, मागासलेल्यांपेक्षा सवर्णांना आणि बलवानानाच अधिक उत्तेजन मिळाले. कारण त्यांच्या राजकारणाची बैठकच स्थितिवादी आहे, गतिमान नाही. आपल्या हितसंबंधियांचे भले करण्यासाठी त्यांनी

पृष्ठ २८ वर



# अजूनही यशवंतराव चाचपडतच आहेत

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

मुलाखत : सतीश कामत

यशवंतराव चव्हाणांच्या गुणविशेषांची चर्चा करताना एक मुद्दा नेहमी मांडला जातो–त्यांची लोकसंग्रह करण्याची वृत्ती. यशवंतरावांनी पहिल्यापासूनच निरनिराळ्या क्षेत्रांतील अनेक माणसं जोडली; अनेकांशी जवळीक साधली. त्यांच्यामध्ये साहित्यिक आहेत, कलाकार आहेत, सामाजिक कार्यकर्ते आहेत आणि विचारवंतही आहेत. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा आणि यशवंतरावांचा जवळजवळ चाळीस वर्षांचा स्नेह ! त्यामुळेच यशवंतरावांच्या जीवनावर आणि त्यातून त्यांच्या वृत्ती–प्रवृत्तींवर अनेक दृष्टिकोनांमधून प्रकाश पडेल या अपेक्षेने तर्कतीर्थांची खास भेट घेतली. सुमारे तीन तास झालेल्या या मुलाखतीमध्ये यशवंतरावांच्या स्वभावविशेषांचे आणि वर्तनाचे व्यापक पातळीवरून शास्त्रीबोवांनी पृथक्करण केले. या मुलाखतीतील काही महत्त्वाचा भाग येथे देत आहे.

**प्रश्न** : यशवंतरावांनी भारताच्या राजकारणात स्वतःचं असं एक स्थान निर्माण केलं आणि टिकविलं आहेच; पण याचबरोबर एक रसिक कलाप्रेमी म्हणूनही त्यांना ओळखतात. साहित्यावर त्यांचं विशेष प्रेम. या दृष्टीने यशवंतरावांबद्दल आपण काय सांगू शकाल ?

**उत्तर** : तसं वरंचसं सांगता येण्यासारखं आहे; पण थोडक्यात सांगतो. यशवंतरावांची वाढ अत्यंत सुसंस्कृत वातावरणात झाली. संत-साहित्य आणि आधुनिक मराठी साहित्य यांची चर्चा करणाऱ्यांच्या वातावरणात ते वावरत होते. तसेच नवे राजकीय, डाव्या विचारसरणीचे, मार्क्सवाद, समाजवाद यांच्याविषयी जे अभ्यासवर्ग चालत त्या अभ्यासवर्गांनाही यशवंतराव जात आणि तेथील चर्चेत भाग घेत. त्यामुळे यशवंतराव पदवीधर झाले तेव्हा साहित्याचे आणि बौद्धिकतेचे संस्कार घेऊन ते बाहेर पडले. त्यामुळे सबंध राजकीय कारकीर्दीत गेल्या पाच-सहा वर्षांचा काळ सोडला तर, राजकीय विचारवंत या नात्याने महाराष्ट्राच्या व भारताच्या ध्येय-धोरणांच्या सल्ला-मसलतीत, समतोल विचाराचे म्हणून यशवंतरावांना मान्यता मिळाली. महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृत मंडळ स्थापन करण्याचीही कल्पना त्यांचीच ! चांगले साहित्यिक आणि विचारवंतांची पुस्तके छापून प्रकाशित करण्याच्या कामी त्यांना विनशर्त मदत करणं हे शासनाचं कर्तव्यच असतं या विचारातून या मंडळाची स्थापना झाली. सत्ताधारी पक्षाला वा शासनाला ज्या व्यक्ती अमात्य

होत्या किंवा विरोधी पक्षात होत्या त्यांच्याही पुस्तकप्रकाशनाला यशवंतरावांनी विरोध केला नाही मंडळाचे आतापर्यंतचे लेखकांना अनुदान देण्याचे निर्णय बिनहरकत अंमलात येऊ शकले याचं कारण यशवंतरावानी पाडलेला विचारस्वातंत्र्याचा पायंडा होय. स्थानबद्ध लेखकांच्याही पुस्तकांना अनुदानं दिली गेली हे याचच उदाहरण आहे. मंडळाचे नेमले गेलेले सदस्य (साहित्यिक / कलाकार) यांची निवड शासनाने केली नाही तर माझ्यासारख्या शासनाबाहेरील व्यक्तीने केली हा सारा यशवंतरावाच्या धोरणाचाच प्रभाव होय !

यशवंतरावाच्या साहित्य-रसिकतेबद्दल बोलताना हे सांगितलंच पाहिजे की त्यांचं वाचन विविध आणि विपुल आहे. एखादी विशेष प्रकारची, मला मोलाची वाटलेली साहित्यकृती मी यशवंतरावाना भेटीदाखल देत असतो; पण बऱ्याच वेळा मला असं आढळून येतं की ती साहित्यकृती त्यांनी अगोदरच विकत आणून वाचलेली असते. यशवंतरावाचा ग्रंथसंग्रह फार मोठा आहे आणि तो सतत वाढत असतो. मराठी कवितेचे ते मोठे रसिक श्रोते आणि वाचक आहेत. साहित्यिकाची मैत्री त्यांना फार महत्त्वाची वाटते. कलेचाही अनावर मोह यशवंतरावांना आहे. पुष्कळ वेळा उत्कृष्ट नाटक रंगमदिरात आलं तर ते आपल्या महत्त्वाच्या मुलाखतीसुद्धा पुढे ढकलून प्रयोगाची तिकिटं काढून प्रेक्षकगणांत जाऊन बसतात. साहित्यिकांच्या गप्पा-गोष्टीत ते खूप रगतात. साहित्यिक आणि कलाकार याची मैत्री यशवंतरावाना फार मोलाची वाटते.

**प्रश्न :** आताच आपण यशवंतरावाच्या विचारस्वातंत्र्याच्या आणि साहित्यकलेवरील प्रेमाविषयी बोललात; पण याच प्रत्यतर त्यांच्या वर्तनामध्ये कधीच कसं दिसलं नाही ? त्याचप्रमाणे त्यांची लोकशाहीवरील निष्ठाही अलीकडे कसास उतरली नाही, याचा अन्वय आपण कुसा लावाल ?

**उत्तर :** इंदिराजीच्या अकरा वर्षांच्या कारकीर्दीत काँग्रेसमधील विचारस्वातंत्र्य घटत गेलं. एक प्रकारची अधिकारशाही वाढत गेली आणि इंदिराजीचं एकतत्री वर्चस्व बळकट झालं. अशा परिस्थितीत यशवतरावांनी जी सहनशीलता दाखवली ती दाखवली नसती तर फार चागलं झालं असतं; परंतु त्यामुळे मग काँग्रेसपक्षामधून झटकून बाहेर पडण्याची पाळी त्याच्यावर आली असती. यशवंतराव ध्येयवादी आहेत. त्याच्या सामाजिक निष्ठाही शंकातीत आहेत; परतु काँग्रेस पक्षातून बाहेर पडून वनवासी जीवन जगण्याची त्यांची मानसिक तयारी नव्हती. कारण त्यांचं सगळं जीवनच काँग्रेसच्या परिसरात वाढलं. त्यामुळे काँग्रेस सोडणं यशवंतरावांच्या जिवावर आलं. यावर कुणी असं म्हणेल की, इंदिराजीच्या अधिकारशाहीशी जुळणारी अशी त्यांची राजकीय दृष्टी असणं फार शक्य आहे; पण मला तस वाटत नाही. कारण त्यांनी स्वत: द्विभाषिक मुंबई राज्य आणि महाराष्ट्र प्रदेश राज्य यामध्ये असताना काँग्रेस पक्षाचं नेतृत्व केलं; महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसची ताकद वाढवली. महाराष्ट्राच्या मत्रिमंडळात मोरारजीच्या नेतृत्वाखाली काम केलं आणि नंतर स्वत:च्याही नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ चालवलं. यात कुठंही अधिकारशाही प्रवृत्ती होती असं प्रमाण नाही. मला असं वाटतं की, मोरारजी जरी ताठर प्रवृत्तीचे प्रशासक म्हणून प्रसिद्ध होते तरी प्रशासनयंत्रणेत त्यांनी कधीही अधिकारशाहीची प्रवृत्ती दाखवली नाही. कायद्याचं राज्य हे राज्यशास्त्राचं एक मूलभूत तत्त्व आहे. या तत्त्वाला मोरारजीभाईंनी मोठ्या निष्ठेनं महत्त्व दिलं. हीच निष्ठा यशवंतरावांच्याही प्रदेश राज्यामधल्या आणि केंद्रराज्यातल्या प्रशासकीय वर्तनाची खूण ठरली. हे तत्त्व इंदिराजीच्या कारकीर्दीमध्ये अत्यत गौण ठरत गेलं, पण यशवतरावांच्या कारकीर्दीमध्ये तसं एकही उदाहरण नाही. मला ते एकदा म्हणाले होते की, 'प्रशासनशास्त्रातील माझे गुरु मोरारजीभाईच आहेत !' कायद्याचं राज्य हे प्रशासनयंत्रणेचं अधिष्ठान आहे. त्याचं पावित्र्य स्वातंत्र्योत्तर काळात ज्या काही थोड्या व्यक्तीमध्ये प्रतिबिंबित झालेलं मला दिसतं त्यामध्ये मोरारजी आणि यशवंतरावांची नाव सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखी आहेत !'

**प्रश्न .** हे सगळं जरी मान्य केलं तरी यशवंतरावांच्या गेल्या दोन वर्षांमधील वर्तणुकीचं समर्थन काय करता येईल ?

**उत्तर :** एक गोष्ट कबूल केलीच पाहिजे की, प्रसंगविशेषी धोका पत्करूनही पावलं टाकण्याची जर वेळ आली तर तसा धोका पत्करण्यास यशवंतराव कधीही तयार नसतात आणि त्याच्यावरील ही टीका त्याच्या अगदी निकटच्या निष्ठावत अनुयायानीही माझ्याजवळ अनेक वेळा बोलून दाखविली आहे अधिकारशाहीची यंत्रणा जर यशवंतरावाच्या हातात पक्की आली तर ते कसे वागतील, असाही एक प्रश्न राजकीय विचारवंतांनी मला विचारला होता. माझी अशी धारणा आहे की, यशवंतराव अधिकारशाहीची यंत्रणा जशीच्या तशी राबवणार नाहीत. तिला अधिक उदारमतवादी रूप देण्याचा ते प्रयत्न करतील. कारण यशवतरावाचा मन:पिंडच अधिकारशाहीला जुळेल असा नाही; परंतु काँग्रेस पक्षामध्ये पहिल्यापासूनच अशा उच्चपदस्थ व्यक्तींचा फार मोठा भरणा झाला आहे, आणि गेल्या दहा–बारा वर्षांत तो वाढला आहे. या सगळ्या इंदिराजीच्याच लहान-मोठ्या प्रतिमा आहेत. म्हणून काँग्रेस पक्षाच्याच लोकशाही नीतीबद्दल मी साशंक आहे; पण यशवतरावाच्या बाबतीत हे मला पुन्हा एकदा सांगावंसं वाटतं की, प्रस्थापिताविरुद्ध बंड करून उठेल अशी त्याची मनोग्रंथीच नाही.

**प्रश्न :** १९६२ सालापासून १९७७ सालापर्यंत यशवंतराव भारताच्या केंद्र सरकारात राहिले, असा एखाद-दुसराच मंत्री इतक्या दीर्घकाळपर्यंत केंद्र सरकारात टिकला असेल. इंदिराजींना काही काळानतर ते नकोसे झाले होते. तरी इंदिराजीनी त्यांची हकालपट्टी का केली नाही हा एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो.

**उत्तर :** याची कारणं दोन आहेत. एक, महाराष्ट्रासारख्या मोठ्या प्रदेश राज्याचं नेतृत्व त्यांनी कायम टिकवलं. गेली सोळा वर्षं ते दिल्लीत राहिले; परंतु महाराष्ट्राच्या नेतृत्वाची किल्ली यशवंतरावांनी आपल्या हाती कायम ठेवली. याचं कारण त्यांच्यासारखं प्रसन्न आणि आत्मविश्वाससंपन्न असं, महाराष्ट्रातील नागरी व ग्रामीण अशा दोन्ही वर्गांना पसंत पडणारं दुसरं नेतृत्व पुढे येऊच शकलं नाही. त्यामुळे इंदिराजी मनात असूनही यशवंतरावांना डावलू शकल्या नाहीत. डावलण्याची त्या वाट पहात होत्या.

दुसरं कारण असं की, यशवंतराव हे अत्यंत सावधचित्ताचे गृहस्थ आहेत. स्वामी रामदासांच्या 'सावधान' हा इशारा त्यांनी कायम लक्षात ठेवला, हा इशारा व्यवहारात आणि परमार्थात, दोन्हीकडे

लक्षात ठेवणं योग्य आणि आवश्यक असतं. यशवंतरावांनी ते केल्यामुळे त्यांची पावलं नेहमीच जपून पडतात. विरोधाचे प्रसंग यशवंतराव शक्यतो टाळतात. 'जे जे होईल ते ते पहावे, तुका म्हणे उगी राहावे' असंही धोरण ते ठेवतात. ही एक प्रकारची अलिप्त राहण्याची प्रवृत्ती आहे. हा राजकारणी चातुर्याचाही भाग आहे; अर्थात हे जसं यशाचं कारण आहे तसंच अपयशाचंही कारण होऊ शकतं; पण राजकीय यशाला राजमार्ग क्वचितच असतो.

**प्रश्न :** हे आपलं सगळं बोलणं फार सावधपणाचं आहे. आपल्या मित्राला दुखवेल असं काहीही बोलण्याच आपण टाळत आहात. स्पष्टच बोलायचं तर, आपण ज्याला 'सावधानता', 'संघर्ष टाळण्याची वृत्ती' आणि 'अलिप्तता' म्हणता त्यालाच अनेक राजकीय निरीक्षक आणि यशवंतरावांबरोबर केंद्रामध्ये अनेक वर्षं काम केलेले नेतेही 'संधिसाधू' हे विशेषण लावतात. यावर आपलं काय मत आहे?

**उत्तर :** अहो, तो राजकीय पक्ष प्रचाराचाच एक प्रकार आहे. यशवंतरावांनी गट बदलले असतील; पण आपला पक्ष कधीही बदलला नाही. कॉंग्रेस पक्षातच टिकून राहण्यासाठी जे जे करावं लागलं ते सर्व केलं. संधिसाधुपणा नेमका कशास म्हणावयाचा याचा निश्चित निकष दाखवल्याशिवाय असं का बरं म्हणावं? पण म्हणतात त्याना म्हणू द्यात. कारण राजकीय रंगमचावरील पात्रांनी एकमेकांवर असे आरोप–प्रत्यारोप केल्याशिवाय खटकेबाज संवाद तयार होत नाहीत. राजकारणाला रंग भरत नाही.

**प्रश्न :** आज कॉंग्रेस जनता पक्षाला अखिल भारतीय स्तरावरील पर्यायी पक्ष म्हणून उभा आहे. त्यादृष्टीने त्याच्या भविष्यकालाविषयी काय म्हणता येईल?

**उत्तर :** आज कॉंग्रेस सत्तास्थानी पर्यायी पक्ष म्हणून टिकण्याची शक्यता पुष्कळच आहे. कारण गेल्या नव्वद वर्षांच्या इतिहासात भारताच्या सर्व प्रदेशांमध्ये, ग्रामीण आणि नागरी भागात तो पसरला आहे. ज्या राज्यांमध्ये कॉंग्रेसचा पराभव झाला आहे, तेथेही तो पक्ष आपलं अस्तित्व टिकवून आहे. एवढंच नव्हे तर, जनता पक्षाच्याही मनात सतत भीती राहावी इतक्या प्रमाणात टिकवून आहे.

परंतु सर्वत्र नेतृत्व मात्र आपापसातील स्पर्धेमुळे मलीन मनाचे बनले आहे. नवे प्रभावी विचार या मनाला सुचत नाहीत. त्यामुळे सत्तारूढ पक्षाचे दौर्बल्य आणि दोष हेच आपलं बलस्थान असं मानण्याची सवय वाटू लागली आहे. आपल्या पक्षाच्या ध्येय–धोरणाची व्यवस्थित पुन्हा तपासणी व मांडणी करण्याची गरज आहे असही वाटेनासेच झाले आहे. स्वत:च्या ध्येय–धोरणाची प्रखर समीक्षा करणारी बुद्धिवादी प्रवृत्ती आणि नवी दिशा दाखवणारी प्रतिभा याच्या खुणाही सध्याच्या कॉंग्रेसमध्ये दिसत नाहीत. सगळे शिळ्या कढीला ऊत आल्यासारखे वातावरण आहे. इंदिराजी सत्ताधारी होण्यापूर्वीचा कॉंग्रेसचा इतिहास नव्या नव्या नेत्यांच्या नव्या नव्या विचारकक्षा दाखविणाऱ्या प्रतिभाचा इतिहास आहे. अशा एक वा अनेक नेत्यांचा १२–१५ वर्षांच्या प्रत्येक कालखडानंतर उदय दिसतो. ते पूर्वकाळाकडे सारखे पाठ करून पुढे पुढे जात असतात; परंतु सध्याचे प्रचड पराभवानंतरचे उच्च, स्थानावरील कॉंग्रेस नेते भविष्यकाळाकडे पाठ करून पूर्वकाळाचीच शिळी गाणी गात लोकांना आवाहन करत बसले आहेत. जनता पक्ष काही नवं सांगतो आहे; परंतु तोसुद्धा, त्याच्यातील अनेक गट व त्यांचे नेते भूतकालाकडे ओढले गेलेले दिसतात. क्रांतिवादी समाजवादीसुद्धा याला फार अपवाद नाहीत.

श्री. मधू लिमये म्हणतात की, 'पर्यायी पक्षा'ची आवश्यकताच नाही. प्रत्येक प्रांतात प्रातिक पक्ष आहेत. त्यांच्यामुळे अधिकारशाहीला पायबद बसू शकतो. कॉंग्रेस पक्ष तर पर्यायी पक्ष होऊच शकत नाही; तो मृतवत् आहे आणि तो पुन्हा सबळ झाल्यास देशाला अधिकारशाहीमध्ये ढकलण्यास सिद्ध होईल! परतु मला हे योग्य वाटत नाही. भारतीय संसदीय लोकशाहीला पर्यायी पक्षाची नितांत आवश्यकता आहे. तो नसेल तर सत्ताधारी पक्ष हा कितीही लोकशाही स्वातंत्र्याची आणि समतेची तत्त्वे उराशी बाळगणारा असला तरी त्यांना हळूहळू मुरड घालून परिणामशून्य करू शकतो. कारण राजकीय पक्षाचे मुख्य उद्दिष्ट सत्तेमध्ये टिकून राहण्याचे असते आणि कोणताही पक्ष याला अपवादभूत असू शकत नाही. मधु लिमयांनी पश्चिमी राज्यशास्त्रज्ञानी केलेली राजकीय पक्षाची मीमांसा पुन्हा अभ्यासावी आणि श्री. मानवेंद्र रॉय यानी केलेल्या पक्षमीमांसेकडे विशेष लक्ष द्यावे. जनतेला सत्तारूढ पक्ष खाली ओढण्याची संधी तितकाच मोठा, प्रबल विरोधी पक्ष असला तरच मिळते. लोकशाहीचे रक्षण नेते करू शकत नाहीत. जागृत, समजस असा कोणत्याही पक्षाशी घट्ट बांधिलकी नसलेला स्वातंत्र्यप्रिय नागरिकवर्गच ते करू शकतो. आव्हान देणारा पर्यायी पक्ष नसल्यास सत्ताधारी राजकीय पक्ष काय करतो याचा प्रत्यक्ष ताजा अनुभव असतानाही असं बोलणं हे केवळ रम्य कल्पनाविलासाचेच उदाहरण म्हणावे लागेल

**प्रश्न :** 'आता मी आक्रमक भूमिका घेणार!' असं यशवंतरावानी नुकतंच म्हटलं आहे. त्या दृष्टिकोनातून विरोधी पक्षाचा नेता म्हणून यशवंतराव कितपत यशस्वी होतील? इंदिराजींच्या पुनरागमनाचा त्यांच्यावर काय परिणाम होईल?

**उत्तर :** यशवंतरावांच्या नेतृत्वासंबंधी बोलताना हे स्पष्ट केलंच पाहिजे की अजूनही यशवंतराव चाचपडतच आहेत, असं मला वाटतं. 'आक्रमक भूमिका घेणार–' असं ते म्हणतात; पण नुसतं म्हणून भागणार नाही. या भूमिकेत वावरताना भविष्यकालावर प्रकाश टाकणारे आणि मार्ग दाखविणारे काही नवे विचार जर त्यांना सुचले, असे काही नवे विचार जर त्यांनी दिले तरच यशवतराव आपलं नेतृत्व टिकवू शकतील!

इंदिराजीबद्दल मला फारशी आशा वाटत नाही. कारण आत्मपरीक्षण आणि स्वत:च्या झालेल्या कारकीर्दीचं परीक्षण करण्यास उच्च मनोबळ आवश्यक असत. हे मनोबळ इंदिराजीजवळ आहे असं मला वाटत नाही. 'नित्य नवा दीस जागृतीचा' ही सतोक्ती राजकीय नेत्यालाही उद्‌बोधक होऊ शकते. तसा काहीच बोध इंदिराजींनी घेतलेला दिसत नाही.

शास्त्रीबोवांच्या बोलण्यामध्ये परखडपणा होता; पण त्याचबरोबर एक प्रकारची चिंताही त्यांच्या बोलण्यात होती. म्हणूनच शेवटी ते म्हणाले, 'कॉंग्रेस पक्षाच्या लोकशाही नीतीबद्दल तर मी साशंकच आहे; पण जनता पक्षाच्या बाबतीतही मी तितकाच साशंक आहे. समाजवाद हा तर नुसता मंत्रच झाला आहे त्याचे अनेक अर्थ काढले जातात आणि त्यामुळे ती एक निरर्थक शब्दावली बनली आहे. म्हणून एकूण भारताच्याच लोकशाही राजनीतीबद्दल मी निराशाग्रस्त आहे.' □

# चव्हाणवादी यशवंतराव

संकलन : सतीश कामत

र. के. खाडिलकर

भारताच्या अंतर्गत राजकारणाला सध्या भलताच रंग चढू लागला आहे. प्रबळ असा विरोधी पक्ष प्रथमच संसदेमध्ये निर्माण झालेला आहे. चाळीस वर्षांचा राजकीय अनुभव पाठीशी घेऊन मा. यशवंतराव चव्हाण या विरोधी काँग्रेस पक्षाचं नेतृत्व करीत आहेत. या चाळीस वर्षांमध्ये महाराष्ट्रातील अनेक व्यक्तींशी यशवंतरावांचा निरनिराळ्या प्रकारे संबंध आला. अनेक नामवंत व्यक्तींनी यशवंतरावांना जवळून पाहिले, अनुभवले. मा. र. के. खाडिलकर हे त्यापैकीच एक. 'आता मी आक्रमक भूमिका घेणार!' अशी यशवंतरावांनी नुकतीच घोषणा केली आहे. त्या संदर्भात मा. र. के. खाडिलकरांची मुद्दाम भेट घेतली. आजपर्यंतची यशवंतरावांची कारकीर्द पाहता अशी आक्रमक भूमिका घेणं त्यांना कितपत जमेल याविषयी त्यांच्याशी दोन-अडीच तास मनमोकळी चर्चा झाली. त्यातून यशवंतरावांच्या स्वभावावर आणि वर्तनावर प्रकाश टाकणारे काही विचार 'र. के.'नी व्यक्त केले. तेच येथे संकलितपणे देत आहे.

'यशवंतराव चव्हाण आणि मी, आम्हा उभयतांचे मित्र असलेले कै. आत्माराम पाटील यांच्या सांगण्यावरून १९३८ साली मी 'लोकमत'चा संपादक असताना यशवंतरावांवर एक गौरवपूर्ण अग्रलेख लिहिला. याच वेळी यशवंतरावांशी माझा पहिल्यांदा संबंध आला. यानंतर त्यांच्याशी संबंध आला तो ते मंत्री झाल्यावरच. म्हणजे या मधल्या काळात तसा अधूनमधून येत होता; पण विशेष नाही!' यशवंतरावांच्या राजकीय कारकीर्दीचा परामर्ष घेताना खाडिलकरांनी सुरुवातीला सांगून टाकले. म्हणजे गेली चाळीस वर्षं त्यांनी यशवंतरावांना अगदी जवळून पाहिलं होतं. त्यामुळे अर्थातच शेतकरी-कामगार पक्षाच्या स्थापनेपासूनच चर्चेला सुरुवात झाली. एके काळी यशवंतराव रॉयवादी म्हणून डाव्या विचारसरणीचे ओळखले जात. या संदर्भातच पुढे बोलण्यास सुरुवात झाली.

'स्वातंत्र्यपूर्व काळातील एक प्रसंग मला आठवतो. १९४६ साल होतं. शेतकरी-कामगार पक्षाच्या स्थापनेसंबंधी विचार करण्यासाठी आम्ही काही मंडळी श्री. भाऊसाहेब राऊत यांच्याकडे एकत्र जमलो होतो. श्री. दत्ता देशमुख, श्री. केशवराव जेधे, श्री. शंकरराव मोरे, श्री. पी. के. तथा बाळासाहेब सावंत इत्यादी मंडळी हजर होती. यशवंतरावही होते. पक्षकार्यासंबंधी निर्णय झाला तेव्हा यशवंतराव ताडकन् उठून उभे राहिले आणि 'तात्या, (श्री. केशवराव जेधे) तुमच्या आजूबाजूला कोण मंडळी आहेत याचा विचार करा नि मग निर्णय घ्या!' असं म्हणून बैठक सोडून निघून गेले. अर्थात पक्ष स्थापन करण्याचा विचार बरेच दिवस चालू होता. त्याला निश्चित स्वरूप आल्यानंतर श्री. यशवंतराव चव्हाण बैठक सोडून गेले त्यात मोठाच अर्थ होता!'

र. के. ना हा जो अर्थ सुचवायचा होता तो असा की, पक्ष स्थापन होता-होताच यशवंतराव स्वत त्यातून नामानिराळे झाले. जबाबदारी झटकून टाकण्याचा जो यशवंतरावांचा स्वभाव आहे त्याच हे उदाहरण आहे.

त्या काळात यशवंतराव 'रॉयवादी' म्हणून ओळखले जात. यावर आपलं काय मत आहे?'

या प्रश्नावर र. के. नुसतं हसले आणि म्हणाले, **'यशवंतराव 'रॉयवादी' कधीच नव्हते! तसा कोणताच 'वाद' (ism) त्यांनी पूर्णपणे कधीच स्वीकारला नाही. त्यांचा स्वत:चाच एक 'वाद' (ism) आहे-चव्हाणवाद!'**

शे. का. पक्षाच्या वाटचालीसंबंधी पुढे बोलणं सुरू झालं '१९४८ साली पक्षाची रीतसर स्थापना झाली. सातारा जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षासह बरीच मंडळी या पक्षात सामील झाली. १९५२ च्या निवडणुकीत श्री. शंकरराव मोरे सोलापूरमधून लोकसभेवर निवडून आले. इतर सव्वीस मंडळी आमदार म्हणून निवडून आली तेव्हा नव्या पक्षाला चांगला पाठिंबा मिळेल असं आम्हाला वाटलं; पण याच वेळी यशवंतराव मात्र पक्के मोरारजींच्या बाजूचे असावेत असा माझा समज झाला. १९५२ नंतर शेतकरी-कामगार पक्षाचा सरचिटणीस म्हणून माझी निवड झाली; पण पुढे पक्षात दोन तट पडले. कै. आनंदराव चव्हाण, श्री. यशवंतराव मोहिते, श्री. तुळशीदास जाधव आमच्या बाजूने होते. श्री. केशवराव जेधे थोडेफार आमच्या अंगाला चिकटून राहिले. काही माणसं यशवंतरावांनी अगोदरच 'गिळंकृत' केली होती. सर्व मार्क्सवादी पक्षांचं एकीकरण करावं म्हणून अखिल भारतीय किसान आणि मजदूर पक्षाची स्थापना करण्यात आली; पण त्यात अपयश आले आणि शेवटी त्या पक्षाचं विसर्जन करण्यात आले!'

यानंतर विषय निघाला तो खाडिलकरांच्या काँग्रेसप्रवेशासंबंधी. 'श्री. गोविंद वल्लभ पंत (श्री. के. सी. पंतांचे पिताजी) हे त्या काळातले मोठे कर्तबगार आणि संसदीय राजकारणात मुरलेले पुढारी. माझे स्नेही कै. फिरोज गांधी (श्रीमती इंदिरा गांधींचे पती) यांनीच मला गोविंद वल्लभ पंतांकडे नेले. पुढे त्यांच्याच आग्रहाने मी काँग्रेसमध्ये सामील झालो; पण येताना श्री. पंतांनी सांगितले होते-**'मी सांगेन तेव्हाच आत या! कारण याबाबतीत मला चव्हाणांशी बोलावं लागेल. त्यांनी होकार देणं तसं सोपं नाही!'**

हे १९६२ साल होतं. यशवंतराव अजूनही महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून काम पहात होते. श्री. खाडिलकरांना काँग्रेसमध्ये सामावून घेण्यास यशवंतरावांचा विरोध दोन मुद्द्यावर होता. एक महाराष्ट्राच्या राजकारणात आव्हान देणारा प्रतिस्पर्धी निर्माण होणं यशवंतरावांना मानवणारं नव्हतं आणि दुसरं म्हणजे 'मराठेशाही'च्या प्रसारात खाडिलकरांसारखा माणूस त्रासदायक झाला असता.

**'काँग्रेसमध्ये सामील झाल्यानंतर माझ्या प्रथम जर काही लक्षात आलं असेल तर असं, की यशवंतराव चव्हाणांवर वरिष्ठ नेत्यांपैकी बऱ्याच लोकांचा विश्वास नव्हता!'** र. के. पुढे सांगू लागले. 'यानंतर थोड्याच महिन्यांनी यशवंतरावांना केंद्रीय संरक्षणपद द्यावं असं ठरलं. मी त्यांचं स्वागत करण्यासाठी दिल्लीच्या विमानतळावर गेलो. कै. आनंदराव चव्हाणासह यशवंतराव आले; परंतु माझ्याशी फारसं काही न बोलता ते आनंदरावांसह गाडीने घरी गेले. मी दुसऱ्या

गाडीने घरी गेलो.' खाडिलकरांविषयी फारसं प्रेम चव्हाणांनी कधीच दाखविलं नाही. आज यशवंतराव जो जातीयवाद प्रच्छन्नपणे बोलतात त्याची पाळं–मुळं यशवंतरावांच्या स्वभावात फार जुन्या काळापासून रुजलेली होती याचं हे निदर्शक आहे

'असं म्हटलं जातं की यशवंतरावानी हाताशी आलेलं पंतप्रधानपद तीन वेळा गमावलं. याबाबतीत आपल्याला काय वाटतं ?' चर्चेचा विषय काळाबरोबर पुढे सरकला.

'यशवंतराव त्या पा-ळीपर्यंत कधीच पोचले नाहीत. शिवाय राजकीय निरीक्षक किंवा यशवंतरावांचे काही चाहते याव्यतिरिक्त त्याना कोणी तशी offer च दिली नव्हती. केंद्रीय मंत्री असूनही यशवंतरावाचा तसा काहीच प्रभाव नव्हता. आजही काँग्रेस पक्षातील मंडळी ते 'नेता'च आहेत म्हणून जो काही मान देत असतील तेवढाच. त्यांच्यापेक्षा मग जनता सरकारच त्यांना अधिक महत्त्व देतं '

इंदिराजी आणि यशवंतराव याच्या परस्परांशी वागण्याबाबत बोलताना र. के. म्हणाले, 'यशवंतरावाच्या वागण्यात लांगूलचालन हा प्रकार स्पष्टपणे कधी दिसणार नाही. तेवढ्या खुबीने ते वागत आणि वावरत असत; पण इंदिराजीही त्याना मान कधीच देत नसत. किंबहुना इंदिराजीचा यशवंतरावांवर विश्वास असा कधीच नव्हता; पण काय आहे, हा एक माणूस ठेवला की सबंध महाराष्ट्र हातात राहतोय् ना, मग असू दे याला; असं त्यांनी यशवंतरावांच्या बाबतीत धोरण ठेवलं होत ' याच संदर्भात एक मुद्दा लक्षात ठेवण्यासारखा आहे की इंदिराजीनी यशवंतरावांवर फार मोठी जबाबदारीची कामं कधीच सोपविली नाहीत. यशवंतरावाना गृहमंत्रीपद दिलं तरी त्यातील 'Sensitive sections' त्यांनी स्वत:कडेच ठेवले होते.

'हे काही जरी असलं तरी अखंडितपणे सत्ताकेंद्रात राहण्यात आणि महाराष्ट्रात स्वत:चं वर्चस्व कायम राखण्यात यशवंतरावांनी यश मिळविलं. या यशाचं रहस्य कशात आहे ?'

'यशवंतरावानी महाराष्ट्रामध्ये आपलं 'राज्य' कायम ठेवताना एक धोरण नेहमीच ठेवलं. प्रत्येक जिल्ह्याच्या काँग्रेसमध्ये त्यांनी दोन तट पाडले आणि हे तट कायम राहतील याची सतत खबरदारी घेतली. यशवंतराव स्वत: या दोन्ही गटाना नुसतं झुलवीत असतात स्वत: ते कोणाचीच बाजू पक्केपणाने घेत नाहीत यामुळे झालं असं की यशवंतरावाना आव्हान देईल असं दुसरं समर्थ नेतृत्व महाराष्ट्रात कधीच उभं राहू शकलं नाही. यशवंतरावांचं 'राज्य' अबाधित राहिलं. एकदा तर ते, अशा तऱ्हेने आपणच निर्माण केलेल्या, एकमेकांशी विरोधात असणाऱ्या काँग्रेसच्या दोन्ही गटांमध्ये जाऊन जेवून आले. त्यामुळे पुन्हा यशवंतरावांचं दोन्ही गटाशी सख्य !' म्हणजे Devide and rule हा ब्रिटिशांनी घालून दिलेला दडक यशवंतराव वेगळ्या तऱ्हेने पण त्याच उद्देशासाठी वापरीत असतात आणि या महाराष्ट्रातील वर्चस्वाच्या भांडवलावरच त्यानी सत्ताकेंद्रात स्थान टिकविलं.

'अर्थात आता हे असं, दोन गट पाडून, त्यांना झुलवत ठेवण्याचं राजकारण यशवंतराव फार काळ खेळू शकणार नाहीत. **त्यांची महाराष्ट्रातलीही लोकप्रियता आता ओसरायला लागली आहे. त्यांच्याविषयी वाटणारा पूर्वीचा विश्वास आता वाटेनासा झाला आहे उद्या वेळ आली आणि संधी मिळाली तर ते जनता पक्षामध्ये जाऊन मिसळणार नाहीत अशी त्यांच्याविषयी हमी देता येणं आता कठीण झालं आहे. यशवंतरावांची लोकप्रियता** ओसरायला लागण्याचं मुख्य कारण म्हणजे साखरकारखाने, जिल्हा परिषदा यांसारख्या त्यांच्या सत्तेच्या केंद्रस्थानांमध्ये वरचा समाज, अधिकारीवर्ग अजूनही यशवंतरावांच्या बाजूचा आहे; पण कामगारवर्ग आणि खालचा समाज त्यांच्याविरुद्ध आहे.' ही परिस्थिती धोकादायक आहे. कारण ज्यांच्यामधून आणि ज्यांच्या बळावर यशवंतराव वर आले तेच जर त्यांच्याविरुद्ध जात असतील तर यशवंतरावांच्या महाराष्ट्रातल्या वर्चस्वाचं मूळ भांडवलच ते गमावून बसतील ! 'अर्थात अजूनही यशवंतरावाइतकं वजन महाराष्ट्रात दुसऱ्या कुणाचंच नाही; पण ते ढासळत चाललंय. टिकेल की नाही शंकाच आहे !'

'यशवंतराव चव्हाण हे विरोधी पक्षाचे नेते म्हणून कितपत यशस्वी होतील ?'

'यशवंतरावाजवळ खरं नेतृत्वच नाही. आहे ती परिस्थिती बदलण्याचीही ताकद त्याच्यामध्ये नाही. चव्हाण हे दुसऱ्याकरिता कधीच काही करणार नाहीत !' (खाडिलकरांना स्वत:लाही याबाबतीत चव्हाणांचे आलेले अनुभव फारसे सुखद नाहीत) 'राजकारणात मित्र नसतात' हे धोरण चव्हाणानी सतत स्वीकारले. चव्हाणाजवळ घट्ट तात्त्विक निष्ठा नाही अंतिम त्याग करण्याची तयारी नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या बाबतीत आम्ही जेव्हा प्रयत्न करीत होतो तेव्हा चव्हाण आघाडीवर कुठेच नव्हते ! राजकारणात केव्हा ना केव्हा लढाई देण्याची तयारी नेत्याने ठेवावी लागते ही तयारी यशवंतरावानी कधीच दाखविली नाही. शिवाय त्यांचे तट पाडण्याचं धोरण आता त्यांच्याच अंगाशी येणार आहे. यशवंतरावांना 'प्रतिशिवाजी' म्हणतात. खऱ्या शिवाजीनं काही तरी स्वत:चं असं निर्माण केलं. या प्रतिशिवाजीनं जर स्वत:लाच प्रश्न विचारला की, आजपर्यंतच्या कारकीर्दीत माझं स्वत:चं कर्तृत्व काय ?'.तर त्याचं उत्तर शून्य आहे !'

'आता एकच प्रश्न उरतो तो असा की काँग्रेस पक्षाचा भविष्यकाल कसा असेल ? इंदिराजीच्या पुनरागमनाचा त्यावर कितपत परिणाम होईल ?'

'इंदिराजी आता काँग्रेस पक्षाचं नेतृत्व करतील असं वाटत नाही. ही मंडळी त्यांना ते करू देणार नाहीत; पण यशवंतराव चव्हाणांचा आणि काँग्रेस पक्षाचाही, भविष्यकाळ अनिश्चित आणि खडतर आहे. यातून जर बाहेर पडायचं असेल तर त्यासाठी आता काँग्रेसपक्षीयांनी घट्ट तात्त्विक निष्ठा दाखविली पाहिजे. काँग्रेस पक्षामध्ये हे जे तट पाडण्याचं धोरण अवलंबिलं गेलं ते पूर्णपणे थांबलं पाहिजे. कार्यकर्त्यांमध्ये प्रसंगाला खंबीरपणे तोंड देण्याची तयारी असली पाहिजे. या सर्व गोष्टींबरोबरचा जनतेचा विश्वास काँग्रेस पक्षाने गमावला आहे, तो त्यांनी परत मिळविला पाहिजे. यशवंतरावांबद्दलही 'ते 'तिकडे' तर जाणार नाहीत ना ?' ही जी शंका आणि भीती वाटते ती नष्ट झाली पाहिजे. हे सर्व केल्याशिवाय सद्य:स्थितीतून काँग्रेस पक्षाची प्रगतीकडे वाटचाल होऊच शकणार नाही ! त्यासाठी अंतिम त्यागाची तयारी सर्वांनीच ठेवली पाहिजे !'

काँग्रेस पक्षावर आता आत्मपरीक्षणाची वेळ आली आहे. त्या दृष्टीने पं. नेहरूंपासून काँग्रेसमध्ये राहून अनेक महत्त्वाच्या घटना आणि घडामोडींचे साक्षीदार असलेल्या मा. खाडिलकरांचे विचार अत्यंत महत्त्वाचे आहेत. काँग्रेसपक्षाचे असूनही त्यांनी केलेलं हे तटस्थ आणि परखड मूल्यमापन, काँग्रेसवासीयांनाही उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरावं. □

चक्रमचक्री (२५)

# इतिहासाचे पान : भोवऱ्यात सापडलेले

दीर्घस्मृति विश्वनाथ

गेल्या मार्चमधली गोष्ट. संध्याकाळी फिरून परत येत होतो. नव्या पेठेतील विठोबाच्या देवळाशी गर्दी जमा झाली होती. लोक टोळक्या–टोळक्यांनी हिंडत गप्पा मारीत होते. सगळी मिळून साठ-सत्तरावर डोकी गेली नसती. सहज चौकशी केली तेव्हा कळले की यशवंतरावाची निवडणूक–प्रचाराची सभा आहे. थोडा वेळ थबकलो. तासाभराने यशवंतराव आले, त्या तुटपुंज्या जमवापुढे दडपल्या आवाजात पंधरावीस मिनिटे बोलले आणि पुढे चालते झाले ! पण त्या पधरा मिनिटातच हे कळून चुकले होते की, यशवंतरावाचे भाषण मनापासून नव्हते आणि लोकांचेही भाषणाकडे लक्ष नव्हते !

राजकीय पुढाऱ्याला अनेकदा विरोधक श्रोत्यांना तोंड द्यावे लागते; अनेकदा अज्ञान लोकांसमोर बोलावे लागते. जमाव कधी मोठा असतो, कधी लहान असतो; पण श्रोते आपल्याविषयी उदासीन आहेत याची जाणीव झाल्यावर आणि आता आपण बोलतो आहोत त्याच्यावर आपला विश्वास नाही याची खात्री असल्यावर वक्त्याच्या भाषणाला जी अवकळा येते, ती गुदमरवून टाकते. यशवंतरावाच्या त्या दिवशीच्या भाषणाचे नेमके हेच झाले होते.

मला बासष्ट सालच्या सरत्या नोव्हेंबरातली यशवंतरावाची सभा आठवली. सभा शनिवारवाड्यावर होती. वेळ साडेसहाची होती. नोव्हेंबराच्या शेवटाला पुण्याच्या हवेत साडेपाचपासूनच गारवा भरायला लागतो. त्यातून त्या वेळी चिनी आक्रमणाचे तडाखे बसलेले असल्यामुळे सार्वजनिक वातावरणातही एक भीतिगर्भ औत्सुक्य भरून राहिलेले होते. यशवंतरावांना संरक्षणमंत्री होण्यासाठी दिल्लीचे आमंत्रण आले होते आणि ही निरोपसमारंभाची सभा होती.

त्या सभेत यशवंतराव अत्यंत आत्मविश्वासाने बोलले. श्रोत्यांवरची त्यांची पकड जबरदस्त तर होतीच; पण आपणाला एक नवे कार्यक्षेत्र उपलब्ध झाले आहे आणि तेथील आपली कामगिरी यशस्वी होणारच आहे याचा ठाम खात्री त्यांच्या प्रत्येक शब्दातून व्यक्त होत होती. सभेत मिनिटभर अचानक आणि अकारण गोंधळ माजला. यशवंतरावांनी ज्या कडक शब्दात लोकांना चमकावले आणि लोकांनी ज्या तत्परतेने गडबड मिटविली तेही मला स्वच्छ आठवले.

पंधरा वर्षांच्या अंतराने झालेल्या या दोन सभांतील वातावरण आणि वक्त्याच्या सभेवरील अधिकारातील फरक विषण्ण करणारा होता. लोकांच्या केवढ्या अपेक्षा आणि सदिच्छा पाठीशी घेऊन यशवंतराव दिल्लीला गेले होते ! हिमालयाच्या रक्षणासाठी सह्याद्री धावला होता; यमुनेच्या गढूळलेल्या पाण्यावर खळखळणाऱ्या कृष्णेचे तरंग उठणार होते; 'मी काही नवा विचार दिल्लीला नेणार असेन तर माझ्या जाण्याला अर्थ आहे' असं खुद्द यशवंतराव म्हणाले होते; 'मराठी माणूस भारताचा पतप्रधान व्हावा' अशी अपेक्षा आचार्य अत्र्यांच्या मुखाने महाराष्ट्राने एकसाथ व्यक्त केली होती !

पधरा वर्षांत अनेक चढउतार होऊन मार्चमध्ये निवडणूक–प्रचाराच्या सभेत भाषण करणाऱ्या यशवंतरावाच्या प्रतिष्ठेचा आलेख नीचतम बिंदूवर स्थिरावला होता. त्यांचे मत विचारात न घेता जाहीर केलेल्या निवडणुकीत, त्यांच्याच मताविरुद्ध निश्चित केलेल्या उमेदवाराचा प्रचार, त्यांनी प्रचारात भाग घेऊ नये अशी इच्छा प्रच्छन्नपणे व्यक्त करणाऱ्या मुख्यमंत्र्यांच्या राज्यात आज यशवंतराव करीत होते आणि तेही हेटाळणी करणाऱ्या, कमीत कमी उदासीन असणाऱ्या आणि खटपटीने जमा केलेल्या मतदारांसमोर ! चावडीवर लोडाला टेकून जात्या–येत्याचे मानाचे रामराम स्वीकारणारा वतनदार पाटील मुंबईतल्या लोकलच्या स्टेशनबाहेर लॉटरीची तिकिटे विकताना आढळला की जसे ढवळल्यासारखे वाटेल तसे मला झाले.

## दिल्ली : एक द्वाड राजधानी

महाराष्ट्राचे आणि दिल्लीचे नाते एखादी छटेल, नखरेल, द्वाड, लक्ष वेधून घेणारी आणि आपण कुणाचे लक्ष वेधून घेतले आहे याचा वेध घेणारी तरुणी आणि लांबूनच तिच्यावर लक्ष ठेवणारा, तिच्या नखऱ्याने दबकलेला, रांगडा तरुण यांच्यातल्या नात्यासारखे आहे. मोडकळीला आलेल्या घराण्यातली ही थिल्लर पोर दैवगतीने उघड्यावर पडेल आणि कोण्या उनाडाच्या नादाला लागेल अशा वेळी तिला ताळ्यावर आणायला, आश्रय द्यायला आपण तयार राहिले पाहिजे या हेतूने हा आमचा मराठा गडी कित्येक शतके सजग राहिला आहे; पण दिल्ली अशी द्वाड की, तिला परदेशीचे कलंदर मुशाफिर इमानदार गावढ्यापेक्षा अधिक हवेसे वाटतात ! उनाडपणाला कर्तबगारी समजण्याची चूक पोक्त माणसाकडूनही होते, तिथे मुळातच चटोर आणि चचल असणाऱ्या

नवतरुणीकडून अशा गफलती व्हाव्यात यात नवल नाही.

तथापि, यशवंतराव दिल्ली जिंकतील अशी बळकट आशा आम्हाला होती. मुंबई-सारखी 'बडी बांका' नगरी या कानाचे त्या कानाला कळू न देता गनिमी काव्याने सर करणारा हा मुत्सद्दी लढवय्या दिल्लीवरही महाराष्ट्राचा जरीपटका चढवील यात आम्हाला शंका नव्हती. आपल्या म्हातारपणी, पडत्या काळात आणि ऐन अडचणीला आधारासाठी जवाहरलाल नेहरूंनी यशवंतरावांना बोलावले होते. नेहरूनंतर त्यांच्या गादीवर तेच बसणार अशी अपेक्षा बाळगणे काही वावगे नव्हते.

महाराष्ट्राच्या या अपेक्षा नि आशा अगदीच अनाठायी नव्हत्या हे यशवंतरावांच्या दिल्लीतील कारकीर्दीच्या सुरुवातीलाच सिद्ध झाले. यशवंतराव संरक्षणमंत्री झाले तेव्हा त्या खात्याची अवस्था विकट होती. चीनशी घडलेल्या चकमकीतील पराभवाने सेनेबद्दलचा विश्वास ढासळला होता. अधिकारी आणि कारभारी यांच्यात परस्पराविषयी अविश्वास होता आणि दोघांना मिळून मंत्र्याचा भरंवसा वाटत नव्हता. संरक्षण–उत्पादनातील खरी-खोटी खरकटी वर्तमानपत्रातून चिवडली जात होती. यशवंतरावांनी आपल्या चोख, मेहनती आणि दमदार कारभाराने या सगळ्या गोष्टी इतिहासजमा केल्या. अधिकाऱ्यांचा आत्मविश्वास वाढविला. संरक्षणाची पंचवार्षिक योजना वेळेवर पार पाडली. सव्वाआठ लाख गणतीचे आधुनिक शस्त्रांनी सुसज्ज सैन्यदल तयार केले.

पण हा चोख कारभार यशवंतरावांना राजकारणाच्या शिखरावर चढविण्यास असमर्थ ठरला! चौसष्ट साली यशवंतराव नवखे होते, त्यांना फारसा चान्स नव्हता; पण सहासष्ट साली इंदिरा गांधींसारखी 'गुंगी गुडिया' यशवंतरावांसारख्या मातब्बराला सहजी बाजूला सारून पंतप्रधान झाली! सदुसष्ट साली काँग्रेसचा उत्तर हिंदुस्थानात मोठ्या प्रमाणावर पराभव झाला आणि नेहरू घराण्याशी इमानदारी राखणाऱ्या उत्तरेकडच्या लोकांची संख्या कमी झाली. मोरारजीभाईंनी पंतप्रधानकीसाठी कंबर बांधली. तेव्हा निदान तडजोडीचा उमेदवार म्हणून तरी यशवंतरावांचे नाव पुढे येईल असे वाटत होते; पण तेही झाले नाही. बाईंनी सरळ मोरारजीभाईंशीच समझोता केला. दिल्लीच्या राजकारणाची वाकडी वाट यशवंतरावांच्या सरावाची होणे शक्य नाही याची खूणगाठ महाराष्ट्राने तेव्हाच बांधली पाहिजे होती.

त्यानंतर यशवंतरावांचे काय झाले हा ताजाच इतिहास आहे. एकाहत्तरच्या निवडणुकीत विरोधी पक्षाचे घोषवाक्य होते, 'कऱ्हाडचा येसवा, बाईंचा होयबा!' या एका वाक्यात यशवंतरावांच्या रसातळाला चाललेल्या राजकीय कर्तृत्वाचे सारे सार सामावलेले आहे.

## महाराष्ट्रावरची पकड

महाराष्ट्रात शंभर टक्के यशस्वी झालेले यशवंतरावांचे नेतृत्व दिल्लीत प्रभावहीन, गतिशून्य आणि निष्कर्तृक का ठरले याचा अंदाज घेण्यापूर्वी, यशवंतरावांची महाराष्ट्रातील राजकारणावर इतकी घट्ट पकड का बसली याचा विचार करणे प्राप्त आहे ही कारणे तपासताना आपल्याला महाराष्ट्राची आणि यशवंतरावांच्या राजकारणाचीही वैशिष्ट्ये सापडतील.

महाराष्ट्र हे राज्य असे आहे की ज्यात राजकीयदृष्ट्या बहुसंख्याक अशी एकच एक जात आहे. मराठा जातीची लोकसंख्या पन्नास टक्क्यांपेक्षा कमी असेल; पण जवळपास ४५ टक्के लोकसंख्या असलेली ही जात बहुसंख्याक जातच मानावयास हवी. याहून विशेष म्हणजे या जातीला बहुसंख्याक जातीसारखे वागण्याची सवय अजून लागलेली नाही. म्हणजे आपण एकत्र राहिलो नाही तर आपली राजकीय सत्ता आपल्या हातून निसटेल, अशी या जातीला भीती वाटते. याचा एक परिणाम असा की, राज्यपातळीवर या जातीचे सगळे पुढारी आपले मतभेद तुटण्यापर्यंत कधी ताणत नाहीत, सर्व भांडणे चालू ठेवून एकत्र राहतात.

महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर मराठा जातीच्या या मनोवृत्तीचा पुरेपूर फायदा यशवंतरावांनी काँग्रेसच्या आणि आपल्या सत्तेच्या बळकटीसाठी करून घेतला. महाराष्ट्रनिर्मितीच्या तात्कालिक प्रश्नावर विरोधी पक्षांनी काँग्रेसला दिलेले आव्हान चव्हाणांनी मोडून काढले आणि विरोधी पक्षाचे, विशेषत: 'शेतकरी–कामगार पक्षाचे, प्रतिष्ठित नेते काँग्रेसमध्ये ओढून आणले. ते 'मराठा जातीचे, शेतकरी पेशाचे आणि ग्रामीण भागाचे नेतृत्व आज सत्तेवर आहे' या भावनेला हाक देऊन. मला आठवते की, त्या वेळी भाई माधवराव बागल यांनी याच भावनेने स्वत: काँग्रेसप्रवेश तर केलाच; पण 'सत्तेच्या मांडवात यशवंतरावांनी पंक्ती मांडल्या आहेत, झटपट पाटावर बसायला चला!' अशा आशयाचे एक पत्रकही काढले होते.

पण केवळ सत्तेच्या मांडवात मराठा समाजाच्या जेवणावळी उठविणे एवढ्यातच चव्हाणाचे कर्तृत्व सामावलेले असते तर चव्हाण दिल्लीला गेल्यावर सर्वोच्चपदी जातील अशी अपेक्षा करणे अघोचरपणाचे ठरले असते. चव्हाणांनी सत्ता मराठा समाजाच्या हातात दिली इतकेच नव्हे तर मराठा समाजाचा सत्तेविषयीचा दृष्टिकोनही बदलून टाकला! यशवंतरावांच्या कर्तृत्वाचे रहस्य यात आहे.

मताचा हक्क प्रत्येक नागरिकाला मिळणार हे निश्चित झाल्यावर बहुसंख्य समाजाला सत्तेवर येण्याचा मार्ग खुला झाला, हे उघडच आहे; पण शासन ही अखेर एक संस्था आहे. त्या संस्थेच्या स्वत:च्या काही अटी आहेत. एखादा समाज बहुसंख्य आहे एवढ्या एकाच कारणासाठी तो आपल्या म्हणण्याप्रमाणे शासनाला वाकवू शकत नाही. मराठा समाजाची शेतकरी, ग्रामीण जीवनशैली आणि आधुनिक, शहरी, ब्राह्मणी आणि मध्यमवर्गीय शासन यांचा सांधा जुळविणे ही कठीण गोष्ट होती. यशवंतरावांनी हा सांधा जुळवून बहुसंख्य ग्रामीण समाजाला आपण शासन हाताळू शकतो याचा आत्मप्रत्यय दिला ही त्यांनी मराठा समाजाच्याच नव्हे तर महाराष्ट्राच्या इतिहासात केलेली मोलाची गोष्ट आहे!

ही सांधेजोड करण्यासाठी यशवंतरावांना मराठा समाजातील पुढारलेल्या वर्गाच्या विचारांना आणि वागणुकीला, वरवर का होईना एक ब्राह्मणी आणि मध्यमवर्गीय वळण द्यावे लागले ही गोष्ट तत्त्वत: तरी अवघड होती. कारण ज्या सत्यशोधकी चळवळीतून ब्राह्मणेतर चळवळ निर्माण झाली आणि जिचा प्रभाव चव्हाणांच्या पिढीवर होता, ती चळवळ भिक्षुकांचा जसा तिरस्कार करीत असे तितकाच गृहस्थ ब्राह्मणांच्या

वागणुकीचा आणि विचारांचाही करीत असे. स्वातंत्र्योतर भारतीय शासन हे गृहस्थ ब्राह्मणांनी चालू केलेल्या राष्ट्रवादी चळवळीतून निर्माण झालेले आहे असे म्हणणे अगदी काटेकोर अर्थाने कदाचित् बरोबर नसले तरी ढोबळमानाने खरे आहे ब्राह्मणेतर पक्ष राष्ट्रवादी चळवळीत सामील झाला होता खरा; पण म्हणून राष्ट्रवादी चळवळीला अभिप्रेत असणारी मध्यमवर्गीय जीवनशैली त्या पक्षाला स्वीकारार्ह वाटत होती असे नाही.' मराठा समाजाला शासनावर बसविताना यशवंतरावांनी या समाजातील पुढारीवर्गाला, निदान तत्त्वतः तरी ब्राह्मणी मध्यमवर्गीय तोंडावळा घ्यायला लावला ही गोष्ट स्थूलमानाने खरी आहे. हे चांगले झाले की नाही हा वादाचा विषय असला तरी ते महत्त्वाचे आहे याविषयी वाद नसावा.

मराठा शेतकरी समाजातील पुढारीवर्गाने मध्यमवर्गीय जीवन-व्यवहाराचा जो अंगीकार केला त्याचा एक परिणाम असा झाला की, या वर्गाचा शेतीकडे पहाण्याचा दृष्टिकोन बदलला आजपर्यंत शेतीकडे एक धंदा म्हणून पहाण्याचा विचार शेतकऱ्याच्या मनात येण्यापेक्षा शेती हा एक जगण्याचा मार्ग आहे अशी भावना होती. शेतीकडे धंदा म्हणून पाहू लागल्यावर शेतीतून जास्तीत जास्त पैसा मिळविण्याची इच्छा निर्माण झाली. त्यातून हल्लीच्या बागाइती-कारखानदार शेतकरीवर्गाचा उदय झाला.

थोडक्यात म्हणजे यशवंतरावांनी आपल्या कारकीर्दीत महाराष्ट्रात शासनाभिमुख असा नवा वर्ग तयार केला ही महाराष्ट्राच्या अलीकडील इतिहासात त्यांनी बजाविलेली महत्त्वाची कामगिरी आहे यासाठी त्यांनी शासनाची भारतीय राष्ट्रवादी चळवळीतून निर्माण झालेली घाटणी बदलली नाही तर नव्या सत्ताकांक्षी गटाला आपली जगण्याची चाकोरी आणि विचारसरणी बदलायला लावली. ही गोष्ट चांगली झाली की वाईट झाली. यावद्दल दोन्ही बाजूंनी बरेच बोलता येण्यासारखे आहे.

## दिल्लीतील अपयश

यशवंतरावांनी हा जो नवा सत्ताधारी वर्ग निर्माण केला त्यामागील सूत्र काय होते? मुंबईतील शासनकेंद्रापासून पंचायतीपर्यंत सत्तेत वाटा असलेल्या कार्यकर्त्यांची फळी निर्माण करणे हे यामागचे सूत्र होते. यशवंतराव जो नवा विचार घेऊन दिल्लीला जाणार होते, तो विचार हा होता. त्याची एक सूचना त्यांनी मी वर उल्लेखिलेल्या शनिवारवाड्यावरील सभेत केलीही होती. ते म्हणाले होते, 'वैमानिक विमानातून उंच उडून लढत असतो. त्याच्या लढण्यावर लढाईचा अंतिम निर्णय होत असतो; पण त्याला अंगात घालायला गरम कपडे लागतात. ती लोकर तयार करायला धनगर लागतो. धनगराला खाऊ घालायला शेतकरी लागतो. लोकर कातून, विणून कपडे तयार करायला कारखानदार आणि कामगार लागतात. शेतकऱ्या-कामगारापासून आघाडीच्या सैनिकापर्यंत सर्व फळ्या बांधाव्या लागतात.' राजकारणाची सर्वांगीण बांधणी सत्तेत वाटा असणाऱ्या कार्यकर्त्यांच्याद्वारा करणे हा चव्हाणांचा नवा विचार पुढे आणण्याची संधीच यशवंतरावांना मिळाली नाही हे त्यांच्या अपयशाचे मुख्य कारण आहे.

यशवंतराव दिल्लीला गेल्यावर नेहरू अधिक काळ जगले असते तर यशवंतरावांना ही संधी मिळाली असती; पण नेहरू दीड वर्षातच वारले! त्यानंतर एक्काहत्तर सालपर्यंत दरबारी राजकारणाचा प्रभाव होता. यशवंतरावांच्या राजकारणाला त्यात वाव नव्हता. दिनेश सिंग, सुब्रह्मण्यम्, के. के. शहा अशी प्यादी चलाखीने हलवून मात केल्याचा देखावा करणाऱ्या इंदिरा गांधींनाच ते जमले असते ७१ सालानंतर संघटित जनतेपेक्षा विस्कळित जमावाला झुलवून सत्ता गाजविणाऱ्या वैभूतिक नेतृत्वाचा कालखंड आला. यशवंतराव कार्यकर्त्यांची फळी उभी करणारे नेते! जमावाला चकित करणे, दिपवून टाकणे हे त्यांच्या कोष्टकात बसत नाही.

यशवंतराव दिल्लीला अपयशी ठरले हा यशवंतरावाचा दोष नाही. अखिल भारतीय पातळीवरील राजकारण पुरेसे प्रौढ आणि लोकशाहीला सन्मुख असे नव्हते हे त्याचे कारण आहे. अशा स्थितीत केवळ एक चोख प्रशासक इतकीच यशवंतरावाची भूमिका उरली.

## चालू राजकारणाचा भोवरा

स्वातंत्र्योत्तर चालू असणाऱ्या बाबू-राजकारणाची बैठक जर आपण मानणार असू आणि त्या राजकारणात जनतेतील अधिकाधिक गटांना संघटित रीत्या सामावून घेण्यातच देशाचे हित आहे असा आपला विश्वास असेल तर चव्हाणांनी महाराष्ट्राच्या राजकारणात आणलेला नवा विचार देशव्यापी पातळीवर स्वीकारणे हेच पथ्यकर आहे ही गोष्ट जर आपण मान्य केली तर यशवंतराव या व्यक्तीचे काय व्हायचे असेल ते होवो; पण चव्हाणांनी महाराष्ट्रात सुरू केलेल्या राजकारणाचे भवितव्य उज्ज्वल आहे हे निश्चित.

खुद्द यशवंतराव मात्र आज पिंजऱ्यात सापडल्यासारखे झाले आहेत. कार्यकर्त्यांची फळी उभारण्याचे राजकारण आजच्या काँग्रेसमध्ये राहून करणे त्यांना अशक्य आहे. कारण कार्यकर्त्यांना सत्तेत वाटा देण्यावर त्यांच्या राजकारणाची मदार होती आणि सत्ता तर काँग्रेसच्या हातून निसटून चालली आहे. अशा स्थितीत खरे म्हणजे सत्ताधारी झालेल्या जनता पक्षात येणे हेच यशवंतरावांच्या दृष्टीने क्रमप्राप्त आहे.

पण मनुष्य इतक्या सहजी बदलू शकत नाही. काही ऐतिहासिक योगायोगाने यशवंतराव योग्य वेळी बाईंची साथ सोडू शकले नाहीत त्यामुळे आज ते काँग्रेसमध्ये रुतून पडले आहेत. त्यांनी जनता पक्षात येणे आणि जनता पक्षाने त्यांना आपल्यात घेणे व्यवहारतः कठीण आहे. असे काही करणे हे दोन्ही बाजूंनी संधिसाधूपणाने वागल्यासारखे होईल. तथापि, राजकारणाचे गाडे पुढे सरकायचे असेल तर संधिसाधूपणाचा दोष पत्करूनही यशवंतरावांनी पक्षांतर करणे इष्ट होईल.

सध्या सर्व राजकारण भोवऱ्यात सापडले आहे आणि त्यातून सुटकेचे तीन पर्याय संभवतात. पहिला म्हणजे पुन: कोणी तरी महानेता उदयाला येणे. (यासाठी इंदिराबाई तयारच आहेत.) दुसरा म्हणजे संघटित कार्यकर्त्यांनी राजकारण चालविणे सध्याच्या स्थितीत सत्तेचे लुकण असल्याखेरीज कार्यकर्त्यांची फळी उभारली जाणार नाही. तिसरा म्हणजे सध्याच्या राजकारणाशी फटकून वागणाऱ्या गटांनी संघटित होऊन सत्तेत वाटा मागणे आणि त्यातून राजकारणाला नवे वळण लागणे हा मार्ग लांबवरचा आणि धोक्याचाही आहे.

या विश्लेषणाचा इत्यर्थ असा की, सत्तेत वाटेकरी असणाऱ्या कार्यकर्त्यांची संघटना उभारणे हाच नजीकच्या भविष्यकाळातील सर्वांत इष्ट आणि कमीत कमी धोक्याचा मार्ग आहे. या मार्गावरून वाटचाल करावयाची असेल तर यशवंतरावांइतका चोख आणि तज्ज्ञ पथदर्शक महाराष्ट्रात तरी दुसरा नाही आणि भारतीय राजकारणातही क्वचितच कोणी असेल. □

जनता पक्ष स्थापन झाला त्या दिवशी श्री. यशवतराव चव्हाण यानी त्या पक्षाची कुंडली मांडली, त्यानी म्हटले की, जनता पक्ष म्हणजे जनसघ म्हणजे रा. स्व. संघ.

हा थोडा गंमतीचा, विनोदाचा भाग असेल असे त्या वेळी वाटले होते; पण वी. पी. सी. सी. व एम्. पी. सी. सी. चे एकीकरण करण्यासाठी झालेल्या सभेत त्यांनी परत तसेच म्हटले. त्यांच्या त्या उद्गारानंतर धामणगाव (जि. अमरावती) येथे अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. अण्णासाहेब देशमुख यांच्या नेतृत्वाखाली गृहमंत्री चरणसिंग याच्या पुतळयाची मिरवणूक काढण्यात आली व चौकाचौकात त्या पुतळयाला जोडे मारून अभद्र शिव्या देण्याचा सोहळा पार पडला. त्यानंतर पुणे येथे पंतप्रधान मोरारजीभाईंच्या मोटारीवर चिखलाने माखलेली चप्पल फेकण्यात आली. त्यानंतर इंदिराबाईंच्या पवनार भेटीच्या वेळी 'जनता पार्टी कौन है, आर. एस्. एस्. की दलाल है!' अशा घोषणा ब्रह्मविद्या आश्रमात जमलेल्या काँग्रेस व यूथ काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी दिल्या.

महाराष्ट्रात विरोधकाना आर एस् एस्. ही शिवी दिली की बदनाम करता येते हा जुना अनुभव ध्यानी बाळगून यशवतरावानी या प्रचार मोहिमेची सुरुवात केलेली दिसते. म्हणून त्याच्या विधानाची गंभीरपणे दखल घेण्याची गरज आहे.

आणीबाणीचे समर्थन करताना इंदिराबाई, यशवंतराव आणि मंडळीनी म्हटले होते की, संप, मोर्चे, बंद यामुळे देश रसातळाला चालला होता. ते सर्व आणीबाणीने थाबवले आहे 'सारे कसे शांत शांत' झाले आहे! मोर्चे, निदर्शने ही राष्ट्रविघातक कृत्ये आहेत असे म्हणणाऱ्या काँग्रेसवाल्याचे जनता पक्षाच्या विजयानतर एकदम मतपरिवर्तन झालेले दिसते. मोर्चे, निदर्शने हाच खरा राष्ट्रनिर्मितीचा मार्ग होय, अशी त्यांची बालबाल खात्री पटली आहे. वाटते की, सुसगती हा गाढवाचा गुणधर्म आहे, काँग्रेसचा नाही, अशी त्याची दृढ श्रद्धा आहे!

जनता पक्ष म्हणजे आर. एस्. एस्. असे म्हणून यशवंतरावाना काय सुचवायचे आहे? आर. एस्. एस्. ही ब्राह्मण नेतृत्वाखालील सघटना आहे असे सुचवायचे आहे काय? की गाधीजीच्या खुनाशी आर. एस्. एस्. चा सबंध होता असा जो गैरसमज काही जणानी हेतुपुरस्सर पसरवला होता त्याला उजाळा द्यायचा आहे!

आर. एस्. एस्. ही स्वतत्र सघटना आहे. जनता पक्षात ती सामील झालेली नाही. जनता पक्षात जनसंघ हा पक्ष विलीन झाला आहे. तसेच संघटना काँग्रेस, भारतीय लोकदल आणि समाजवादी पक्ष हेही सामील झाले आहेत. चंद्रशेखर, मोहन धारिया, राजारामबापू पाटील याच्यासारखे काँग्रेसवाले आणि श्री. जगजीवनराम

# गांधीवादाचे खरे मारेकरी कोण? गोडसे की यशवंतराव?

पन्नालाल सुराणा

यांचा लोकशाहीवादी कॉंग्रेस हा पक्षही सामील झालेला आहे; पण जनता पक्ष म्हणजे ही केवळ चार–पाच पक्षाची बेरीज नसून जनशक्तीचा झालेला तो गुणाकार आहे, या वस्तुस्थितीकडे यशवतरावांना डोळेझाक करायची असेल तर आमची हरकत नाही

एके काळी रा. स्व. सघाचे स्वयसेवक असलेले अनेक जण जनता पक्षात सामील झालेले आहेत- ही गोष्ट खरी आहे. ते काही जण जबाबदारीच्या जागा भूषवीत आहेत हेही खरे आहे; पण म्हणून जनता पक्ष म्हणजे आर एस्. एस्. असेल तर ब्रिटिशांच्या काळात ज्यानी कॉंग्रेसच्या चळवळीला विरोध करून रगरूट भरतीचे काम केले ते आज यशवंतरावांच्या कॉंग्रेस पक्षात महत्त्वाच्या जागा भूषवीत आहेत, यावरून असे म्हणावयाचे काय की, आजचा कॉंग्रेस पक्ष ब्रिटिशाचे दलाल चालवीत आहेत?

आर एस् एस् म्हणून ब्राह्मण असे यशवतरावाना सुचवायचे असेल तर आज काय वस्तुस्थिती आहे? महाराष्ट्रातील जनता पक्षाच्या तेवीस आमदारांपैकी फक्त चार जण ब्राह्मण आहेत जनता पक्षाच्या तिकिटावर लोकसभेत निवडून गेलेल्यात मधू दडवते, रामभाऊ म्हाळगी, मृणालताई गोरे, सुब्रह्मण्यम स्वामी, चद्रकात परुळेकर हे पाच ब्राह्मण आहेत. बाकीचे बारा इतर जातीचे आहेत. राजे विश्वेश्वरराव हे आदिवासी नेते जनता पक्षाच्या चिन्हावर निवडून आले. श्री. विठ्ठलराव हाडे हे मराठा, हरिभाऊ महाले हे आदिवासी आणि सी. बी. कांबळे हे दलित जातीय निवडून आले आहेत लक्ष्मणराव मानकर हे कहार जातीचे कार्यकर्ते आहेन आणि बापूसाहेब काळदाते, पुडलिक दानवे, चंद्रकात पाटील, य. म. बोरोले, रतनसिह राजदा, सोनूसिंग पाटील, संभाजीराव काकडे हे मराठा लेवा राजपूत या जातीचे आहेत. मोहन धारिया यांना जात आहे असे यशवतराव आता मानायला लागले असले तर ते मारवाडी आहेत.

खुद्द आर. एस् एस् तरी कितपत ब्राह्मण राहिला आहे? येरवडा, नासिक, नागपूर या मध्यवर्ती तुरुगात येऊन यशवतरावानी पाहायचे होते म्हणजे त्याना दिसले असते की, मराठा, कुणबी, दलित, आदिवासी, वजारी या जातीचेच स्वयसेवक तेथे बहुसख्येने होते.

## पुरोगामी परिवर्तनाआड ब्राह्मण्य येते?

संघाचे व इतर पक्षातले ब्राह्मण कार्यकर्ते जुने कर्मकांड पाळीत असले तर तेवढ्याने ते जातीयवादी ठरतात काय?, ज्याची श्रद्धा आहे ते निष्ठेने कर्मकाड करतात त्यात सर्व जातीचे लोक आहेत. तिरुपतीला जाऊन केसाची बट अर्पण करणे, दिल्लीला वेदोनारायणाच्या समेलनात जाऊन त्याचा आशीर्वाद घेणे, कुभमेळ्यात भगवी साडी नेसून सहभागी होणे आदी कृत्ये इदिराबाईंनी कर्मकांडावरील निष्ठेने केली होती की जनतेची दिशाभूल करण्यासाठी हे एक इदिराबाईंनाच माहीत. यशवतरावाच्या दुर्दैवाने इंदिराबाईच अद्यापही कॉंग्रेसच्या नेत्या आहेत. मग कॉंग्रेसचे नेतृत्व ब्राह्मणी आहे असे म्हटलेले यशवतरावाना आवडेल काय?

ज्याचा जन्म ब्राह्मण आई–बापाच्या पोटी झाला ते सगळे कुचकामी, वाया गेलेले असे यशवतरावाना सुचवायचे आहे का? महाराष्ट्रात नेमस्तवादी राजकारणाला समर्थपणे आव्हान देऊन महात्मा गांधींचे नेतृत्व आणि विचारधारा यांचा प्रसार करण्याचे काम शंकरराव देव, गंगाधरराव देशपांडे, नरकेसरी अभ्यकर, बॅ. वामनराव जोशी यानी केले वैचारिक आघाडी आचार्य स. ज. भागवत, आचार्य दादा धर्माधिकारी आणि आचार्य शं. द. जावडेकर यानी साभाळली. आध्यात्मिक वारसा आचार्य विनोबा भावेंनी चालविला. बाबा आमटे, अप्पासाहेब पटवर्धन, अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांनी रचनात्मक कार्यात स्वतःला गाडून घेतले. संकुचित जातीयवादी विचारसरणीला प्रखरपणे विरोध करून सामाजिक व आर्थिक क्रांतीचे लोण तरुण पिढीपर्यंत पोहोचविण्याचे काम सानेगुरुजी, शिरूभाऊ लिमये, रावसाहेब व अच्युतराव पटवर्धन, एसेम् जोशी व ना. ग. गोरे यानी केले. हैदराबादच्या मुक्तिसग्रामाचे नेतृत्व स्वामी रामानद तीर्थ, बाबासाहेब पराजपे, अनंतराव भालेराव यांनी केले. हुकूमशाहीशी झुज देण्याचे काम यदुनाथ थत्ते, श्री ग. माजगावकर यानी केले प्रखर न्यायनिष्ठा, न्याय व समता या तत्त्वांच्या प्रस्थापनेसाठी आर्थिक व सामाजिक परिवर्तनाचा आग्रह धरताना या समाजधुरीणाची ब्राह्मण जात आडवी आली का? साम्यवादी क्रांतीसाठी अहोरात्र झटण्यात ज्याची उभी हयात गेली ते भाई डांगे, एस्. वाय्. कोल्हटकर, गोदूताई परुळेकर आणि एम्. के. लिमये याचे ब्राह्मणत्व कशात शिल्लक राहिले आहे? परिवर्तनाच्या चळवळी चालविताना यानी स्वकीयाचा रोष पत्करला, पण आपल्या निष्ठांशी तडजोड केली नाही. केशवराव जेधे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर याना सर्वतोपरी साहाय्य करण्याचे व्रत त्यानी आचरले. हा सगळा इतिहास यशवंतरावाना माहीत नाही काय?

या सर्व पुरोगामी परिवर्तनवादी प्रयत्नांचा वारसा महाराष्ट्रातील जनता पक्ष चालवीत आहे. जनता पक्षामध्ये जनसंघ विलीन झाला त्यापूर्वीच जनसघाने चातुर्वर्ण्याचा स्पष्ट शब्दात धिक्कार केला होता. जनसंघाच्या तिकिटावर निवडून येणाऱ्यांत रामभाऊ म्हाळगीपेक्षा अर्जुनराव वानखेडे, उत्तमराव पाटील, दिलवरसिंग पडवी याचीच सख्या जास्त असायची छोटे शेतकरी, शेतमजूर, आदिवासी, दलित जातीय याच्या लढ्यात जनसघमित्र कधीच मागे राहिले नाहीत. कृष्णराव भेगडे हे अशा आदोलनात प्रथमपासूनच आघाडीवर असायचे कॉंग्रेसमध्ये गेल्यावर ते निष्प्रभ झालेले दिसतात. महात्मा गाधीच्या कल्पनाना पूर्वाश्रमीच्या जनसघीयाचा विरोध असायचा तसा समाजवादी, साम्यवादी याचाही असायचा. भा. क. पक्षाने म. गाधी हे भाडवलदाराचे हस्तक आहेत असा प्रचार स्वातत्र्यपूर्व काळात सतत चालवला होता. स्वातत्र्यप्राप्तीनतरसुद्धा 'भाकपा'ने गाधी–नेहरूची भावना 'साम्राज्यशाहीची कुलुगी कुत्री (Stooges) अशा शब्दात केली होती, पण कम्युनिस्टानाही बदलावे लागले हे आपण आपल्या डोळ्यादेखत पाहिले आहे. 'तेलगण लाईनचा त्याग करून अमृतसरला संसदीय व शाततामय प्रतिकाराचा अंगीकार त्यांना करावा लागला. कम्युनिस्टांसारखे विशिष्ट विचारसरणीचा आग्रह धरणारे जर बदलू शकतात, गांधीवादी मार्गाचा अवलंब करू शकतात तर पूर्वाश्रमीचे जनसंघवाले भारतीय परंपरेशी अधिक सुसगत असलेल्या गाधीवादी मार्गाचा मनोमन प्रामाणिकपणे अगीकार करू शकत नाहीत असे कुठल्या तोडाने म्हणायचे?

याच सदर्भात गाधीमुनाची चर्चा होत असते, ती आडमार्गाने

करण्यापेक्षा उघड उघड, स्पष्टपणे व मोकळेपणाने केलेली चांगली. गांधीजीचा खून नथुराम गोडसेने केला ही वस्तुस्थिती आहे. त्याबाबत आवश्यक ती कायदेशीर कारवाई झाली असून सबंधितांना शिक्षाही झाल्या आहेत व खटल्यात व त्यानंतर कपूर कमिशनच्या अहवालात हे स्पष्ट झाले आहे की, गांधीजीचा खून करण्याचा कट संघ वा इतर कुठल्याही संघटनेने केलेला नव्हता. याबाबत संघावर चिखलफेक करणाराचा हेतू संकुचित राजकीय लाभ मिळविणे हाच असतो

## गांधीवादाचे मारेकरी

नथुराम गोडसेने गांधीजींच्या शरीराचा खून केला, पण त्यांच्या आत्म्याचा खून कोण करीत आहे ? महाराष्ट्रात यशवंतराव हेच त्या पापाचे सर्वांत मोठे भागीदार आहेत !

सत्य व अहिंसा ही दोन तत्त्वे गांधीजीना प्राणापेक्षा प्रिय होती. अंत्योदय हे त्यांच्या जीवनाचे सूत्र होते. सत्तेपेक्षा सेवेचा मार्ग त्याना अधिक पसंत होता. सार्वजनिक जीवन स्वच्छ असण्यावर त्याचा कटाक्ष होता. स्वातन्त्र्यपूर्व काळात म गांधीच्या प्रभावामुळे देशभर देशभक्तीची, समाजसेवेची व त्यागाची लाट उसळली होती. अनेक तरुण स्त्री–पुरुष भारतभूमीच्या मुक्ततेसाठी प्राणाचे बलिदान करायला अहमहमिकेने पुढे येत होते. सार्वजनिक जीवनात साधी राहणी व उच्च विचारसरणीची प्रतिष्ठा होती. महाराष्ट्रातही असेच वातावरण होते.

स्वातंत्र्योत्तर काळात व विशेषतः १९६० साली संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आल्यावर महाराष्ट्रातील गांधीवादी मूल्यांचा झपाट्याने ऱ्हास झालेला दिसून येतो. उच्च ध्येयासाठी निष्ठाभावनेने काम करणे हा वेडेपणा मानला जाऊ लागला. सत्तेच्या स्थानाना भलतीच प्रतिष्ठा प्राप्त झाली. सार्वजनिक व खाजगी जीवनात डामडौल, छानछोकी वाढली. सत्तास्पर्धा व स्वार्थबाजीला उधाण आले. त्यासाठी सांगण्यात यशवंतरावाची सत्यनिष्ठा प्रकट झाली की निर्भयता ? गांधीजीच्या कुठल्या तत्त्वानुसार यशवंतराव वागत होते ?

सत्याचा अपलाप करण्याच्या यशवंतरावांच्या कलेची त्यांचे सर्व शिष्य मनोभावे उपासना करीत आहेत त्यांचे पट्टशिष्य, महाराष्ट्राचे गृहमंत्री शरद पवार यांनी तिसाव्या स्वातन्त्र्यदिनाच्या सुमुहूर्तावर म्हटले की, जनता पक्षाचे सरकार सरजाम्यांचे व भांडवलदाराचे हस्तक आहे. हे नवे सरकार गोरगरिबांच्या जमिनी काढून घेत आहे. वास्तविक त्यांना हे चांगले माहीत आहे की, शेतजमीन काढून घेणे वा तिचा पट्टा कुणाला देणे याचा अधिकार केंद्रसरकारला नसून राज्यसरकारला आहे. केंद्रामध्ये जनता पक्षाचे सरकार आले असले तरी महाराष्ट्रात कॉंग्रेसचेच सरकार आहे. गेल्या दोन वर्षांत ठाणे, नासिक, धुळे, नादेड, यवतमाळ, चंद्रपूर या जिल्ह्यातील आदिवासीच्या जमिनी महाराष्ट्र सरकारने काढून घेतल्या त्या काय मोरारजीच्या सांगण्यावरून ? अहिंसा हे महात्मा गांधीजीचे दुसरे परमतत्त्व. या तत्त्वाचे पालन यशवंतराव आणि त्यांचे साथीदार कसे करीत आले आहेत, हे सातारा व सांगली जिल्ह्यातील जनतेला चांगले परिचयाचे आहे. ४ नोव्हेंबर १९६८ रोजी जयप्रकाश याच्यावर पाटणा येथे पोलिसानी लाठीहल्ला केला होता त्याचा निषेध करण्याचा शिष्टाचारसुद्धा श्री. यशवंतराव चव्हाणांनी दाखविला नव्हता. महाराष्ट्रात गेल्या पंधरा वर्षांत आपल्या राजकीय विरोधकाच्या सभा उधळणे, बुवा सामंतासारख्या आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्याचा खून करणे, अकलूज येथे डॉ. बापूसाहेब काळदातेंच्या सभेवर दगडफेक करणे हे सगळे प्रकार यशवंतरावाच्या कॉंग्रेसवाल्यानीच केले आहेत.

## अंत्योदयासाठी तुम्ही काय केले ?

अंत्योदय हे गांधीजीनी प्राणाहून प्रिय मानलेले तत्त्व होय. यशवंतराव आणि त्यांच्या कॉंग्रेस पक्षाने दलितांना समान संधी मिळावी यासाठी काय केले ? पुणे जिल्ह्यातील बावडा येथे हरिजनांवर बहिष्कार टाकण्यात महाराष्ट्र सरकारच्या एका मंत्र्याच्या भावाने पुढाकार घेतला होता हे न्यायालयात सिद्ध झाले गावोगावी पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नावरून दलितावर बहिष्कार टाकण्यात कॉंग्रेस पुढाऱ्याचाच पुढाकार असतो. डॉ. बाबा आढावाच्या 'एक गाव एक पाणवठा' मोहिमेत किती कॉंग्रेसवाले सहभागी झाले होते? या चळवळीचे भांडवल करण्याचा मात्र कॉंग्रेसवाल्यानी प्रयत्न केला. राजश्री शाहूमहाराजाच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने महाराष्ट्र सरकारने श्री. शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली 'एक गाव एक पाणवठा समिती' नेमली होती. या समितीने स्वतंत्रपणे कुठल्याही गावाचा प्रश्न हाती घेतला नाही. जिथे समाजवादी कार्यकर्त्यांनी चळवळ सुरू केली होती अशा गावीच फक्त या समितीने भेटी दिल्या. तरी पांगरीकुटे या गावी प्रश्न सामोचाराने मिटला नाही. अखेरीस डॉ बाबा आढाव, आमदार प्रधान आणि विजय तेंडुलकर यांना तिथे सत्याग्रह करावा लागला एकदाचा तिथला पाणवठा सुरू झाला. पुढे आणीबाणी आली. सर्व 'प्रतिगामी' कार्यकर्ते स्थानबद्ध करण्यात आले होते. त्यामुळे आपले काम संपले असे मानून शरद पवारानी 'एक गाव एक पाणवठा समिती'ची बैठकसुद्धा बोलाविली नाही. एवढेच नव्हे तर धुळे जिल्ह्यातील एक दलित कार्यकर्ते श्री. चव्हाण यांना केवळ स्थानिक आकसामुळेच स्थानबद्ध केले. पांगरीकुट्याचे डॉ. वसंतराव गायकवाड आणि किसन पहिलवान याना मिसाखाली स्थानबद्ध करण्यात आले, पण त्याना राजबंदी न मानता साध्या कैद्याप्रमाणे दुसऱ्या वर्गात ठेवण्यात आले. डॉ गायकवाडांची पत्नी बाळंतीण झाली तरी त्याना पॅरोलवर सोडले नाही. हे सर्व कॉंग्रेसवाल्यानी अंत्योदयाच्या प्रेरणेतूनच केले असे मानावयाचे काय ?

शिरगावच्या दलित महिलावर अत्याचार करणारे, धाकलीच्या गवईबंधूचे डोळे काढणारे, नगर जिल्ह्यातील अक्कलवाडीच्या दलितांवर बहिष्कार टाकणारे, शहादा तालुक्याच्या पाडळदे बुजुर्ग या गावी सुशीला निकुंभ व सुमन बगले या दलित महिलावर बलात्कार करणारे, अंबड तालुक्यातील येवले या गावी उत्तम मुकुंदाचे हातपाय तोडणारे हे सगळे कोण ? जनता पक्षाचे कार्यकर्ते आहेत काय ? बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांनी स्पष्टपणे म्हटले आहे की, दलितावर अत्याचार करणाऱ्यांत कॉंग्रेसवाल्याचाच भरणा आहे आणि या सर्व अत्याचाराविरुद्ध आवाज उठविणाऱ्या दलित–पँथरच्या मोर्चांवर शरद पवाराचे पोलिस लाठीहल्ला करतात !

सत्तेपेक्षा सेवेला महत्त्व द्यावे ही गांधीजीची शिकवण होय.

यशवतरावांनी नेमके याच्या उलट महाराष्ट्रातील राजकारणाला वळण लावले आहे. कार्यकर्त्यांना प्रामाणिकपणे निष्ठेने जनसेवा करण्याला उत्तेजन देण्याऐवजी यशवंतरावानी सत्तेची लालूच दाखवून अनेक विरोधी कार्यकर्त्यांना फोडले. पटापटा सत्तास्थानावर बसविले. सत्तेची इतकी लालसा वाढली आहे की, राजकारणात सध्या उमेदवारी-करायला कोणीही तयार नाही. राजकारणात पडावयाचे ते आमदार, खासदार किंवा मंत्री होण्यासाठीच, अशी समाजविघातक परपरा यशवंतरावानी निर्माण केली. सत्तेवर बसलेल्या माणसाची आसक्ती इतकी वाढली आहे की, मोठी सत्ता मिळाल्यावर छोटी सत्ता सोडायलासुद्धा ते तयार होत नाहीत ! श्री. शिवाजीवराव पाटील सहकारमत्री झाले; पण धुळे जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्षपद आणि महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अध्यक्षपद सोडायला ते तयार नाहीत. सत्तेचा वापर जनसेवेसाठी न करता स्वत.ची मालमत्ता वाढविण्यासाठी कसा करावा यात ते तरबेज झाले आहेत. विरोधी पक्षीयांनी त्याच्या मालमत्तेचा तपशील देऊन म्हटले आहे की, गेल्या १५ वर्षांत त्यांनी दीड कोटीची सपत्ती मिळविली आहे. आपली मालमत्ता अवघी दहा लाख रुपयाची आहे असे ते म्हणाले. त्याना श्री. तेंडुलकरानी तार करून कळविले की, त्यांची सर्व मालमत्ता दहा लाखांस विकत घ्यायला ते तयार आहेत. यावर मात्र शिवाजीराव मौन व्रत पाळून आहेत !

## ‘यादवी युद्ध’ – गांधींची भाषा ?

देशभर उसळलेल्या जनतालाटेमुळे आपले सिंहासन डळमळू लागले आहे, हे यशवंतरावांच्या शिष्यांना जाणवले आहे. भीतिगंडापोटी अधिक आक्रमक पवित्रा घेऊन यशवंतराव मोहिते यादवी युद्धाची भाषा बोलू लागले आहेत. ही भाषा गांधीजींच्या शिकवणुकीशी सुसंगत आहे असे यशवंतराव चव्हाणाना म्हणावयाचे आहे काय ? याना म्हणे आता उत्तरेचे वारे सहन होत नाही. स्वत.ला मार्क्सवादी म्हणविणाऱ्या यशवंतराव मोहित्याना उत्तरेकडून आलेले इंदिरा गांधी व संजय गांधी याचे सरजांमशाही वारे सुखद वाटले; पण जयप्रकाशाच्या सद्विचाराचे व संपूर्ण क्रांतीचे वारे मात्र त्याना झोंबू लागले आहे.


यशवंतराव मोहित्यांच्या पावलावर पाऊल टाकून नासिक जिल्ह्यातील सटाणाचे नगराध्यक्ष व आमदार पडित-धर्मा पाटील हेही मारवाडी–गुजराथ्यावर आगपाखड करू लागले आहेत; पण आज गावोगाव मराठा व दलित जातींच्या छोटया शेतकऱ्याच्या जमिनी सधन मराठा शेतकरीच लुगाडीत आहेत. दुष्काळाच्या काळात आठवडयाला दहा रुपयाना दोन रुपये व्याज या सधन शेतकऱ्यांनीच उकळले होते. स्वत:ला शेतकऱ्याचे व कामगाराचे कैवारी म्हणविणारे हे सत्ताधारी कृष्णकुमार बिर्ला, जवाहरलाल दर्डा आणि सूरज रतन दामाणी या भांडवलदाराना डोक्यावर घेऊन नाचत आहेत.

डॉ. बाबा आढावानी सार्थपणे म्हटले आहे–हे शेठजी–भटजीचे दास होते.

यशवतराव चव्हाण जातिद्वेषाची मशाल पेटवून निघाले आहेत; पण आम्ही मात्र ठरविले आहे की, प्रेमाची, बधुभावाची व लोकशाही समाजवादाची फुंकर घालून ती विझवायची.

□

[ दैनिक मराठवाडा (११–९–७७) अंकावरून साभार पुनर्मुद्रित ]




लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे । मूल्य : वीस रुपये

श्री. यशवंतराव चव्हाण हे आपली नवी भूमिका वठविण्यासाठी भाषणे करीत आहेत मोर्चाचे नेतृत्व करीत आहेत. त्याचे नेतृत्व 'एकमेवाद्वितीय' ठरू नये आणि स्वत चे नेतृत्व अद्यापी टिकून आहे हे सिद्ध करण्यासाठी कलंकित इदिराजी पुन्हा राजकारणात उतरल्या आहेत. तेव्हा हे नाटकही एकपात्री होणार नाही. यशवतरावाना त्यात नायकाची भूमिका करता येणार नाही इतकी वर्षे राहिले तसे ते 'मूकनायक' राहण्याचा धोका निर्माण झाला आहे. आता 'कॉंग्रेसचे पुनर्वसन करण्यास हे 'एवंगुणविशिष्ट' यशवतराव समर्थ आहेत का ?' इंदिराजी त्याच्या मार्गात अजूनही अडथळा आणणार हे जवळपास नक्की दिसत आहे. हा देश राजेराण्यावर प्रेम करतो हे सस्थाने विलीन झाल्यावरही राजमाता आणि सस्थानिक राजे याना जी प्रतिष्ठा आपल्या समाजात मिळते त्यावरून सिद्ध आहे. किंबहुना त्या प्रतिष्ठेचा, प्रभावाचा राजकीय लाभ कॉंग्रेसला तीस वर्षे सतत मिळाला आहे लोकसभेत हे राजे-राजमाता आजही आहेत. तेव्हा सिहासन गेले, राजवैभव गेले तरी व्यक्ति यशवंतराव त्यांच्याशी सामना देतील का हा खरा प्रश्न आहे. कारण आता त्याना कुंपणावर बसता येणार नाही. एक तर पुन्हा अगतिक होऊन, तत्त्वज्ञानाचा एखादा नवा मुलामा देऊन ऐक्याच्या नावाखाली त्याना इदिराजींशी जमवून घ्यावे लागेल किंवा इदिराजी व त्याचे राजकीय गुड यांनी गेल्या अकरा वर्षांत जी एककेंद्री सत्ता आणली, लोकशाही मूल्याचा जो विध्वस केला, भ्रष्टाचाराचा कॅन्सर आणला त्या सर्वांचा स्पष्ट शब्दात धिक्कार करून इंदिराजी व त्याची राजकीय शैली याना प्रखर विरोध असणारे अनुयायी गोळा करून रणांगणात उतरले पाहिजे. यशवंतरावाचा पहिला लढा जनता पक्षाशी नाही; इंदिराजीच्या नेतृत्वाशी आहे. हा मार्ग दूरचा आहे व कष्टाचा आहे हा लढा तत्त्वाचा आहे त्यातून ताबडतोब सत्ता मिळण्याची शक्यता नाही; पण राजकारणाचे शुद्धीकरण व सुसस्कृत राजकीय नेतृत्वाची निर्मिती या देशात होण्याची आवश्यकता आहे. यशवतरावांना मिळालेली ही सधी आहे ते रॉयवादाचे एकेकाळी पुरस्कर्ते होते. रॉयसाहेबांनी राजकारणाला गुणात्मक दर्जा

# आता तलवार म्यानातून बाहेर पडली तरी काय उपयोग ?

निरीक्षक
नवी दिल्ली

गौरवाची भावना कमी होत नाही हा आपला अनुभव आहे. भोळ्या मागासलेपणाचा फायदा इंदिराजींना मिळत राहणार ! भ्रष्टाचाराचा प्रश्नही आपल्या नैतिकतेला कमीपणा आणीत नाही. एवढ्या मोठ्या पतप्रधानाने आपल्या मुलासाठी काही केले म्हणून बिघडले कोठे असेच आपण म्हणणार ! तेव्हा भ्रष्टाचारामुळे इंदिराजीचे वलय कमी होणार नाही चद्रग्रहणासारखा तो कलक तात्पुरता समजला जाईल. तेव्हा यशवंतरावाना मिळालेले आव्हान आजही जबरदस्त आहे. कारण इंदिराजीना राजकीय विधिनिषेध नाहीत. सार्वजनिक शीलाची किंमत त्याच्या दृष्टीने शून्य आहे ! सामान्य माणसे, बाजारबुणगे, अनुयायी, पुढारी, सत्तागट, पत्रकार विकत घेण्याइतका पैसा त्याचेजवळ आहे. तो काळा असेल, दुष्कृत्यांनी मिळविल असेल; पण ज्या देशात काळ्या पैशाचे स्वतंत्र अर्थकारण गेली २५ वर्षे चालले आहे, जेथे दोन्ही महासत्ता, रशिया-अमेरिका, पैशाची प्रलोभने दाखवून स्वत.चे हित साधीत असतात तेथे पैसा 'काळा' आहे आणि 'पाढरा' आहे हा प्रश्न केवळ तात्त्विक व गौण ठरतो. म्हणून पैसा आणि राजकीय पाताळयत्रीपणा, फूस, फूट आणि आता हरिजन, भूहीन शेतकरी याचेसाठी ऊर बडवून रडणे किंवा ओरडणे या मार्गांनी इंदिराजी एकट्या नेतृत्व करण्याचा प्रयत्न करतील तेव्हा देण्यासाठी, ते बुद्धिनिष्ठ करण्यासाठी आपले विचार मांडले. रॉयना लोकप्रियता मिळाली नाही; पण त्यांचे विचार आजही ताजे आहेत, या देशाला आवश्यक आहेत. यशवतराव अशा गुणात्मक राजकारणाची कास धरणार की इदिराजीच्या राजकीय झुडशाहीला व भ्रष्टाचारी शैलीला पाठिंबा देणार हा त्याच्यापुढचा खरा प्रश्न आहे कोणताही राजकीय नेता जसा परिस्थितीच्या बंधनात असतो तसेच त्याला स्वत.च्या व्यक्तित्वाचे, स्वभावाचे बधन असते-मर्यादा असतात. जे व्यक्तित्व क्रातिकारक नसते ते कधीच क्रातीचे नेतृत्व करू शकणार नाही. परिस्थिती कितीही अनुकूल झाली तरी त्याचा फायदा घेण्यास ते असमर्थ ठरते. तसा प्रयत्न जरी एखाद्या नेत्याने केला, तरी उंच झाडावरचे फळ बुटक्या माणसाने उड्या मारून तोडावयाचा प्रयत्न करावा तसे ते हास्यास्पद ठरते. मग यशवतरावाचे व्यक्तित्व आक्रमक व क्रातिकारक राजकारण करू शकेल काय ? ते वादळ निर्माण करू शकतील काय ? लोकक्षोभ सघटित करण्याची ताकद त्याच्याजवळ आहे काय ? गेल्या २० वर्षांत त्याचे जे राजकीय व्यक्तित्व दिसले ते कसे होते ? ते बदलणे शक्य आहे का ?

## किमान विवाद्य व्यक्तित्व

यशवंतराव दिल्लीत आले ते राजकीयदृष्ट्या कृष्ण मेननचा अस्त झाल्यावर नेहरूना कोणी तरी विश्वासातला व किमान विवाद्य नेता हवा होता. यशवंतरावांची लोकप्रियता, त्याची सौजन्यशीलता त्यांनी पाहिली होती म्हणून त्यांनी यशवतरावाना अक्षरशः टेलिफोन करून बोलाविले. नेहरूंच्यावर चव्हाणाची भक्ती आहे तरुणपणी नेहरू त्यांचे 'हीरो' होते. त्यामुळे त्या दडपणाखाली चव्हाण वावरले. त्यानंतर शास्त्रीचा विश्वास त्यानी संपादन केला. इदिराजी पंतप्रधान असताना आणि आताही यशवंतरावाना इंदिराजीनी कधीच दिलखुलासपणे व विश्वासाने वागविले नव्हते. त्याची कारणे दोन. एक, त्याची आत्मकेंद्रित अहंकारी वृत्ती व उच्चभ्रू तुसडेपणा! दुसरे यशवंतराव त्यांचे सतास्पर्धेतील प्रतिस्पर्धी. यशवतराव सत्तेच्या खेळीत मागे पडले होते याची विविध कारणे आहेत, पण इंदिराजींनी यशवंतरावाचे राजकीय पंख कापणे, त्यांचा राजकीय प्रभाव कमी करणे, राज्यशासनात त्यांना दुय्यम भूमिका देणे, किंबहुना त्यांचा अवमान करून त्याच्या अनुयायाना व कांग्रेस पुढाऱ्यांना स्वतच्या 'कर्तुमकर्तुम्' शक्तीचा प्रत्यय आणून देणे हेच इदिराजींचे धोरण होते व तेच आजच्या पराभवातही कायम आहे यशवंतराव गृहमत्री असताना इदिराजीनी गुप्तचरखाते काढून घेतले ते अर्थमंत्रिपद स्वीकारून घरी येतात तोच महसुली गुप्तचर विभाग अर्थखात्यातून काढून घेतला गेल्याची बातमी आली! परराष्ट्रमंत्री झाल्यावर परराष्ट्रधोरण ठरविण्यासाठी कमिटी नेमली व तिचे अध्यक्षपद श्री. पार्थसारथींकडे दिले. अगदी अलीकडे सत्ता हातून गेल्यावर बेलचीला विरोधी पक्षनेते म्हणून चव्हाण जाणार होते. त्याचा कार्यक्रम जाहीर झाला होता; पण त्याआधी इदिराजी हत्तीवरून मिरवून आल्या! यशवतरावांचा त्या इतका दुस्वास करतात! निवडणुकीत प्रचारासाठी यशवतरावाना कधीही उत्साहाने त्यानी कोठे पाठविले नाही! स्वतवरचा प्रसिद्धीचा झोत कमी होऊ नये आणि यशवतरावांना कधीही तो मिळू नये असा इदिराजी सतत प्रयत्न करीत असत. इदिराजींच्या मत्रिमंडळातील सगळेच मंत्री सरकारी नोकर होते. त्याचे ते राजकीयदृष्ट्या पाळलेले प्राणी होते! संसदीय पद्धतीत पतप्रधान हा समान दर्जाच्या मंत्र्याचा अग्रणी असतो ही प्रतिष्ठा इदिराजींनी सहकारी मंत्र्याना कधीच दिली नाही. त्यानंतर युवराजाच्या राज्यात त्याना मुजरे करावयास लावीत. चाडाळचौकडीचे राज्य असताना तीच स्थिती होती. तेव्हा या सर्व काळात यशवतरावाना कधीही बाईंच्या दरबारात त्याच्या मर्जीसारखी राजकीय प्रतिष्ठा मिळाली नाही! चौऱ्या ढाळणे एवढेच सर्व मत्र्यांचे काम असे. कधी भाषण नाही, मुक्त चर्चा नाही, मुक्त विचारविनिमय नाही. एखादा मंत्री फार बोलायला लागला तर त्याला 'समज' दिली जाई, असे हे राज्य होते! त्या राज्यात यशवतराव कधीही स्वत.च्या कर्तृत्वाने चमकले नाहीत! एखादा सनदी नोकर असतो तसेच हे सर्व मंत्री राजकीय नोकर होते मत्र्याचे टेलिफोन 'टॅप' होत. त्याच्या भेटी–गाठीकडे बारीक लक्ष असे. त्यांची नोंद केली जाई किंबहुना जगजीवनराम, चव्हाण यांना नजरकैदेत ठेवले आहे अशी अफवा आणीबाणीत उठली याचे कारण हेच होते. ती वस्तुस्थिती नव्हती; पण त्यात फारशी अतिशयोक्ती नव्हती. कोणाचेही स्वतंत्र राजकीय नेतत्व उभे राहू नये, कोणीही आपल्यापेक्षा उंच ठरू नये.हीच खबरदारी बाईंनी घेतली. म्हणून राजकीयदृष्ट्या दुबळे, निरुपद्रवी मत्री त्यांनी गोळा केले आणि राजकीयदृष्ट्या प्रबळ नेत्याना जरबेत ठेवले कॉंग्रेस हा सुजांचा, खच्ची केलेल्या नेत्याचा, राजकीय गुंडांचा पक्ष केला व त्याचे प्रतोद सरकार केले. असा सध्याच्या परिस्थितीत पोलियो झालेला हा पक्ष विरोध करण्यासाठी कसा उभा राहणार? स्वतः पागळे असलेले नेतृत्व कसे करणार?

## संतुलित, अतिसावध व्यक्तित्व

कॉंग्रेसचा सत्ताप्राप्तीचा प्रवास फार लांबचा आहे. प्रथम कॉंग्रेसची विश्वासार्हता निर्माण केली पाहिजे, ती संघटना लोकशाही प्रधान, व्हावयास हवी. कार्यक्षम व सत्तानिरपेक्ष कार्यकर्त्यांचा संच त्या संस्थेजवळ आवश्यक आहे. मोर्चे, हरताळ, गुडगिरी या मार्गांनी विरोधी पक्ष उभा राहणार नाही. हे मार्ग जुने व निष्प्रभ झाले आहेत. असा कॉंग्रेस पक्ष उभा करण्याचे सामर्थ्य कोणात आहे? तो आक्रमक करणे हा भाग पुढचा आहे. पक्ष म्हणून तो उभा राहिला पाहिजे. संसदीय राजकारण करण्याचीच पठडी असलेल्या पुढाऱ्याना हे जमेल का? विरोधी पक्षाचे पुढारी होणे म्हणजे राजकीय वनवास, सार्वजनिक उपेक्षा सहन करण्याची तयारी ठेवणे आहे कॉंग्रेस पुढारी हे सत्तेवरच पोसलेले नेते आहेत. त्यांचा जनसंपर्क मोटारीतून झाला आहे. व्याख्याने, दौरे याखेरीज त्यानी काही केलेले नाही. तळाशी जाणे त्याना माहीत नाही. पाय रोवून उभे राहाण्याइतकी त्याच्यात जिद्द उरलेली नाही. आता फक्त जनता पक्षात फूट पाडण्याचे उपक्रम सुरू होतील. रा. स्व. संघाच्या प्रश्नावर तो प्रयत्न चालूच आहे. कदाचित् जनता पक्षातील लोकशाही कॉंग्रेसचे पुढारी व समाजवादी ह्याला बळी पडतील. इंदिराजींच्या कारवाया चालू राहतील. त्यातच ते गुरफटतील. यशवंतरावाच्या मागे किती कॉंग्रेस खासदार राहतील? यशवंतरावानी आजपर्यंत किती लोकांना स्वत.च्या बाजूचे करून घेतले? ते सत्ता–स्पर्धेत का मागे पडले?

## दिल्लीत लॉबी नाही!

यशवंतराव सत्ता–स्पर्धेत मागे पडले याची कारणे जशी राजकीय परिस्थितीत आहेत तशी त्यांच्या व्यक्तित्वातही आहेत. दिल्लीला यशवंतराव आले ते महाराष्ट्रीय राजकारणातल्या त्यांच्या लौकिकामुळे व कर्तबगारीने; पण दिल्लीचा राजकीय रंगमच फारच मोठा आहे! तो सरकताही आहे. येथे आल्यावर येथून जो भारत दिसतो, जे अंतर्गत राजकारण दिसते, जी पक्षीय सत्ताश्रेणी असते, सरकारमध्ये जे प्रादेशिक, वैचारिक गट असतात. त्या सर्वांना पुरून उरेल असे प्रबळ, प्रसरणशील पणनिश्चयी, निश्चित दिशा व उद्दिष्ट असलेले राजकीय नेतृत्व लागते. त्याला आपण ज्या प्रदेशातून आलो आहोत तेथील पक्षाचे, लोकांचे भान ठेवावे लागते. त्याचे हित व मर्जी सांभाळावी लागते. यशवंतरावानाही ही कसरत करावी लागते. नेहरूंच्या मंत्रिमंडळात असलेले आधीचे मंत्री अखिल भारतीय प्रतिमा असलेले होते. तेव्हा यशवतरावाचे पहिले काम ही अखिल भारतीय प्रतिमा निर्माण करणे हे होते. ही प्रतिमा निर्माण करण्या-

साठी दिल्लीतील पत्रकारांशी, दिल्लीत येणाऱ्या अखिल भारतीय नेत्याशी सतत संपर्क हवा. थोडक्यात म्हणजे स्वत.ची 'लॉबी' हवी. तशी लॉबी निर्माण करणे सोपे नाही त्यातही असूया निर्माण होते. कॉंग्रेसपक्षातील इतर प्रदेशाचे पुढारी अशा व्यक्तीचा दुस्वास करू लागतात. यशवंतरावांना सुदैवाने जी सरकारी मंत्रालये मिळत गेली ती भारतीय दर्जाची होती. संरक्षण, गृह, अर्थ आणि परराष्ट्रीय व्यवहार या सर्व खात्यात त्याना स्वतःची अखिल भारतीय प्रतिमा तयार करण्याची संधी मिळत गेली; पण संरक्षणखाते असतानाच शास्त्रीजी गेले आणि नतर इंदिराजीच्या कारवाया सुरू झाल्या तेव्हा ही प्रतिमा निर्माण झालीच नाही. दुसरे असे की यशवतरावाना महाराष्ट्र कॉंग्रेस खासदाराची मदतही यासाठी घेता आली नाही. कारण ते अखिल भारतीय राजकारणात थिटे होते. यशवंतरावाचा स्वभावही या त्याच्या राजकीय पराभवाला कारणीभूत आहे. एक तर त्याचे मनात ठेवून लोकांशी बोलणे अतःकरणास भिडत नाही. जवळीक निर्माण करीत नाही. हाच अनुभव पत्रकाराचा आहे दिल्लीच्या वाटा निसरड्या आहेत तेथे जपून पाऊल ठेवावे लागते; पण धोका पत्करून मोकळेपणाने बोलणे हेही आवश्यक ठरते इंदिराजीसुद्धा कधीच कोणाशी मोकळेपणाने बोलत नाहीत; पण त्यांना नेहरू घराण्याचे वलय होते, त्याचा आधीच अखिल भारतीय नेत्याशी सबध आला होता. त्यामुळे त्याना अखिल भारतीय प्रतिमेची गरज नव्हती. चव्हाणानी आपल्या राजकीय भूमिकेला तात्त्विक अधिष्ठान देऊन स्वत.चा वैचारिक प्रभाव पाडला नाही ही आणखी एक उणीव! जे धारिया–चंद्रशेखर यांनी केले ते त्यांनी करावयास हवे होते, पण मंत्री असल्यामुळे तेही जमले नाही! त्यामुळे वैचारिक प्रभाव नाही, स्वत.ची लॉबी नाही, व त्यामुळे यशवतराव कॉंग्रेसमध्येही केवळ महाराष्ट्राचे प्रतिनिधी व ज्येष्ठ राजकारणी म्हणून वावरले. भारतातील इतर प्रदेशांत त्याचा गट होऊच शकला नाही! त्याचे वारवार महाराष्ट्रात जाणे–येणे. यामुळे लोकाना वाटत राहिले की ते महाराष्ट्राचे प्रादेशिक पुढारीच आहेत. वस्तुतः त्याना अनेक भारतीय विषयांवर सतत भाषणे करून, लेख लिहून स्वत.ची वैचारिक नेता म्हणून प्रतिमा निर्माण करणे गृह, अर्थखात्यात शक्य होते. यशवतरावाना राज्यकारभाराचा अनुभव होता. यशवतरावाचे वाचन चौफेर आहे. त्याचे निरीक्षण सूक्ष्म आहे. राजकीय समीक्षकाची चौकस व अनाग्रही बौद्धिक क्षमता आहे; पण या त्याच्या सर्व गुणांचा कधीही आढळ त्याच्या राजकीय शैलीत झाला नाही हे खरे त्याचे फार मोठे न्यून आहे

यशवतरावाच्या स्वभावात तुसडेपणा नाही, पण अलिप्तपणा आहे. त्याच्याबरोबर वर्षानुवर्षे राहिलेल्या मित्राना तरी त्याचे 'मन' कळले की नाही याची शकाच आहे. त्यामुळे त्यांच्याशी वैचारिक देवाण घेवाणही मोकळेपणाने होत नाही. कारण स्वत.ची मते प्रकट होऊ नयेत ही त्यांनी सतत काळजी घेतली. वस्तुत. त्याच्या दिल्लीतील कारकीर्दीत अनेक निर्णायक स्वरूपाचे प्रश्न उभे राहिले. भाषावाद, हिंदी भाषेचा प्रश्न, राज्यसरकारांचे प्रश्न, निवडणुकी, नक्षलवाद, राष्ट्रीय एकात्मता, नियोजनाचे विविध प्रश्न, प्रशासकीय पुनर्रचना, उजव्या कम्युनिस्टांशी सहकार्य आदी अनेक प्रश्नावर त्यांना निश्चित मार्गदर्शन करता आले असते; पण त्यांनी त्यात मोघम भूमिका घेतल्या त्यामुळे त्याचे नेतृत्व कामचलाऊ (Time Serving) ठरले. त्याला दूरदर्शित्व व दिशा कधीच आली नाही. कृष्ण मेनन कॉंग्रेस सरकारमध्ये मंत्री होते; पण ते अनेक विषयावर मूलगामी विचार मांडीत. त्यांचा स्वभाव तुसडा असला तरी त्याचे विचार बाजूला सारता येत नसत. त्याना खोली होती. निश्चत दिशा होती. ते एकाकी होते; पण आजही त्याना बुद्धिवतात मान आहे. यशवतरावाना त्याच्यापेक्षा किती तरी अनुकूल परिस्थिती होती; पण यशवंतरावाचा स्वभावच कासवासारखा स्वत.ला मागे ओढणारा (Withdrawing) आहे. मुसंडी मारण्याचा स्वभावच नाही! नेत्याला साहस लागते, बेगुमानपणा लागतो– थोडासा उद्धटपणाही आवश्यक असतो. यशवंतराव खरे म्हणजे मध्यममार्गी आहेत. आक्रमक राजकारणात निश्चित भूमिकेवर उभे राहावे लागते. श्री तात्यासाहेब केळकराना विरोधी पक्षाच्या विचारसरणीतही ग्राह्याश दिसत असे. त्यामुळे ते ताठ व आग्रही भूमिकाच घेऊ शकत नसत हा मध्यममार्गाचा धोका असतो. असा मनुष्य सधीसाधू म्हणूनही समजला जातो त्याला सत्ताकांक्षा असेल तर कुपणावरच सधीची वाट पहात बसावे लागते. यशवतराव संधीची वाट पहात कुंपणावरच बसले. मोरारजीनी तसे केले नाही विरोध केला, पराभव पत्करला, वनवास भोगला आणि आयुष्याच्या शेवटी सत्ता मिळवली. यशवतरावांनी आलेल्या संधीवर झेप घातली नाही विरोधी गट जेव्हा प्रबळ नव्हता तेव्हा त्याच्यावर झडप घातली नाही. यशवतरावाचे अपयश हे अतिसावध राजकारणाचे, साहसशून्य नेतृत्वाचे अपयश आहे ते कधीच आक्रमक झाले नाहीत कारण ते बेरीज-वजाबाकीचे राजकारण करीत बसले. हे राजकारण त्यानी केले त्याला कारण त्याचा स्वभाव हेच आहे. स्वत.वर घातलेल्या बंधनातच यशवतराव जखडले गेले. त्याचे व्यक्तित्वच बदिस्त झाले. दबलेले राहिले. ते खऱ्या अर्थाने कधी फुललेच नाही. असे बंदिस्त व स्वतःच्या बंधनांना जखडलेले व्यक्तित्व आता आक्रमक होईल काय?

## संघर्ष टाळण्याची वृत्ती

आता आक्रमक व्हावयाचे असेल तर यशवतरावाना नेतृत्वासाठी सघर्ष करावा लागेल; पण त्यांनी आत्तापर्यंत सघर्ष टाळलाच आहे. कॉंग्रेसमध्ये इंदिराजीशी त्याना अनेक मुद्द्यावर संघर्ष करता आला असतां, तो त्यानी सतत टाळला आहे दिल्लीत सगळे राजकीय निरीक्षक म्हणत की हा कसला छत्रपती? विरोधी परिस्थितीत स्वतःला झोकून देणे, त्या खाईत उडी घेणे ही इंदिराजींची प्रवृत्ती आहे, तर खंदकात बसून राहणे, कोठल्या तरी आत्मसरक्षक भूमिकेचा पुरस्कार करणे ही यशवतरावाची नीती आहे त्यामुळे हा सघर्ष यशवतराव करतील अशी अपेक्षा लोकानी कशी करावी? दिल्लीतील सत्तासंघर्षाच्या ऐन वेळी यशवतरावांनी आपल्या सहकाऱ्याचाही अपेक्षाभग केला आहे. इंदिराजीचा अंतेवासी एकदा त्याच्याबद्दल या सत्तासघर्षाचे वेळी म्हणाला, 'विधाता भाग्यलेख त्याच्या कपाळावर लिहिण्यासाठी उत्सुक आहे; पण यशवतरावानीच मान खाली घातली आहे' जयप्रकाशजीनी तर जाहीरपणे जगजीवनराम व चव्हाण यानी इंदिराजीच्या विरुद्ध उभे राहावे असे सांगितले होते, कामराज, मिनू मसानी व इतर विरोधी पक्षाचे आजचे नेते हीच विनती करीत होते. इंदिराजीनी लोकशाहीवर घातलेला घाव चव्हाण आणि जगजीवनराम याना स्वत.चे राजकीय भवितव्य धोक्यात घालून झेलता आला असता. जगजीवनरामानी शेवटच्या क्षणी तरी वार केला; पण यशवतरावाची तलवार म्यानातून कधीच बाहेर पडली नाही त्यानी फक्त ढालच सतत वापरली. आता तलवार म्यानातून बाहेर पडून– पडली तरी– त्याचा काय उपयोग? □

# यशवंत नीती
# काही स्फुट विचार

मोरेश्वर तपस्वी, दिल्ली

### सुवर्णकाळ

यशवंतरावाच्या आजवरच्या राजकीय जीवनातील सुवर्णकाळ म्हणजे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून गाजलेली त्यांची कारकीर्द; पण त्या सुवर्णकाळातही त्यानी विरोधकाना 'समाप्त' करण्याची मोहीम मोठ्या हिकमती कलागतीनी चालविली गुजराथ–विदर्भाच्या पाठिंब्यामुळेच आपण मुख्यमंत्री राहू शकतो याची जाणीव राखून मोरारजीशी उघड वैर त्यांनी कधीच पत्करलं नाही परंतु संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा तेजोवध करण्यात कोणतीच कसूरही ठेवही नाही. सं महा. समितीचे तीन तेरा नऊ बारा वाजवण्यात सिंहाचा वाटा उचलला द्विभाषिकच राववायचे असे दाखवीत ते दिल्लीत मोरारजीभाईंच्याच घरी उतरले आणि नेहरूंशी–इंदिरेशी बोलणी मात्र द्विभाषिक मोडण्याची केली. मोरारजीनी नतर या वागण्यास विश्वासघात म्हटले संयुक्त महाराष्ट्रासाठी त्याग केला इतरानी आणि त्याचा 'मगल–कलश' आणल्याचे श्रेय मात्र उपटले यशवतरावानी कारण तो क्षण येईपर्यंत सं. म. समिती नेतृत्वशून्य करून ठेवली होती त्यांनीच !

### अपघात

यशवंतराव चव्हाणाच्या वाटचाला आलेली कीर्ती ही कर्तृत्वापेक्षा अपघातातूनच वाढलेली आहे. ते द्विभाषिक मुबई प्राताचे मुख्यमंत्री झाले तेच अपघाताने ! मोरारजी आणि भाऊसाहेब हिरे यांच्यात मुख्यमंत्री होण्यासाठी चढाओढ लागली होती. मोरारजीना एकमताने मिळाले तरच मुख्यमंत्रीपद हवे होते. भाऊसाहेब हिरे जागा लढविण्यासाठी दंड थोपटून उभे राहिले. मोरारजीनी नाइलाजाने यशवतरावाचे नाव पुढे केले आणि गुजराथ आणि सातारा–कराड भागातील आमदार याच्या बळावर यशवतराव मुख्यमत्री झाले ! संपूर्ण महाराष्ट्राने त्याचे मुख्यमंत्रीपद मानले नव्हते. त्याचप्रमाणे कृष्ण मेननची बदनामी झाली म्हणून यशवतराव सरक्षणमत्रीं झाले गोहत्याविरोधी साधूंच्या चळवळीवर झालेल्या गोळीबारामुळे गुलजारीलाल-नंदाचा बळी गेला तेव्हा त्याना केन्द्रीय गृहमंत्रीपद मिळाले. इंदिराबाई हरल्या म्हणून विरोधीपक्षनेतेपद मिळाले. कॉंग्रेस हरून जनता पक्ष सरकार आले म्हणून पराभवानंतरही कॅबिनेट मंत्र्याचा दर्जा व मानमरातब मिळाला.

अशा प्रकारे शिकी तुटण्याचा अपघात हाच यशवंतरावांच्या चढत्या कमानीचा सोपान राहिला आहे !

### बेरजेचे असेही राजकारण

यशवंतराव चव्हाणानी महाराष्ट्राच्या राजकारणात एक शब्दप्रयोग रुजविला–'बेरजेचे राजकारण !' दिल्लीत आल्यावरही त्यानी बेरजेचेच राजकारण केले; पण ती बेरीज वेगळी होती. इंदिरा गाधी तळापासून विकसित होत आलेल्या प्रत्येक नेतृत्वाचे खच्चीकरण करीत आहेत हे स्पष्ट दिसत असूनही यशवंतरावानी कधीही 'जगजीवनराम + यशवंतराव + ब्रह्मानद रेड्डी + स्वर्णसिंग' अशी बेरीजच माडली नाही ! जमेल तेव्हा, जमेल तशी 'इंदिरा+चव्हाण' अशीच बेरीज माडली आणि परिणामी देशातील सत्तेच्या राजकारणातून लोकांनी कॉंग्रेसला वजा केले ! १९६९ साली 'कामकाज + मोररजी + चव्हाण' अशी बेरीज माडण्याची संधी आली. तेव्हा मात्र यशवंतरावानी वजाबाकीचे राजकारण केले. परिणामी भावी पंतप्रधान म्हणून लोकात त्यांच्या नावाची चर्चा व्हायला लागली असूनही. आता तो चान्स त्यांना कधीही मिळणार नाही इतके त्या नावाचे अवमूलन झाले आहे !

### आपल्याहून वरचढास स्थान नाही

आपल्याला राजकीय सत्ता लाभताच माणूस व्यापक व्हावा, उदार व्हावा अशी अपेक्षा असते. यशवंतरावानी आपल्यापेक्षा बुद्धी आणि कर्तृत्व यानी वरचढ असलेल्या माणसाला कधीही आघाडीवर किंवा आघाडीच्या जवळपासही फिरकू दिले नाही केंद्रीय मंत्रिमंडळात मानाचे स्थान असताना आणि असेपर्यंत त्यानी कै. आनदराव चव्हाण याना कधीही उपमंत्र्यापेक्षा वरच्या पायरीवर चढू दिले नाही. अण्णासाहेब शिंदे शेतकी खात्याचे अत्यंत कामसू मत्री असूनही त्याना कित्येक वर्षे उपमंत्रीच राहावे लागले शेवटी शेवटी त्याना राज्यमत्रीपद मिळाले तेव्हा यशवतरावांचा भाव दिल्ली दरबारी उतरत चाललेला होता. केंद्रीय मंत्रिमंडळात एक खाडिलकर आणि एक गोखले असताना आणखी एक विठ्ठल गाडगीळ आपल्याला चालणार नाही असे यशवंतरावानी इंदिराबाईंना एकदा सागितले होते (तोच एक स्पष्ट सागून टाकल्याचा प्रसंग !) आणि आणीबाणीच्या किती तरी आधीच विठ्ठल गाडगीळ याना मिळू घातलेले मंत्रिपद त्यानी मिळू दिले नव्हते. इतकेच कशाला, १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत गाडगीळाना तिकिटही त्यांनीच नाकारले होते. पुण्यातून एक मारवाडी (धारिया), खेडमधून एक ब्राह्मण (खाडिलकर) मान्य केल्यावर आता बारामतीहून आणखी एक ब्राह्मण परवडणार नाही असा युक्तिवाद त्यानी केला होता !

## जातीयवादाला साखरेचा थर

महाराष्ट्रातील दुसरे यशवंतराव स्वत.ला महापडित म्हणवीत असताना जशी नागडीउघडी जानवेद्वेषाची भाषा बोलतात तसला रांगडेपणा यशवतराव चव्हाणात नाही; परंतु त्यांचा दृष्टिकोण जातीयवादीच आहे. फक्त आपल्या त्या जातीयतेवर मिठ्ठास बोलण्याचा साखरेचा थर चढविण्याची कला चव्हाणाना फार चांगली साधली आहे. मुख्य मंत्रिपद हाती येताच महाराष्ट्रातील सर्व जिल्हा काँग्रेस समित्याची 'पुनर्रचना' यशवंतरावांनी केली आणि ब्राह्मणाच्या हाती असलेली अध्यक्षपदे व इतर पदे काढून घेतली. 'राजकीय सत्तेच्या एकाही स्थानावर यशवतरावांच्या कारकीर्दीत एकही ब्राह्मण कधी येऊ देण्यात आला नाही. त्यातल्या त्यात जर एखादा ब्राह्मण आलाच तर तो मुबई–ठाण्याचा असायचा! महाराष्ट्रातील नाही! पाटसकर, काकासाहेब गाडगीळ, खाडिलकर, हरिभाऊ गोखले याना आणि बॅ. गाडगीळ याना मत्रिपद चव्हाणाच्या कृपेमुळे मिळाले नाही. यशवंतरावांच्या कारकीर्दीत सुरू झालेला हा प्रकार महाराष्ट्रातील त्यांची सद्दी सपली तरीही आजतागायत चालूच आहे! राजकीय सत्तास्थानावर महाराष्ट्रातून ब्राह्मणाचे उच्चाटण झालेले आहे आणि त्याचे मिठ्ठास अवगुठन चव्हाणानी केलेले आहे!

## भूमिका ठाम नाही, वागण्याचा नेम नाही

काँग्रेस पक्षात अनेकदा अनेक पेचप्रसग उभे राहिले; परंतु प्रत्येक वेळी चव्हाण नेमकी कोणती भूमिका घेणार याचा बोध त्याच्या 'नजीकचे' असल्याचे दाखविणाऱ्यानाही कधी झाला नाही. ठाम भूमिका घेणे हा चव्हाणाचा स्वभावच नाही! एखाद्या प्रश्नावर ठाम भूमिका घेऊन बाकीच्यांचे मत त्या भूमिकेस अनुकूल करून घेण्यासाठी लागणारी धडाडी, कल्पकता आणि विनीचं नेतृत्व चव्हाणांच्या ठायी आहे असे त्यांनी ज्याच्याबरोबर कामे केली त्यांच्यापैकी एकाही काँग्रेसाध्यक्षाला कधी पटलं नाही! नेहरू वारले तेव्हा चव्हाणाना राष्ट्रीय राजकारणात येऊन दोन वर्षेही झाली नव्हती. शास्त्री वारले तेव्हा वसंतराव नाइकानी चव्हाणांना पतप्रधान करावे असे वातावरण करण्याचा खूप प्रयत्न केला. मोरारजीनी त्याचा पाठिंबा मागितला आणि 'मी स्वत.च रिंगणात आहे!' असे सागण्याऐवजी 'कामराज म्हणतील तसे होऊ देत!' असे म्हणून चव्हाणांनी पड खाल्ली इतकेच नव्हे तर 'तुम्हाला पतप्रधान व्हायचे आहे, तेव्हा पक्षात जास्तीत जास्त पाठिंबा तुम्हाला मिळत असेल तर मी तुमच्या आड येणार नाही!' असे आश्वासन इंदिराबाईंना चव्हाणांनी दिले; पण नेमके तसेच आश्वासन स्वत:साठी मागण्याचे धैर्य चव्हाणांना झाले नाही! तेव्हापासून चव्हाण नेमके कसे वागतील याचा नेम नाही अशी धारणा पसरली ती आजतागायत सर्वत्र कायम आहे.

## टोपी फिरवण्यात पटाईत

'यशवंतराव चव्हाण टोपी फिरवण्यात पटाईत आहेत.' असा शेरा काँग्रेसला रामराम ठोकल्यानंतर लगेच घेतलेल्या पत्रकार परिषदेत बाबू जगजीवनराम यानी मारला होता. बंगलोर ए. आय. सी. सी मध्ये १९६९ साली जगजीवनराम याना राष्ट्रपती करण्याच्या इदिरा गाधीच्या कल्पनेला पाठिंबा देण्याचे आश्वासन चव्हाणांनी इंदिरा गाधीना दिले होते! परंतु त्या प्रश्नावर प्रत्यक्ष मतदान करायची वेळ आली तेव्हा मात्र त्यांनी विरुद्ध मत दिले राष्ट्रपतीनिवडणुकीतही त्यानी संजीव रेड्डीनाच पाठिंबा दिला आणि महाराष्ट्रातील काँग्रेस आमदार–खासदारांना बव्हशी तसे करायला लावले; पण काँग्रेस फुटताच यशवंतरावानी टोपी फिरवली आणि पुन्हा इदिरा गाधीच्या बाजूला उडी घेतली!

## बेभरवशीपणा

बेभरवशीपणा हा यशवंतराव चव्हाणांच्या ठायी असलेला स्थायीभाव आहे. कुणी त्याला दोष म्हणतात, कुणी गुण मानतात. त्यांच्या या स्थायीभावाला कोणतेही दूषण वा भूषण न लावता असे दिसून येते की, अनेक सोन्यासारख्या सधी चालून आल्या असताही त्याना जिवाभावाचा असा कुणी राजकीय मित्र नाही. मोरारजी देसाई याच्यामुळेच ससदीय जीवनात चव्हाण पुढे आले. द्विभाषिकाच्या मुख्यमंत्रीपदासाठी मोरारजी एकमताने नेते निवडले जाण्याचा आग्रह धरीत आहेत असे पाहून यशवंतरावानी एकीकडे भाऊसाहेब हिऱ्याना निवडणूक लढवायला प्रवृत्त केले आणि दुसरीकडे मोरारजीना आपल्याबद्दल दुस्वास वाटणार नाही याचीही काळजी घेतली. हिरे यानी निवडणूक लढवायचे जाहीर करताच यशवंतरावानी हिऱ्याना दगा दिला आणि त्याचा पराभव करून स्वतः मुख्यमंत्री झाले. हा बेभरवशीपणा भाऊसाहेब हिरे यांना जन्मभर सलत राहिला. *

## साहसहीन

आपल्या तीस-पस्तीस वर्षांच्या राजकीय जीवनात कोणत्याही पातळीवर यशवतरावांनी साहसाने कोणताही निर्णय घेतलेला नाही. उलट आपल्याला उद्या कधी प्रतिस्पर्धी ठरू शकतील अशा स्वपक्षातील सहकाऱ्यानाही वाटेतून दूर करण्याच्या नकारात्मक घटनांनीच यशवतरावाचे आयुष्य भरलेले आहे.

स्वराज्यप्राप्तीनंतर स्वत.ला रॉयिस्ट म्हणवून घेणाऱ्या यशवंतरावानी आपल्या रॉयवादी मित्रांना एक रॉयिस्ट कॉन्फरन्स घेण्यास प्रवृत्त केले. यशवंतराव त्या कॉन्फरन्सला हजरही राहिले. तीत रॉयवादाचा हिरीरीने पुरस्कार करणारे भाषणही त्यांनी केले. परिणामी रॉयवाद्यानी काँग्रेसला रामराम ठोकला; पण यशवंतरावांनी मात्र त्यांना जाऊ दिले. स्वत: काँग्रेसमध्येच राहिले. शेतकरी–कामकरी पक्षाच्या स्थापनेच्या वेळीही त्यानी नेमके हेच केले. खाडिलकर–जेधे–मोरे ही मंडळी गेली. यशवंतराव काँग्रेसमध्येच राहिले.

□

# एक 'अनामिक' प्रतिक्रिया

यशवंतरावांनी जेव्हा 'आता मी आक्रमक धोरण स्वीकारणार!' अशी घोषणा केली तेव्हा त्यांच्या विरोधकाइतकीच कॉंग्रेस पक्षातीलही काही मंडळींनी त्याची टर उडवली. 'यशवंतरावाना हे जमणं शक्य नाही' असं म्हणताना त्यांच्या आजपर्यंतच्या राजकीय जीवनातील पाच ठळक प्रसंग उद्धृत केले जातात. एक, पं. नेहरूंच्या निधनानंतर निर्माण झालेली परिस्थिती, या वेळी चव्हाणांनी एक चांगली संधी घालवली असं त्यांचे विरोधक म्हणतात. अशीच संधी पुन्हा लालबहादूर शास्त्रींच्या मृत्यूनंतर आली होती. तीही यशवंतरावांनी फुकट दवडली असं म्हटलं जातं. १९६९ सालचा सिंडिकेट-इंडिकेट झगडा आणि त्यात यशवंतरावांनी वेळोवेळी बदललेली भूमिका हा तर या संदर्भातील एक अवीट चर्चेचा विषय आहे. आणीबाणीच्या काळातही यशवंतरावांनी अतिशय कचखाऊ धोरण स्वीकारलं असं म्हटलं जातं आणि आणीबाणी उठल्यानंतर जी प्रचंड उलथापालथ झाली, की ज्या धुमश्चक्रीत जगजीवनरामांनी आपले हात 'स्वच्छ' करून घेतले, त्या वेळीही यशवंतरावांनी 'कॉंग्रेसचं निशाण मरेपर्यंत खाली ठेवणार नाही!' ही घोषणा केली. त्यावद्दल तर 'दैव देतं आणि कर्म नेतं' किंवा 'यशवंतरावांची बस चुकली!' इथपर्यंत कोणत्याही प्रकारचे शिंतोडे त्यांच्यावर अजूनही उडवतात आणि यशवंतरावांमध्ये काहीच गटस् नाहीत या निष्कर्षाप्रत येतात.

पण या प्रत्येक प्रसंगाचा, वेगवेगळा आणि थोडं खोल जाऊन विचार केला तर या प्रत्येक प्रसंगात यशवंतरावांच्या कचखाऊपणापेक्षा Shrewd and cool political operator या व्यक्तिमत्त्वाचा भाग अधिक दिसत नाही का? पं. नेहरूंनंतर कोण, हा प्रश्न जेव्हा चर्चिला जाऊ लागला तेव्हा यशवंतरावांचंही नाव प्रकर्षाने घेतलं जात होतं, असं व्हेलेस हेगन यांनी आपल्या After Neharu Who?, या पुस्तकात म्हटलं आहे; पण या वेळी यशवंतरावांनी हातातली संधी दवडली असं म्हणण्यापेक्षा, पंतप्रधानपदाच्या जागेकरिता शास्त्रीजी व मोरारजी यांच्यातील सामन्यात आपला निभाव लागणार नाही हे ओळखूनच त्यांनी या संधीकडे 'पाठ फिरवली असावी' असं वाटतं. म्हणजेच स्वतःच्या क्षमतेबरोबरच स्वतःच्या मर्यादांचीही त्यांना पुरेपूर जाणीव असावी आणि हा दोष नसून गुणच आहे की जो सर्वत्र अभावानेच आढळतो. शास्त्रींच्या मृत्यूनंतर पुन्हा एका बाजूला मोरारजी होतेच तर दुसऱ्या बाजूला इंदिराजी उभ्या राहिल्या. त्यामुळे हाही बड्या शक्तींचाच संघर्ष आहे, आपण त्यामध्ये न पडावे हेच चांगलं, असा सुज्ञ विचार यशवंतरावांना कशावरून सुचला नसेल?

१९६९ सालच्या सिंडिकेट-इंडिकेट लढ्यात यशवंतराव कोणत्या बाजूला झुकतात याला फार महत्त्व प्राप्त झालं होतं. मोरारजी, निजलिंगप्पा, स. का. पाटील वगैरे मंडळींनी या वेळी त्यांना पंतप्रधानपदाचही आमिष दाखविलं होतं. काही काळ यशवंतराव या कल्पनेने मोहोरूनही गेले असतील. कारण फारसे कष्ट न करता किंवा धोका न पत्करता मिळणारी सत्ता त्यांनी कधीच सोडली नाही; पण इंदिराजींचा पराभव करण्याचं काम माझ्याकडून करवून घेतल्यानंतर हीच मंडळी मला खाली खेचणार नाहीत कशावरून? अगदी खाली जरी खेचले नाही तरी 'आमच्याच पाठिंब्यामुळे तुम्ही निवडून आला आहात' अशी सतत जाणीव करून देत हातातलं बाहुलं कशावरून बनवणार नाहीत? आणि या दोन्हीही शक्यता जरी सोडल्या तरी माझी खरोखरच सत्ता किंवा हुकमत चालणार आहे का? मला पुरेसं निर्णय-स्वातंत्र्य मिळणार आहे का?' हेही प्रश्न त्यांच्या मनात After-thought च्या स्वरूपात उभे राहिले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. मग या अशा प्रकारच्या औट घटकेच्या राज्यापेक्षा एखादं महत्त्वाचं मंत्रिपद मिळवून गप्प बसलेलं काय वाईट असाही विचार त्यांच्या मनात आला असावा आणि त्यांनी इंदिराजींच्या कँपमध्ये प्रवेश केला असावा. कारण एक गोष्ट निश्चित की प्रथम क्रमाकाचं स्थान मिळावं, यापेक्षाही सतत सत्तेच्या केंद्रस्थानी राहायचं हाच दृष्टिकोन यशवंतराव १९४६ पासून बाळगत आले आहेत. आणीबाणीच्या काळातही इंदिराजींना विरोध न करण्यामागे हाच हेतू असावा. यात कदाचित संधिसाधूपणा वाटत असेल; पण It is a part and parcel of the game

याचबरोबर दुसरा समांतर मुद्दा लक्षात घेतला पाहिजे तो असा की, इकडली माणसं एका रात्रीत तिकडं फेकण्याबद्दल प्रसिद्ध असणाऱ्या इंदिराजींना काय चव्हाणांनाही बाजूला करावं असं वाटलं नसेल? तसं त्यांना निश्चितच वाटत होतं! महाराष्ट्राच्या नेतृत्वात वसंतराव नाइकानंतर झालेला बदल हा यशवंतरावांना महाराष्ट्रातून शह देण्याच्या कल्पनेतूनच झाला होता; पण इंदिराजी चव्हाणांना सत्तास्थानातून बाहेर फेकू शकल्या नाहीत याचं चव्हाणांना काहीच का श्रेय नाही?

किमान आणीबाणी उठल्यावर, जगजीवनरामांबरोबर तरी यशवंतरावांनी कॉंग्रेमपक्ष सोडायला हवा होता असं म्हटलं जातं. त्यांनी तसं केलं नाही याचं एक कारण असं दिलं जातं की पुढे एवढं महाभारत घडेल याचा त्यांना अंदाज आला नसावा; पण त्याचबरोबर ही शक्यताही नाकारता येत नाही की तसा अंदाज येऊनही यशवंतरावांनी हा मार्ग अंगिकारला नसेल! याचं कारण असं की, अशा तऱ्हेने शिंगं मोडून पक्षामध्ये शिरलेल्या माणसाला 'जनता'वाले काय तऱ्हेची वागणूक देतील याचा त्यांना पक्का अंदाज असावा. आज जगजीवनरामांची काय किंमत केली जाते? त्यांचीही 'नंदिनी सत्पथी' होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्या मानाने एकनिष्ठ पक्षनेता म्हणून यशवंतराव बऱ्याच उंचावर गेले आहेत. ही सर्व calculations करण्याइतका डोक्याचा थंडपणा, आणि धूर्तपणा यशवंतरावांजवळ नक्कीच आहे!

यशवंतराव इंदिराजींना अजूनही ठाम विरोध करत नाहीत हा त्यांच्या अनाक्रमकतेचा आणखी एक पुरावा त्यांचे विरोधक देतात; पण याचबरोबर हाही मुद्दा लक्षात घेतला पाहिजे की यशवंतरावांना राष्ट्रीय पातळीवर मान्यता प्राप्त करून घेण्यासाठी उत्तर भारतामध्ये पाय रोवणं आवश्यक आहे कारण संसदेतील जवळजवळ निम्मे सभासद तिथूनच येतात आणि या सभासदाशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी इंदिराजींशी सलोख्याने वागलंच पाहिजे! कारण वर्तमान स्थितीमध्ये तरी त्यांच्याइतका प्रभावी संपर्क साधू शकणारा नेता उत्तर भारतात दुसरा कोणताच नाही, आतापर्यंत कॉंग्रेसचे नेतृत्व उत्तर भारतातूनच येत होतं, हाही मुद्दा या ठिकाणी लक्षात घेतला पाहिजे. तेव्हा, गेलेली सत्ता परत मिळविण्यासाठी यशवंतरावांना इंदिराजींची मदत घ्यावीच लागेल. त्यामुळे इंदिराजींना असं तोडून चालणार नाही,.

तेव्हा यशवंतरावांची खरी कसोटी आता इथून पुढेच आहे. तारेवरच्या कसरतीशिवाय त्यांना तरणोपाय नाही. ही कसरत त्यांना कितपत पेलते ते भविष्यकालच ठरवील; पण भूतकालातील ज्या घडामोडींवरून किंवा घटनांवरून यशवंतरावांवर कचखाऊपणाचा आरोप केला जातो त्याची दोनच कारणं संभवतात. एक, घटनेच्या दुसऱ्या बाजूचा कधी विचारच केला गेला नाही आणि दोन— Wrong expectations from a wrong person!

—एक प्राध्यापक
पुणे विद्यापीठ

# " त्यांचा आतापर्यंतचा इतिहास पाहता हे कठीण आहे ! "

## श्री. शंकरराव चव्हाण यांची मुलाखत

भारतकुमार राऊत

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण जवळजवळ गेली २० वर्षे श्री. यशवंतराव चव्हाणांना जवळून पाहत आहेत. प्रथम त्यांच्या मंत्रिमंडळातील मंत्री म्हणून आणि त्यानंतर महाराष्ट्राचे नेते म्हणून मुख्यमंत्रिपद गेल्यानंतर शंकरराव डिवचले गेले आणि त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला. ते काँग्रेसमधून बाहेर पडले आणि नव्या समाजवादी काँग्रेसची स्थापना झाली. शंकररावांचे मुख्यमंत्रिपद जाण्यात यशवंतरावांचा वाटा होता. ती कट-कार-स्थाने ' साहेबांच्या संमतीनेच ' शिजली, असे जाणकार सांगतात. काँग्रेस सोडल्यानंतर आता तर शंकरराव यशवंतरावांच्या सरळ-सरळ विरोधात उतरले आहेत. यशवंतरावांनी सुद्धा अस्तन्या सावरून पहिली तोफ मुंबईच्या काँग्रेस शिबिरात डागली. लढाईला सुरुवात झाली आहे.

आज तरी शंकररावांचे राजकीय वजन फारच कमी झाले आहे. यशवंतराव वसंत-दादांचे पाठीराखे तर त्यांचा विनोदाने, टवाळीनेच उल्लेख करतात. आणीबाणी राबवली म्हणून जनमानसातसुद्धा त्यांची प्रतिमा साफ डागळून गेलेली; परंतु अशाही परिस्थितीत शंकरराव पुन्हा आखाड्यात उतरले आहेत. महाराष्ट्र काँग्रेसची धुरा यशवंतराव वाहात असले तरी मराठवाडा अद्यापही शंकररावांच्या मागे उभा आहे. यशवंतरावांच्या मार्गातला हा मोठा अडथळा ठरेल, असा जाणकारांचा अंदाज आहे.

तर अशा शंकररावांना डावलून यशवंत-रावांच्या राजकीय कारकीर्दीचा आढावा घेणे अशक्य. शंकररावांना भेटलो. तेव्हा त्यांच्याकडून फार सडेतोड उत्तरांची फारशी अपेक्षा नव्हती. कारण युद्धाला तोंड लागले असले तरी निकराची लढाई अद्याप सुरू झालेली नाही. कसलेला योद्धा युद्धाच्या सुरुवातीला आपले रामबाण वापरीत नाही. शत्रूचा अंदाज घेऊन, त्याची दमछाक होत आहे असे पाहूनच, शेवटच्या टप्प्यात जोर-दार हल्ला चढवतो. शंकरराव राजकारणात कसलेले आहेत. मुलाखतीच्या वेळी ते तोलून मापून, शब्द सांभाळून बोलले; परंतु तरी-सुद्धा बरेच काही बोलून गेले.

बोलण्याच्या सुरुवातीलाच शंकररावांनी सांगून टाकले की, येत्या विधानसभा-निवड-णुकीत काँग्रेसला फारशी आशा नाही. काँग्रेस अधिकारावर येण्याची शक्यता नाही. मात्र विरोधकांनी जपून पावले टाकली पाहिजेत. देशात इतरत्र कुठेही नाही, इतकी महाराष्ट्रात काँग्रेस बळकट आहे. तिला ग्रामीण भागात स्थान आहे, हे विरोधकांनी ओळखले पाहिजे. अशा पक्षाला आपल्याकडे पर्याय आहे हे जर त्यांनी जनतेला दाखवून दिले तर काम फारसे कठीण नाही. कारण काँग्रेस-मध्ये सर्वांचीच मनःस्थिती द्विधा आहे जे ध्येयवादी आहेत, त्यांचा भ्रमनिरास झाला आहे आणि जे संधिसाधू आहेत त्यांची गणिते चुकली आहेत. यामुळे कार्यप्रवण असे कुणीच नाही. सध्याचे शासन काँग्रेसच्या सर्व तत्त्वांना हरताळ फासून एका विशिष्ट गटाचे प्रतिनिधित्व करीत आहे. यशवंतरावांच्या सातार्‍यातसुद्धा गडबड आहे. स्वतः यशवंतराव शुगरलॉबीच्या आहारी गेले आहेत आणि ही लॉबी त्यांचा हवा तसा उपयोग करून घेत आहे !

यशवंतरावांनी अलीकडेच आपण आक्रमक बनणार असल्याचे जाहीरपणे सांगितले. याबद्दल शंकररावांना त्यांची प्रतिक्रिया विचारली तर ते म्हणाले की, ' गेली २० वर्षे मी त्यांना जवळून पहातोय्; परंतु यशवंतराव कधी आक्रमक बनल्याचे मला तरी आठवत नाही. आपल्या सार्‍या राजकीय आयुष्यात ते फक्त बचावाचा खेळ खेळले. एकदा यशाची खात्री झाली की, मग खेळी खेळायची. रिस्क म्हणून कधी घ्यायची नाही, ही त्यांची आतापर्यंतची भूमिका. त्यामुळे ते आक्रमक बनू शकतील असे मला तरी वाटत नाही. '

यशवंतरावांनी मुंबईत भरलेल्या काँग्रेस शिबिरात म्हटले की. ' शंकररावांना मी मोठं केलं. ' या त्यांच्या विधानाची शंकर-रावांना आठवण करून दिली, तेव्हा यशवंत-रावांनी आपल्याला मोठे केले हे त्यांनी मान्य केले. मात्र ते असेही म्हणाले की, ' १९५६ साली मला यशवंतरावांनी मुंबईत मंत्री केले त्या वेळी तेव्हाच्या हैद्राबाद काँग्रेसचा मी सरचिटणीस होतो आणि तरीही मी येथे केवळ ' उपमंत्री ' म्हणून आलो. यशवंतराव आम्हाला मोठे केल्याची भाषा करतात; परंतु त्यांना मुख्य मंत्रीपद मिळवून देण्यात मराठवाड्याचा फार मोठा हातभार लागला हे ते विसरतात; परंतु आम्ही त्यांना या उपकाराची कधी जाणीव करून दिली नाही. तशी आम्ही कधी भाषाही केली नाही. '

यशवंतरावांच्या एकंदर वृत्तीबद्दलसुद्धा शंकररावांची कटू मते आहेत. ' या माणसाला ध्येयवादाचे फारसे सोयर-सुतक नाही. आपल्य

सोयीची भूमिका घ्यायची. त्याग वगैरे गोष्टीचा त्याच्याशी संबंध नाही. जो यांना. दावणीला बांधील त्यांच्याबरोबर हे राहणार आणि जो निष्ठा दाखवील, त्याला मात्र खाली दाबणार ही याची वृत्ती ! '

' १९६२ सालापासून भारतीय राजकारणात वरच्या पदावर असूनसुद्धा यशवंतराव 'अखिल भारतीय' नेते बनू शकले नाहीत, हे कसे काय ? ' – मी.

**शंकरराव :** अखिल भारतीय नेता होण्यासाठी काही गुण असावे लागतात ते यशवंतरावांत नाहीत ! राष्ट्रीय नेत्याला जो विशाल दृष्टिकोन लागतो तो चव्हाणांकडे नाही. त्यांनी स्वत.ला महाराष्ट्राचे नेते मानून घेण्यातच धन्यता मानली. साहजिकच त्यांना त्यामुळे राष्ट्रीय पातळीवर कुणीच मान्यता दिली नाही. दुसरी गोष्ट निष्ठेची ! देशाचे राजकारण करायचे तर निश्चित निष्ठा असाव्या लागतात. यशवंतरावांवर कुणाचाच विश्वास नाही. त्यांनी अनेकांना आश्वासने दिली आणि ऐनवेळी पाठ फिरविली. बाबू जगजीवनराम यांनी तर तसे स्पष्टपणे म्हटले सुद्धा होते. १९६९ साली त्यांनी मोरारजी, निजलिंगप्पा यांनासुद्धा आश्वासने दिली होती. त्याच्या बदलात मोरारजीनीसुद्धा यशवतरावांना आश्वासने दिली. चव्हाण त्याच दिशेने चालले होते; परतु आम्ही त्यांना सांगितले की, ' तुमच्या या धोरणाचा फार विपरीत परिणाम घडेल ! ' तेव्हा पाटकर हॉलमध्ये भरलेल्या सभेत ऐनवेळी यशवंतरावानी आपली भूमिका बदलली.

' यशवतराव दिल्लीला गेले ते महाराष्ट्राचे नेते म्हणून, महाराष्ट्राचे प्रतिनिधी म्हणून. त्यानी या राज्याची प्रतिमा उजळण्याचा किती प्रयत्न केला ? त्यात ते कितपत यशस्वी झाले ? ' शंकररावाचे या प्रश्नाला उत्तर पूर्णपणे नाकरार्थी होते. ' संरक्षणमंत्री असताना महाराष्ट्रात शस्त्रास्त्र-कारखाने उभारण्याच्या कामगिरीखेरीज त्यांच्या दिल्लीत असण्याने महाराष्ट्राचा काहीही फायदा झाला नाही. प्रतिमा उजळण्याच्या बाबतीत म्हणाल तर भारताच्या इतर भागातील लोकांच्या, विशेषतः उत्तर भारतीयांच्या महाराष्ट्रीयाबद्दल काही शंका आहेत, त्या यशवंतरावांनी आपल्या वागणुकीने 'कन्फर्म' केल्या. ' मराठी माणूस विश्वास ठेवण्याच्या लायकीचा नाही! ' अशी सर्व भारतात समजूत आहे ही गैरसमजूत दूर करण्याचा यशवतरावानी प्रयत्न केलाच नाही ! '

यशवतरावांच्या राजकीय भवितव्याची चिकित्सा करताना शकरराव म्हणाले की, ' सध्या कॉंग्रेसमध्ये चमत्कारिक परिस्थिती आहे. इंदिरा गाधी पुन्हा नेतेपदी येतील, असे वाटत नाही. त्यांच्याशिवाय दुसरा राष्ट्रीय नेताही कॉंग्रेसमध्ये नाही, ही परिस्थिती यशवंतरावांच्या दृष्टीने फार चागली सधी आहे; पण हे फार कठीण आव्हान आहे. चव्हाण म्हणाल्याप्रमाणे जर खरोखरीच आक्रमक बनले आणि त्यानी निश्चितपणे पुरोगामी पावले टाकून दाखविली तर लोक त्यांच्यावरोबर येतील; परंतु त्याकरिता कृती मात्र निश्चितच हवी ! नुसत्या भाषणबाजीने लोक आता फसणार नाहीत यशवतरावांनी हे आव्हान स्वीकारले तर त्याना उज्ज्वल भविष्यकाळ आहे; परंतु त्याचा आतापर्यंतचा इतिहास पहाता ते आक्रमक बनतील हे सांगणेच कठीण आहे ! '

□

## सहानुभूती

माणूस प्रतिनिधी शिरीष सहस्रबुद्धे व संजीव मंगरूळकर मराठवाड्याच्या दौऱ्यावर असताना त्याना आढळून आले–

शंकररावांबद्दल मराठवाड्यात अजूनही खूप सहानुभूती आहे हें नक्की. सामान्य जनतेत तर नक्कीच आहे ! ज्या पद्धतीनं त्यांना मुख्य मत्रिपदावरून हुसकविण्यात आले त्याबद्दलही असतोष आहे. त्याच्या कॉंग्रेसत्यागाबद्दल सूक्ष्म नापसती व्यक्त करणारी मंडळीही त्यांच्या नेतृत्वाच्या शोकांतिकेबद्दल आणि त्याच्यानंतर मराठवाड्याला नेता उरला नसल्याबद्दल हळहळताना दिसतात. त्यांचा तडफदारपणा, कणखर प्रशासकीय गुणवत्ता, भ्रष्टाचाररहित कारभार, निःपक्षपातीपणा याची तोड भरून स्तुती केली जाते. आपल्या नातेवाइकांना आणि चमच्यांना ( ' अशा माणसाला आधी चमचे मिळणारच कुठून ?' ) सत्ता–पैशाची खिरापत त्यानी वाटली नाही. त्याचे दोघे भाऊ अजूनही सामान्य अवस्थेत नोकऱ्या करून राहताहेत, याचा आवर्जून उल्लेख केला जातो. त्यांच्या स्वत.च्या नावावर भ्रष्टाचाराची एकही शंकासुद्धा नमूद नाही असं बजावलं जातं.

फक्त दोनच मुद्द्यावर मंडळी गप्प बसतात. एक : शंकररावांचा आणीबाणी राबविण्यातला अवाजवी उत्साह आणि दोन : आत्ताच्या लोकसभा-निवडणुकीतं त्यांनी केलेले तिकिट-वाटप !

*

# या टोपीखाली दडलंय काय? या मुगुटाखाली लपलंय काय?

विलास ढाणे
नरेंद्र दाभोलकर

(साताऱ्याच्या समाजवादी युवक दलाच्या विलास ढाणे यांच्या नेतृत्वाखाली सकट, माने, चव्हाण, खरात, पवार यांनी साताऱ्याच्या पंचक्रोशीची केलेली पाहणी)

मतलबीपणात यशवंतराव चव्हाणांचा हात धरणारा दुसरा माणूस नसेल! प्रेम, आपुलकी, उमाळा, जिव्हाळा याचे हुकमी गहिवर त्यांना येत असतात. या साऱ्यामागचा असली चेहरा दाखविण्यासाठी ज्या वेळी मुखवटे टरकवण्याचे आणि रंग खरवडण्याचे काम चालू होते त्या वेळी हा नाटकीपणा बुद्धिभेदाचा आश्रय घेतो. कधी पांढरपेशा विरुद्ध बहुजनसमाज, कधी संघटित विरुद्ध असंघटित, कधी शहरी नेतृत्व विरुद्ध ग्रामीण नेतृत्व अशा वावटळी उडविल्या जातात. उसने औदार्य संपते. मग कधी विचारवंतांची टवाळी उडविणे, कलावंतांना विदूषक म्हणणे, स्वत: आक्रमक ( ? ) बनण्याची न भूतो न भविष्यति अशी गर्जना करणे चालू होते. अश्राप जनतेच्या अश्रूंच्या भांडवलावर राजकारण साधले जाते. हरिजनांच्या, दलितांच्या जळत्या वेदनेच्या होळीवर स्वत:च्या स्वार्थाची पोळी भाजली जाते.

यशवंतनीतीतील नागव्या जीवघेण्या सत्याला सामोरे जाण्यासाठी, आकडेवारी, वादविवाद, व्याख्याने, लेख या साऱ्या व्यर्थ ठरणाऱ्या खटाटोपांपेक्षा एक वेगळा मार्ग आम्ही हुडकला. साताऱ्याच्या पंचक्रोशीतील नऊ, दहा गावे निवडली आणि तिथल्या वस्तुस्थितीचा आरसाच समोर धरायचा ठरविले. त्याची ही झलक. मती गुंग करून टाकणारी! गेली तीस वर्षे जिल्ह्यातल्या साऱ्या ग्रामपंचायतीपासून तहत दिल्लीपर्यंतची सत्ता सातारा जिल्ह्याच्या यशवंती नेतृत्वाकडे राहिली. भूमी मुळात सुपीक; छत्रपती शिवरायाच्या गादीचा वारसा लाभलेली, भाऊराव पाटलांच्या शैक्षणिक चळवळीने पोसलेली. अनेक वेळा जिल्ह्याचे तीन तीन मंत्री, राज्यमंत्री. लोकनेते बाळासाहेब देसाईसारखे पोलादी पुरुष आणि काँग्रेसी मार्क्सवादाचे उद्गाते यशवंतराव मोहिते याच जिल्ह्यातले. सहकारी सोसायटीपासून साखर कारखान्यापर्यंतची, कंझुमर्स सोसायटीपासून जिल्हा मध्यवर्ती बँकेपर्यंतची सगळी सत्ता पांढऱ्या टोपीतच एकवटलेली!

या टोपीखाली दडलंय काय?
या मुगुटाखाली लपलंय काय?

## जकातवाडी

गावच्या पूर्वेला गोसावी समाजाच्या सात झोपड्या; सहा मोकळ्या पडलेल्या. एका झोपडीत चेहऱ्यावरची प्रत्येक सुरकुती मोजता येईल असा सत्तरीचा उंबरा ओलांडलेला सीताराम रावजी काळे. सोबत फक्त नातवंडे! 'काय हाय अप्पा' आपल्या क्षीण झालेल्या आवाजात तो सांगत होता. 'सारी हयात पालात राहून गेली. भावकीला ही जागा मिळाली, तवा सगळी लई हारकली. पोट मारून हौसेनं सात जणांच्या सात झोपड्या उभारल्या. पाण्यासाठी डबरं खादलं; पण घरात न्हायचं नशिबात नाय बगा पोट जळतंया, इथं न्हावून काय खायचं, माती! आमची जात भटकी, हिंडल्याशिवाय खळगी भरावी कशी? चार जण चार दिशाला गेली. मी तेवढा न्हायलोय. खेकडं-मासं धरून पोट भरतूय; पण ते बी आता होत न्हाय!

चांभारवाडा - गावाबाहेर, दक्षिणेला ओढ्याच्या पलीकडे. घरं नऊ-दहा, घरं टोलेजंग; पण वस्तीत पंचायतीचा दिवा सोडाच पण खांबही नाही! बऱ्याच दूरवर असलेल्या खांबावरून, दयानंद कांबळेच्या घरावरून फ्लेक्झिबल वायर घेतलेली. वायर वाऱ्याने पावसाने छपराच्या पत्र्याला चिकटते. पत्र्यातून वीज खेळण्याची शक्यता. त्यामुळे सतत भीती, पण पंचायतीकडे खांब मागून डाफरून घेण्यापेक्षा ही भीती परवडली. पंचायतीत अस्पृश्यांचा एकही पंच नाही. वस्तीच्या पाणवठ्याच्या बाजूने स्पृश्य समाज प्रातर्विधी उरकतो. लाज गुंडाळून बायका पाणी भरायला जातात; पण हागंदारी बदलायला सांगायचं धाडस कोण करणार? सार्वजनिक विहिरीवर पाणी भरायची इच्छा असूनही धाडस होत नाही. कारण भलतेच तिरपागडे! 'चांभार समाजाला जमीन भरपूर. शेतमजूर सगळा स्पृश्य!' रामचंद्र कांबळेनी सांगितलं, 'जर आमी पाणी भरायचं धाडस केलं तर कोणीसुद्धा आमच्याकडे कामाला येणार नाही! तीन मैल चालून सातारला जातील. तिथं रगड कामं मिळतात. मजूर मिळाला नाही तर आम्ही शेती कशी करायची?' शेतमजूर मालकाला पाणी वाढतोय, वेगळ्या पंगतीला बसवतोय. असं उलटं चित्र या गावात!

## शहापूर

गावच्या पाटलाच्या भाऊबंदांची गाठ पडली. गावात पाणवठा करण्याबद्दल त्यांचं मत विचारलं, पण यावर मत द्यायला कोणी तयार होईना. आम्ही पिच्छा सोडीत नाही म्हणताना आढेवेढे घेत ते कसे तरी बोलते झाले. 'त्याचं काय हाय, आमच्या मताचा कायबी उपयोग नाय. आता लोकशाही आलीया. बहुमतानं ठरवायला पाहिजे सगळं. गाव ठरवील काय करायचं ते!' दुसऱ्या इसमानं याला पुस्ती जोडली मागं एकदा

ह्यो विषय निघालावता तवा गावातल्या आडावर म्हारांनी पाण्याला येऊ नये म्हणून एकमतानं ठरलंवत.

लोकशाही कशी खेडोपाडी पोहोचलीय. रोमारोमात भिनलेली अस्पृश्यता टिकविण्या-साठी लढविलेली शक्कल मात्र नामी आहे एवढं खरं. पाटलांनी अक्कल लढवून लोकं-शाहीचा आधार घेतला; पण गावात अस्पृश्यांची वस्ती जवळजवळ गावाच्या निम्मी आहे. तरीही पचायतीत अस्पृश्यांचे राखीव जागावर निवडून आलेले तेवढे दोनच पच! लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देणारी भलती लोकशाही नाही परवडत.

अस्पृश्य वस्तीतून खूप फिरलो. बऱ्याच बायका–पुरुषाना भेटलो. उत्तरं एकाच छापाची! 'जुनं तसलं आता कुणीसुद्धा पाळत नाही, अगदी आबाद्दीआबाद हाय!' खूप प्रयत्न करून पाहिला; पण उत्तरं एकच! जणू साच्यातून काढलेली. हमखास उपयोगी येणारं नेहमीचं पान टाकलं. 'आम्ही आप-ल्याच समाजातले आहोत!' सटकने त्याचं नाव–गाव सांगितलं, खरातनंही सागितल; पण गाव अलबेलच राहीलं. एखादं गाव असतं समंजस म्हणून थोड्या समाधानी मनानं उपळीची वाट धरली.

दुथडी भरून खळाळणारी उरमोडी जीव मुठीत धरून ओलांडली. हुशहुश करून वाळवंटात बैठक मारली. तिथच जेवायला बसलो. नदीकाठाला एकजण गवत कापत होता त्याला जेवायला बोलावलं. आम्ही सगळे एकत्रच बसलो होतो. त्याच्यासाठी जागा केली; पण आमच्या पुढे जेवायला बसायला तो तयार नव्हता. 'वाढून द्या' म्हणून धोत-राचा पदर पसरला, पण आम्ही आमचा हट्ट कडेला नेला. त्याच्या चेहऱ्यावर तेवढ्यानं समाधान फुललं. ओळख झाली. त्याचं नाव अतु सकट शहापूरच्या मांगवस्तीतला एवढी जवळीक पुरेशी होती. हळूच खडा टाकला. 'का रे, तुमच्या गावात तर जाती-यता पाळत नाहीत आणि तू वाढून का मागत होतास?' अंतू एकदम उखडलाच! 'कोण म्हणतो साला?...' अतूनं शहापुरा-तली सगळी दादागिरी एका दमात ऐकवली. ह्या अन्यायाचा पाढा ग्रामीण भागात डोळस-पणे फिरणाऱ्याला पाठ असतोच; पण बे, एके बे म्हटल्यावर चुकल्याचुकल्यासारखं वाटत होतं ते मन शांत झालं; पण निर्जन वाळवंटात बोलकी झालेली ही व्यथा गाव-कचाटयात बंद आहे ही रुखरुख राहिलीच.

## उपळी

गावात सर्व्हे नं. ११ व १४ ही महार-वतनी जमीन आहे. लक्ष्मण सावळा जोशी याची कुळ म्हणून नोद झाली होती. लक्ष्मण सावळा १९६३ मध्ये मेला कधी नव्हे ती सरकारी यंत्रणा तत्परतेने हालली वारस म्हणून नाव लावण्यासाठी जयसिंग लक्ष्मण जोशी याने २२–७–६३ ला अर्ज केला; पण कुलकर्णी–तलाठी याने तत्पूर्वीच २५–४ ला वारसाची नोंद केलेली होती. १९६३ मध्ये श्री. शकर जोती गंगावणे यानी स्वतः पैसे भरून जमीन रिग्रँट केली व जयसिंगकडे जमिनीचा तावा मागितला. त्याने कब्जा तर दिला नाहीच पण खंड देणेही बंद केले! हणमंत पाटलाची त्याला साथ मिळाली. जोशी पाटलांच्या विरोधात अस्पृश्यांची ताकद दुबळी होती शेवटी १९६७ मध्ये शंकर जोती महार (अजूनही सरकारी दप्तरात जातीवाचक आडनावेच आहेत) आणि त्यांचे आठ भाऊबंद यांनी टेनन्सी कोर्टात कब्जा मिळावा म्हणून अर्ज केला. मामलेदार शेख यांनी ३२ (ओ) प्रमाणे गंगावणे यांना कब्जा द्यावा म्हणून निकाल दिला; पण काय झाले कुणास ठाऊक. हीच केस पुन्हा याच कोर्टात प्रथमपासून चालविली आणि निकाल गंगावणे यांच्या विरोधी गेला. १९७३ मध्ये यावर अपील केले. त्याचा निकाल ३२ (ओ) प्रमाणे पुन्हा गंगावणे यांचेसारखा लागला. तरीही जयसिंग जोशी याने कब्जा दिला नाही. आता १०–५–७७ रोजी हीच केस पुन्हा चौकशीसाठी टेनन्सी कोर्टात तिसऱ्यादा दाखल झाली आहे. एकच केस, एकाच कोर्टात दहा वर्षांत तीनदा चाल-ल्याचा हा अजब किस्सा आहे. हे जोशी पाटलांनी कसं जमवलं ते अज्ञात आहे.

## करंडा

या गावात एकजात सगळे प्रश्न नुसते खदखदत आहेत. गावचा आडमुठेपणा त्याच तोलामोलाचा आहे. शेतमजुराला अगदी मातीकाम असलं तरी जास्तीत जास्त २॥ रुपये मिळतात. दोन वर्षांपूर्वी दोघांनी विहिरीच्या कामावर तीन रुपये दिले होते. तेव्हा चावडीवर बोलावून त्याना तंबी दिली होती. 'लई पैसा झाला वाटत, वाळीत टाकल्यावर किती दिवस पैसा पुरलं रं?' तरीही एकाने काम जड आहे म्हणून तीन रुपये देणे चालू ठेवलं. घडलं काय? गावान खरोखरीच त्याला वाळीत टाकला. नाक मुठीत धरून शरण आला. चावडीवर गावाची जाहीर माफी मागितली. आता गावात जादा मजुरी देण्याच्या फंदात कुणीसुद्धा पडत नाही! यावरून गावाच्या एकात्मतेची (!) कल्पना यावी. गावातल्या सवर्ण मराठा जमीनदाराची ही अवस्था झाली, मग दलिताचं काय होत असेल? दलितांचा पाणवठा गावाच्या ओढ्याच्या कडेला आहे. पाऊस पडला की ओढ्याला पाणी येते. ते दलिताच्या झऱ्यात शिरते, बरोबर वाहून आलेली विष्ठा घेऊनच! सगळी वस्ती तेच पाणी प्यायला वापरते. तो झरा दुरुस्त करावा असं पचायतीला वाटत नाही. पचायतीन दलिताचं काही चालत नाही. वस्तीतला आबा पेंटर पच आहे. वस्तीतलं काहीही गाऱ्हाणं त्याला सागितलं तरी त्याचे आपले कानावर हात असतात. तरीही गेली २० वर्षे तो बिनविरोध निवडून येत आहे. दर निवडणुकीला मोकाशी कंपनी सांगते, 'आबा पेंटर वस्तीतला उमेदवार' म्हणून! त्यांचा वट्ट असा आहे की दुसरं कुणी उभं राहत नाही. उपकाराचं उतराई व्हावं म्हणून आबा पेंटर मोकाशाविरुद्ध ब्र काढीत नाही!

ग्रामीण नेतृत्वाचा पुरोगामी वचक हा असा आहे!

या मोकाश्यांच्या घरात धुमसता अग्नी आहे तो वेगळाच! हे मोकाशी स्वतःला घरंदाज मराठे वगैरे काही तरी समजतात. स्त्री घराबाहेर पडली तर सगळ्या खान-दानाला बट्टा लागतो. गोषा गावात अतिशय कडक! उंबऱ्यावरचं माप ओलाडून आत आलेल्या स्त्रीनं गावातल्या रस्त्यावरून बाहेर पडायचं ते मेल्यावरच!

## आरं

चांभारवस्तीपासून बौद्ध वस्तीतला आड अर्ध्या फर्लांगावर आहे, तर गावातला चांगला अर्ध्या मैलावर! चांभार समाज बौद्धवस्ती-तल्या आडाच पाणी हक्कानं ओढून आणतो

ते फक्त भांडी घासायला, गुरांना पाजायला आणि स्वत:ला प्यायला मात्र अर्ध्या मैलावरील गावातल्या आडावरून दादा-बाबा करून वाहून घेऊन आणतो !

एक गाव एक पाणवठयाचा विषय काढला तेव्हा एक मुद्दा उपस्थित झाला. 'पंचायतीच्या आडावर पाणी भरायला मिळलं बी. तसा कायदाच हाय; पण उन्हाळयात सगळं गांव ज्यो आड वापरतो त्यो खाजगी हाय. सगळं गाव जरी त्यावर पाणी भरत असलं तरी *आम्हाला वाटून घ्यावं लागणार !* कायदा तिथं चालत नाय, त्याचं काय ?' (तीस वर्षातले ते पुरोगामी कायदे ! तो फुल्यांचा वारसा ! हरिजनांचा उमाळा ? कोठे बरे गेला ?)

## दर

मांगवस्ती-वस्तीच्या मधून एक बारकासा ओढा वाहतो. एकीकडे आडागळे दुसरीकडे भिंगारदिवे राहतात. दोन भावकीत काडीचं सख्य नाही. त्यामुळं फावलंय गावाचं. यांच्या झऱ्याचा वापर गाव सकाळी म्हशी येरड करून आल्यावर त्यांना पाणी पाजण्यासाठी होतो. (सकाळी सोडलेली म्हैस गावातील विष्ठा खाऊन येते त्याला येरड म्हणतात. त्यानतर तिला खूप तहान लागते.) म्हशीच्या तोंडाची विष्ठा पाण्यात पडते आणि ते पाणी ही मंडळी पितात; पण त्याना अटकाव करायला सुद्धा एक होत नाहीत ! त्यानी एक होऊ नये म्हणून गावातल्या पुढाऱ्यांचा प्रयत्न असतोच !

गावात कामं अपुरी. मजूर जास्त. त्यामुळे दुसऱ्यापेक्षा कमी पैश्यात यायला प्रत्येकजण तयार असतो. मग रात्री सांगायचं एका वस्तीतल्याला, सकाळी कमी पैशात घेऊन जायचं दुसऱ्याच वस्तीतल्याला. त्यामुळं दोन भावकीत तेढही वाढतेच. शिवाय मजुरी १-१।। रुपया दिली की भागतं. पुन्हा कामावरून शालेल्या मजुराला जास्ती दराने धान्य विकायला तयार ! अडलेले असतात विचारे, करतात -काय ! वस्तीतल्या म्हाताऱ्या आजीना याचं दुःख आहे व्यथा बोलकी आहे. 'मुलानू, धाराण कुणी केली असल तर बाबांनो, उपाशी मरणारान केलीय ! पण आमची मांगाची जात लई दाढ्या काकरागत! कधी एक व्हायची नाय ! कधी सुधारायची बी नाय !' प्रत्येकाच्याकडे म्हशी आहेत. दोन-तीन, काही जणाकडे पाच-सहा सुद्धा; पण दूध विकलं तर म्हशीच्या कासेला ढुंक होत असा पक्का समज वस्तीत आहे. त्यामुळे घरी खायला अन्न नाही अशी परिस्थिती असूनही शिल्लक दूध ब्राह्मणाला अभिषेकाला दे नाय तर गुरवाला नैवद्याला दे असं करून संपवतात आणि फाटक्या शरीराचे, फाटक्या कपडयाचे दलित शेतमजूर, म्हशीच्या कासेचा रोग टळला या खुषीत ग्रामीण नेतृत्व असं दुधातुपानं वाढवतात !

रंगूबाईची वाडी, पोगरवाडी करून परत उरमोडीच्या काठावर आलो.

*या भागात कारणपरत्वे उचललेल्या* किरकोळ रकमांसाठी छोटया शेतकऱ्यांच्या जमिनी गहाण पडलेल्या आहेत. शेतमजुरी करून कर्ज फिटणे शक्य नाही. जमिनी तोडी गहाण. त्यामुळे जमीन शेतकऱ्याच्या नावावर, पिढयान्पिढया खातो मात्र टग्या जमीनदार. पुन्हा सेलीग-स्लॅब याचा धक्का लागत नाही.

उरमोडीपलीकडे एकजात सगळया गावातून जास्तीत जास्त पुरुषाला २।। व बाईला १।। रुपया रोज मिळतो. कुटुंबात किमान माणसे पाच. कुटुंबाचं कमाल उत्पन्न रुपये चार. या चार रुपयाचीही खात्री नाही जवळ काम मिळेल, असं शहर नाही. त्यामुळे उरमोडीपलीकडील सर्व गावातील अस्पृश्य वस्तीतील बहुतेक पुरुष मंडळी मुंबईला गेलेली गावात वस्तीवर उरल्यात फक्त बायका आणि क्वचित ५-६ म्हातारे बायका भीतीग्रस्त त्यामुळे प्रत्येक वस्ती 'दबलेली' मुंबईला गेलेल्यांपैकी शेकडा नव्वद टक्के लोक हमाली करतात कामाच्या, रहायच्या, जेवायच्या कायम विवेचना. फूटपाथ हेच घर. वर्षातून कधी तरी एकदा जत्रेला घरी येणे. इतर वेळी खिशात चार पैसे राहिलेच तर मग स्वस्त दारू आणि स्वस्त हिरवी माडी हीच करमणूक. तेच जीवन. इकडे वर्षभर झुरणाऱ्या बायका. त्यांच्यावर रोखलेल्या नजरा. कळत न कळत त्याचाही तोल जाऊ लागलेला. सारेच चित्र गलबलून टाकणारे

उरमोडी ओलांडून अलीकडे आलो. अंबवड (खुर्द) करून मानेवाडीच्या शिवारात शिरलो आणि आठवणीनी उचल खल्ली.

समाजवादी युवक दलानेच ऑगस्ट १९७२ मध्ये इथे महाप्रयासाने 'एक पाणवठा केला होता. मोठी रणधुमाळी माजली होती. दलितावर बहिष्कार पडला होता. सगळीकडून त्यांची कोंडी केली होती. गाव कॉंग्रेसच. पुढारी त्यांच्या ऐकण्यातले. सगळे मिळून त्या वेळचे मंत्रिमहोदय दादासाहेब जगताप (यशवंतराव चव्हाण याचे झाडू) यांना भेटायला गेलो. तर त्यांनी अस्पृश्याना नसते उद्योग कुणी करायला सांगितले म्हणून ऐकवले आणि आम्हाला 'महात्मा फुल्यानी गुडघे टेकले, म. गांधीनी डोके टेकले, आता तुम्ही निघालात अस्पृश्यतानिवारण करायला' म्हणून वाटेला लावले डी. एस्. पी. ने सार्वजनिक शांततेस बाधा आणली म्हणून आम्हालाच अटक करण्याचा पवित्रा घेतला होता. सगळयानीच असहकार पुकारला होता, पण आमच्या सुदैवाने त्या वेळी आमचा नेट यशस्वी ठरला होता.

वस्तीत गेलो. ४ वर्षांपूर्वीची ओळख शाबूत होती. त्यामुळे सलामीच 'आपला प्रश्न कसा मस्त सुटला बघा' म्हणूनच झाली, मग आम्ही आपल्याच हातानं आपल थडगं खणलेलं बघितलं. या छोटयाश्या गावात आधीचे चार आड असताना वस्तीसाठी पंचायतीने आणखी एक सुंदर, दगडी बांधकामातील चिरेबंदी आड बांधलाय आणि जातिव्यवस्था कशी त्यात चिणून बसवलीय. वर पाटी लावली आहे 'अस्पृश्यांसाठी सार्वजनिक विहीर !' आता पोळलेले अस्पृश्य गावातल्या आडाकडे डोकावूनही पहात नाहीत. त्याची गरज नाही. दलितांनी बाटविलेला आड गावानं धुऊन पुसून विधिपूर्वक शुद्ध केलाय्.

प्रश्नाला बगल देण्याचं ग्रामीण नेतृत्वातील हे कसब बिनतोड आहे हे मान्य करावं लागेल. यावर्षी पहिली ते चौथीमधील अस्पृश्य विद्यार्थ्यांना कपडे आणि पुस्तके दोन्ही वाटण्यासाठी या गावाला ग्रँट मिळाली. देऊ देऊ म्हणत जून-जुलै निघून गेले. ऑगस्टमध्ये सांगितलं, ज्याना पुस्तकं पाहिजेत त्यांना कपडे नाहीत-ज्यांना कपडे पाहिजेत त्यांना पुस्तकं नाहीत. नंतर पॉलिसी ठरली, सगळयांना पुस्तकं वाटायची, कपडे नाही. सप्टेंबर उजाडला; पुस्तकं वाटायला सुरुवात झाली. मुद्दा ओघानं आला *ज्यानी पुस्तक घेतलेली आहेत त्याना नवीन* पुस्तकं देण्याची गरज नाही. आता सप्टेंबर मध्ये चौथीच्या आतला कोणता मुलगा पुस्तक घ्यायचा राहिला असेल ? एकंदरीत दलित विद्यार्थ्यांजवळ स्वत चीच पुस्तकं आहेत, अगाबर स्वत चेच कपडे आहेत आणि ग्रँटपण खर्ची पडलेली आहे. आता अस्पृश्यांनी या विरुद्ध आवाज उठवायचा ठरवलंय.

इतके कसबी ग्रामीण नेतृत्व उखडलं जातंय याचं दुःख यशवंतरावांना व्हायचं नाही तर मग कुणाला व्हायचं ?

अधिक काय लिहिणे ? बहुजन समाजाचे अगत्य असो द्यावे. □

भालेराव यांची मुलाखत : पृष्ठ ४ वरून

सामाजिक, राजकीय व आर्थिक संघटना वापरल्या. प्रगत व प्रस्थापित समाजघटकाचेच हितसंबंध जपले.

**प्रश्न** : यशवंतरावानी अलीकडेच घोषित केलेल्या आक्रमक पवित्र्याचा अन्वयार्थ कसा लावायचा ?

**उत्तर** : आक्रमक पवित्रा घेतील म्हणजे जातीयवाद आणखी माजवतील, दुसरं काय करणार ? याआधीच सर्व पातळ्यावरचे evil forces डिवचायला त्यांनी सुरुवात केली असणार अशी माझी खात्री आहे असा आक्रमक पवित्रा त्यांनी सामाजिक किंवा आर्थिक सुधारणांसाठी घेतला असता तर आम्ही केव्हाही त्याचं स्वागतच केले असतं, पण कुठलाही पुरोगामी सामाजिक, वैचारिक, आर्थिक वगैरे आशय त्याच्या या आक्रमणाला नाही ! मात्र अशा जातीयवादाला जागृत जनता आता फारसा थारा देईलसं वाटत नाही.

**प्रश्न** : त्यांच्या यापुढच्या राजकारणाविषयी काही पूर्वतर्क करता येईल ?

**उत्तर** : सध्याच्या अखिल भारतीय कांग्रेस पुढाऱ्यांत यशवंतरावच ज्येष्ठ दिसात. इंदिराजी पुन्हा सत्तेचं राजकारण करायला उतरल्या तर त्याना खरे प्रतिस्पर्धी फक्त हेच असतीलसं वाटत. ब्रह्मानद रेड्डी आहेत; पण त्यांना त्यांच्या प्रांतातही कुणी विचारीत नाही ! यशवंतराव मात्र आपला महाराष्ट्रातला base–पाया–नेहमी पक्का ठेवतात अर्थात तोही तात्त्विक नसतो, तर व्यवहारी चाकोरीतलाच, जातीय–आर्थिक–हितसंबंधी असा असतो; पण त्याच्या आधारावर, उद्या कांग्रेस पुन्हा सत्तेवर आली तर आपणच पंतप्रधान होऊ शकू असा त्याचा हिशेब असणार तेव्हा हा पाया पक्का ठेवण्यासाठी त्याची जास्त धडपड चालणार म्हणून हा आक्रमक पवित्रा, अतिरेकी विधानं, रामायण–महाभारताचे दाखले उत्तरेतनं सपलेली कांग्रेस कर्नाटक व आंध्रमध्ये फुटण्याच्या मार्गावर आहे. तेव्हा तिच्या अस्तित्वाचा सोक्षमोक्ष महाराष्ट्रातच येत्या निवडणुकीत लागायचाय् ! महाराष्ट्र हा कांग्रेसचा शेवटचा ऐतिहासिक बालेकिल्ला आहे. इथला बहुजनसमाज परंपरेने कांग्रेसमागेच असतो, याचा फायदा घेण्याचा प्रयत्न यशवंतराव करतील. आताच, कांग्रेसच्या अस्तित्वाचा प्रश्न हा प्रत्येक कांग्रेसजनाच्या वैयक्तिक अस्तित्वाचाच प्रश्न बनवायचा प्रयत्न ते करताहेत. तेही तात्त्विक कारणांसाठी नव्हे, कांग्रेसच्या सिद्धान्तासाठी नव्हे, तर त्या प्रत्येकाच्या आर्थिक, जातीय आणि राजकीय सुरक्षिततेसाठी. या सगळ्यातून कांग्रेस वाचली तर तिचे तारणहार म्हणून मिरवायला हे पुढे येतीलच. **न वाचली तर कुणी सांगावं, कदाचित आपण लोकशाहीवादी असल्याचा जाहीरनामा काढून ते जनता पक्षाशी राजकीय सोयरीक जमवायलाही पुढे येतील !** निदान माझा एक अंदाज तरी तसा आहे खरा. बरोबर ठरेल किंवा चुकीचासुद्धा; पण माझं हे मत मात्र ठाम आहे की यशवतराव खऱ्या अर्थानं democrat नव्हेत. आणीबाणीला गप्प बसून किंवा सक्रीयपणे पाठिंबा देणाऱ्या कुणालाही मी खरा लोकशाहीवादी म्हणणार नाही त्या अर्थाने यशवतरावही लोकशाहीचे शत्रूच आहेत !' ◻

जनसामान्यातील यशवंतरावांच्या नेतृत्वाबद्दलच्या प्रतिक्रिया आज अत्यंत कडवट आहेत. त्याची व पक्षाची लोकप्रियता झपाट्याने ओसरत आहे. उलट जनता पक्षाची लोकमानसातील प्रतिमा स्वच्छ आशादायक आहे. त्यामुळे येत्या निवडणुकीत कांग्रेसला व पर्यायाने 'यशवंत' नेतृत्वाला मराठवाड्यात काहीही भवितव्य नाही असा श्री. अनंतराव भालेराव यांचा तर्क आहे ◻


**चवदार तळे सत्याग्रह, मनुस्मृतिदहन या घटनांची सविस्तर माहिती**

# महाडचा मुक्तिसंग्राम

लेखक

**प्रा. रा. म. चिवलकर । प्रा. झुंबरलाल कांबळे**

किंमत वीस रुपये

**प्रस्तावना : प्रा. नरहर कुरुंदकर । पुरस्कार : श्री. भय्यासाहेब आंबेडकर**

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ । नागनाथ पाराजवळ । पुणे ३०

# ससेहोलपट झालेले निस्तेज नेतृत्व

शरद कृष्णन्

एखाद्या अर्धांग झालेल्या रुग्णासारखी जिची अवस्था झाली आहे, अशा मोडक्या–तोडक्या काँग्रेसचे नेतृत्व करायचे असेल तर सारे लक्ष येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकांवर केंद्रित केले पाहिजे, हे ओळखून यशवतरावानी मोर्चेबंदीस प्रारंभ केला आहे. मुंबईमध्ये काँग्रेस कार्यकर्त्यांचे जे शिबीर झाले त्यामध्ये बोलताना चव्हाण म्हणाले 'सभेला प्रतिसभा, मोर्चाला प्रतिमोर्चा आणि निदर्शनाना प्रतिनिदर्शनानी आम्ही उत्तर देऊ ! आणि आक्रमक धोरण स्वीकारून जनतापक्षाची विजयी वाटचाल रोखून धरू !'... चव्हाण बोलत होते, कार्यकर्ते ऐकत होते. अधूनमधून टाळयाही पडत होत्या; पण आक्रमक धोरण स्वीकारण्याच्या गोष्टी करणाऱ्या नेत्याला जे तेज लागते तेच हरवून बसलेल्या या नेत्यांच्या शब्दाची धार हरविल्याचे निश्चितपणे जाणवत होते आणि तरीही साहेब बोलत होते आणि त्यांच्याच वृत्तीचे काही निष्ठावन्त कार्यकर्ते डोलत होते ! सपूर्ण देशात तर सोडाच; परतु महाराष्ट्रातही यशवंतराव चव्हाण या नावामधील पहिली जादू राहिलेली नाही ! आणीबाणीपर्वामध्ये पूर्ण ससेहोलपट झालेले हे निस्तेज नेतृत्व पुन्हा तेजस्वी होऊ शकेल ? राष्ट्रीय पातळीवर त्यांचे मोल काय राहील ? समजा काँग्रेसला पुन्हा बरे दिवस आलेच तर चव्हाणांचे स्थान काय असेल ?... या साऱ्या प्रश्नाची उत्तरे शोधण्याच्या हेतूनेच चव्हाणावरील काही पुस्तके पुन्हा नव्या उत्साहाने चाळली. विशेषत. कुन्नी कृष्णन यांचे 'चव्हाण अँण्ड द ट्रबल्ड् डिकेड्' हे पुस्तक विशेष काळजीपूर्वक वाचले !

### थोडा पूर्वेतिहास....

नजरेखालून घातलेल्या पुस्तकांबद्दल,– विशेषत. भारतीय लेखकानी लिहिलेल्या पुस्तकाबद्दल–एक गोष्ट निश्चितपणे जाणवली ती ही की बहुतेक सर्व लेखकाचा सूर सत्तेवर असलेल्या आणि ही पुस्तके लिहिली गेली त्या वेळी सत्तेपासून वंचित होण्याची जराही शक्यता नसलेल्या एका सत्ताधिष्ठित नेत्याचा गुणगौरव करणारी आहेत. त्यामुळेच त्याच्या गुण-दोषावर चर्चा करण्याची जेव्हा वेळ आली त्या वेळी बहुतेकानी त्यांच्या गुणांवर अत्तराचे चार शितोडे उडविण्यापलीकडे जाऊन फारसे विश्लेषण केलेले दिसत नाही. साहेबावरील मराठी पुस्तके म्हणजे तर चक्क गौरवगाथाच असल्याने इतिहासामधील या सोनेरी पानाला नख लावून अंतरग पाहण्याच्या भरीस कोणी पडलेले नाही. चव्हाणांच्या राजकीय हालचालीमागील मनोभूमिकेचे विश्लेषण करताना डा. भ. कर्णिक लिहितात: १९४२ च्या चळवळीनतर चव्हाणानी स्वत चे भविष्य स्वतः घडविले; परंतु याच वेळेपासून नसते साहस करायचे नाही असे त्यांनी ठरविले आणि विचाराने, शब्दाने आणि कृतीने साहसी प्रवृत्तीपासून ते कटाक्षाने दूर राहिले. त्याच्या या दोषामुळे काही फायदे झाले हे खरे; पण सुरक्षित राजकारणाच्या याच भूमिकेमुळे त्याची इंदिरा गांधीच्या विचाराबरोबर आणि त्यांच्या चरणी वाहिलेल्या व्यक्तिगत निष्ठाबरोबर अशी घट्ट निरगाठ बसली की आता कपडा फाटून त्याच्या चिंध्या झाल्या तरी या गाठीची बोच कायम आहे यशवंतरावांच्या नेतृत्वाची भावी दिशा चाचपडून पाहताना त्याच्या भूतकाळावर धावती नजर टाकणे आवश्यक आहे. एका अत्यंत गरीब कुटुबामध्ये यशवतरावाचा जन्म झाला. तारीख– १२ मार्च १९१४. वयाच्या केवळ चौथ्या वर्षीच वडील वारले; पण त्यांच्या मातोश्री श्रीमती विठाबाई यानी आणि त्यांच्या बधूनी यशवंतरावांना जिद्दीने वाढविले. अत्यत प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्यानी आपले शिक्षण पूर्ण केले. अत्यंत बुद्धिवान विद्यार्थ्यांमध्ये त्याची गणना होत नसली तरी त्याच्या शालेय आणि महाविद्यालयीन जीवनामध्ये त्यानी एक हुशार विद्यार्थी म्हणून निश्चितच नाव मिळविले होते. केवळ अभ्यास हेच आपले क्षेत्र न मानता त्यानी प्रारंभापासूनच अन्य गोष्टीमध्येही भरपूर लक्ष घातलेले दिसते. प्रत्येक महत्त्वपूर्ण गोष्टीचा तपशीलवार विचार करून स्वत.चे मत बनविण्याची त्याची वृत्ती लहानपणापासून पहावयास मिळते. एक प्रसंग देण्यासारखा आहे– विद्यार्थिदशेमध्ये एका वक्तृत्वस्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी ते पुण्याला आले होते. भाड्यापुरते पैसेही त्यांच्याजवळ नव्हते; परंतु एका मित्राने त्यांना ट्रकमधून पुण्याला आणून सोडले. ज्या वक्तृत्वस्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी ते आले होते त्या स्पर्धेमध्ये वक्त्याला आयत्या वेळी आपल्या आवडीच्या विषयावर बोलण्याची मुभा होती. वेळ होता फक्त दहा मिनिटे. 'खेड्याची पुनर्रचना' हा विषय चव्हाणांनी निवडला. त्याचे निश्चित विचार आणि नेमक्या शब्दांमध्ये सुस्पष्टपणे व्यक्त करण्याची त्याची शैली यामुळे परीक्षक प्रभावित झाले. दहा मिनिटाच्या अवाक्यामध्ये त्याना आपले विवेचन पूर्ण करता आले नाही तेव्हा परीक्षकांमध्ये असलेल्या न. चि. केळकर यांनी त्याना आणखी

दहा मिनिटे वाढवून दिली. वक्ता म्हणून उभा राहात असलेल्या या तरुण मुलाला नियम मोडून दिलेली ही संधी म्हणजे एक विशेष कौतुकाची पाठीवरची थाप होती! या स्पर्धेमध्ये ते पहिल्या क्रमांकाने विजयी झाले आणि १५० रुपयाचे प्रथम पारितोषिक त्यांच्या वाट्याला आले!

वयाच्या केवळ सोळाव्या वर्षी ते विद्यार्थिदशेमध्ये असतानाच राजकीय चळवळीमध्ये ओढले गेले त्यांचे कार्य त्यांच्या जिल्ह्यापुरतेच मर्यादित असताना चव्हाण कॉंग्रेसमध्ये सहभागी झाले १९३२ साली काही पत्रके वाटल्याच्या आरोपावरून त्याना अटक झाली आणि दीड वर्षाची शिक्षा झाली. येरवडा तुरुंगामध्ये त्या वेळी अनेक राजबंदी होते. आचार्य भागवत, रावसाहेब पटवर्धन, एस्. एम्. जोशी यांचा सहवास त्याना मिळाला. चव्हाणांच्या राजकीय शिक्षणाला येरवडा जेलमध्ये प्रारंभ झाला भरपूर चर्चा आणि भरपूर वाचन करण्याची संधी मिळाली आणि वैचारिकदृष्ट्या अधिक परिपक्व होऊन चव्हाण बाहेर पडले. १९३४ साली मॅट्रिक होऊन त्यांनी राजाराम महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतला. असंख्य अडचणी असतानाही विलक्षण जिद्दीने त्यानी आपले शिक्षण पूर्ण केले. १९३८ साली ते पदवी घेऊन पुण्याला आले आणि विधिमहाविद्यालयामध्ये दाखल झाले खरे... परंतु त्यांचे सारे लक्ष राष्ट्रीय चळवळीवर आणि कॉंग्रेसच्या कार्यावर केंद्रित झाले होते. याच सुमारास मानवेंद्रनाथ रॉय याच्या तत्त्वज्ञानाकडे ते आकृष्ट झाले. रॉय याच्या नेतृत्वाखालील लीग ऑफ रॅडिकल कॉंग्रेसमन या घोषित कार्यक्रमाची सत्वर अमलबजावणी करण्याची मागणी करणाऱ्या गटाबरोबर चव्हाणाचे सूत जमले. १९३७ सालच्या निवडणुकाच्या वेळी त्यांची मानवेंद्रनाथ रॉय याच्याशी गाठ पडली. १९३८ साली तासगाव येथे रॉयिस्ट गटाची जी बैठक झाली त्या बैठकीलाही चव्हाण हजर होते. १९३८ साली तासगाव येथे चव्हाण यांनी रॉय यांची पुन्हा भेट घेतली. कॉंग्रेसमार्फत कोणत्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करावी याचा तपशील ठरला. कॉंग्रेसच्या त्या वेळच्या प्रस्थापित नेतृत्वाला आव्हान देण्याचा प्रयत्न रॉयवाद्याकडून होतो आहे असे वाटल्याने संघर्ष झाला. रॉयवादी बाहेर पडले तर पक्षनिष्ठ चव्हाणानी कॉंग्रेसबरोबर वाटचाल करण्याचे ठरविले. मूळचे रॉयवादी असा शिक्का मात्र त्यांच्या व्यक्तित्वावर उमटला. १९४२ च्या ८ ऑगस्ट रोजी 'भारत छोडो' ची हाक दिली गेली. चव्हाणही त्यात ओढले गेले. त्यानी भूमिगत राहून आपले काम चालू ठेवले. नाना पाटील, किसन वीर ही मंडळी त्यांची सहकारी होती. चळवळीची प्रखरता वाढू लागल्यावर तिने उग्र स्वरूप धारण केले. घातपातांना वाट मिळाली आणि प्रतिसरकार पत्रीसरकार म्हणून बदनाम झाले. या संदर्भात चव्हाण पुढे म्हणाले, 'प्रतिसरकारच्या हिंसक कृत्याना माझा पाठिंबा नव्हता.' परंतु एकदा चळवळीला रक्तरंजित स्वरूप आले म्हणजे हिंसेला मर्यादा राहात नाही. ४२ च्या चळवळपर्वातच त्यांचे लग्न झाले; परंतु पोलिसांची त्यांच्यावर सतत नजर असल्याने पत्नीशी संपर्क ठेवणेही त्याना शक्य झाले नाही. पोलिसानी त्यांच्या पत्नीलाच अटक केली! राजकारणाशी काहीही संपर्क नसलेल्या विवाहितेला पोलिस पकडतील असे चव्हाणांनाही वाटले नव्हते. याच वेळी त्यांच्या वडील भावाचे निधन झाले. त्यांचे दुसरे बंधू गणपतराव यानाही अटक झाली. वेणूताई तुरुंगातच आजारी पडल्या. त्यांचे दुखणे वाढल्याने त्यांची सुटका झाली आणि फलटणला त्या आपल्या वडिलांच्या घरी विश्रांतीसाठी गेल्या. पत्नीचे गैरसमज दूर करावेत, तिला दिलासा द्यावा म्हणून चव्हाण पत्नीला भेटायला गेले. त्यांचे काम झाले, परंतु दुसऱ्या दिवशी घर सोडण्यापूर्वीच त्याना अटक झाली. १९४३ साली त्याना दोन वर्षांची शिक्षा फर्माविण्यात आली. मध्येच त्यांना सोडण्यात आले आणि पुन्हा पकडण्यात आले. अखेरीस १९४६ सालच्या सार्वत्रिक निवडणुकापूर्वी काही महिने त्यांना सोडण्यात आले.

## स्वातंत्र्योत्तर काळातील वाटचाल

महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस समितीने उमेदवार म्हणून त्यांची निवड केली आणि प्रचंड बहुमताने चव्हाण निवडून आले. संघर्षाचा काळ संपला होता. ज्याची स्वप्ने पाहिली ते स्वातंत्र्य दारी आले होते आणि सातारा–कऱ्हाडला ज्यांची पाळमुळे घट्ट रुजली होती ते चव्हाण मुंबईला आमदार म्हणून आले होते. बाळासाहेब खेर राज्याचे मुख्यमंत्री झाले आणि त्यांनी चव्हाणांना पार्लमेन्टरी सेक्रेटरी करण्याचे ठरविले, परंतु तो निर्णय आकाराला येण्यापूर्वीच चव्हाणाची मोरारजीभाईंनी निवड केली आणि यशवंतरावजी गृहखात्यात दाखल झाले! यशवंतरावांच्या यशवंत स्पर्शाला यानंतरच प्रारंभ झाला. त्यांच्या जीवनाचा त्यातल्या त्यात अपरिचित भाग जरा विस्ताराने दिला आहे. पुढे चव्हाण मंत्री कसे झाले, भाऊसाहेब हिरे याच्यामुळे मुख्यमंत्री कसे झाले या गोष्टी सर्वज्ञात आहेत शेकापवाल्यांना त्यांनी कशी आयत्या वेळी टोपी घातली आणि महाराष्ट्र कॉंग्रेसमधील मातब्बर नेते बाहेर पडल्यावर ते मानाच्या पानावर कसे जाऊन बसले या गोष्टीही सर्वज्ञात आहेत. त्यांची संयुक्त महाराष्ट्र चळवळीमधील भूमिका चांगलीच वादग्रस्त ठरली, पण महाराष्ट्राचे स्वप्न साकार झाल्याने उदार मनाच्या म्हणा किंवा विसरभोळ्या म्हणा, जनतेने त्याना माफी करून टाकली. चव्हाणाचे तेज प्रतिदिनी वाढत गेले. पक्षसंघटना आणि शासन या दोन्हीवर त्यानी घट्ट पकड बसवली. महाराष्ट्र त्यांच्या पूर्ण मुठीत होता. आपल्या मनाप्रमाणे काम करण्यास त्यानी प्रारंभ केला होता. एक समर्थ मुख्यमंत्री म्हणून त्यांचा देशभर लौकिक झाला होता. जवाहरलालजींनी त्याना अत्यंत कठिण काळामध्ये संरक्षणमंत्रिपदाची धुरा सांभाळण्यासाठी बोलाविले. चव्हाणाच्या यशस्वी कामगिरीची ही फार मोठी पोच होती. ६२ साली चव्हाण दिल्लीत येऊन दाखल झाले आणि मराठी माणसाला उगीचच वाटू लागले, आज ना उद्या चव्हाण पंतप्रधान होणार! ६२ ते ७६ या काळखंडामध्ये त्यानी जवाहरलालजी, शास्त्रीजी आणि इंदिराजी अशा तीन पंतप्रधानाबरोबर काम केले इंदिराजींच्या मंत्रिमंडळामध्ये गृहमंत्री असेपर्यंत त्यांची शान टिकून होती. गृहमंत्री म्हणून त्यांनी बजावलेली कामगिरी खरोखरच समाधानकारक होती. त्यांच्या गृहमंत्रिपदाची कारकीर्द चांगली तेज:पुंज असताना निरनिराळ्या वृत्तपत्रांनी त्यांचा जो गौरव केला आहे त्याचा तपशील पाहिला तर चव्हाण त्या वेळेपर्यंत तरी सर्वोच्च पदी विराजमान होण्यास योग्य होते. राष्ट्रीय पातळीवरील नेता म्हणून त्यांची प्रतिमा तयार होत होती असे दिसते. चौदा–पंधरा वर्षे दिल्लीत राहूनही चव्हाणांचे तेज महाराष्ट्राबाहेर फाकले नाही असे म्हणणे त्यांच्यावर अन्याय करणारे आहे.

१९६७'साली चव्हाणांची कामगिरी डोळयात भरण्यासारखी होती आत्मविश्वास असलेला नेता आणि उत्तम ससदपटू म्हणून त्यांनी नाव मिळवले. आपल्या खात्याच्या मागण्यांच्या वेळी त्यांनी केलेले भाषण वाक्पटुत्वाचा उत्कृष्ट नमुना होता असे 'स्टेट्समन्' ने म्हटले होते. मद्रासच्या 'हिंदू' ने ६७ च्या २३ जुलै रोजी लिहिले– 'आपल्या राजकीय चातुर्याने चव्हाणानी लोकसभेवर प्रभाव पाडला. त्यांच्या पक्षाला चव्हाणांच्या योग्यतेच्या नेत्याची गरज आहे; परंतु त्यांचा वाढता प्रभाव पक्षातील अनेकामध्ये असूया निर्माण करतो.' इंडियन एक्सप्रेसने तर कमालच केली. लोकसभेच्या अधिवेशनाचे समालोचन करताना त्यांच्या प्रतिनिधीने 'लिहिले–परतणाऱ्या खासदारांच्या स्वप्नात गृहमंत्री आले तर आश्चर्य वाटू नये इतके वर्चस्व गृहमंत्र्यानी गेल्या अधिवेशनामध्ये प्रस्थापित केले होते. सर्वार्थाने हे अधिवेशन त्यांनीच गाजविले.' ६२ साली ते संरक्षणमंत्री म्हणून लोकसभे मध्ये आले त्या वेळी मवाळ आणि बुजरे होते. त्याचा आवाजही त्या वेळी लोकसभेमध्ये फारसा उमटत नसे; परंतु आज सरकारपक्षाचे एक उत्तम वक्ते म्हणून त्यांचेच नाव घ्यावे लागेल. लोकशाही यंत्रणा काम करत असताना चव्हाण पुरेसे तेजस्वी होते त्यांचे नाव अनेक वेळा व अनेकाकडून पतप्रधानपदासाठी घेतले गेले ते उगीच नव्हे! त्यांनी आपल्या व्यक्तित्वाचा ठसा निश्चितपणे उमटविला होता. राजकीय नेत्याला महत्त्वाकाक्षा असावीच लागते, तशीच ती चव्हाणानाही होती राजकीय महत्त्वाकाक्षा आणि राजकीय तत्त्वज्ञान यांचा मेळ त्यानी घातला. १९६७ सालापर्यंत सारे काही व्यवस्थित होते चव्हाणाच्या साखरपेरणीवर काही वेळा विरोधी नेते चिडत, त्यांचा उपहास करीत, परतु तरीही सरकार पक्षामधील एक अत्यत महत्वाचा नेता म्हणून त्यांना मानीतच असतः गोवधबदीवरून जो सत्याग्रह झाला त्या संदर्भात अनेकाना पकडण्यात आले. या सत्यग्रहीना गुन्हेगार कैद्यानी बेदम मारले. लगोलग त्याचे पडसाद लोकसभेमध्ये उमटले. नाथ पै म्हणाले, 'गृहमंत्री त्यांच्या नेहमीच्या तेजपुंज शैलीने सागतील, झाल्या प्रकाराने आम्ही व्यथित झालो आहोत.' आम्हा विरोधकांना अपेक्षा आहे की, त्यापेक्षाही ते आमच्याशी जास्त सहमत होतील. या दुःखामध्ये सहभागी होतील'

... आणि चव्हाणानी नेमके तेच केले. विरोधाचा कणा अर्थातच मोडला गेला.

चव्हाणांच्या यशस्वी कारकीर्दीला पहिला दणका रेड्डी–गिरी याच्यामध्ये झालेल्या निवडणुकीच्या वेळी बसला. त्या वेळी रेड्डी निवडून येणारच असा विश्वास त्याना वाटत होता. चव्हाणानी त्याची हुकमी मते रेड्डीच्या मागे उभी केली. तशी ही अंधारात घेतलेली उडी होती. चव्हाण फार सुरक्षित जागी राहून खेळतात असा आक्षेप घेणाऱ्याना, चव्हाणानी पत्करलेला धोका कमी का वाटतो? चव्हाणाची कारकीर्द अत्यत जवळून पाहणाऱ्या एका पत्रकार मित्राला हा प्रश्न मी विचारल्यावर तो म्हणाला, 'चव्हाणांनी रेड्डीना दिलेल्या पाठिंब्याचे मूल्यमापनही रेड्डीचा पराभव झाल्यानंतर त्यानी जे निर्णय घेतले त्याचा संदर्भ लक्षात घेऊनच केले जाते.' रेड्डीना पाठिंबा देण्याचे साहस चव्हाणानी केले खरे; परंतु त्याच्या अपयशाने ते इतके धास्तावले, की आता नवीन काही मिळाले नाही तरी चालेल, पण जे हातात आहे ते तरी सुटू नये यासाठी त्याचा धडपडाट सुरू झाला. मोरारजीभाईंच्या जागी जर चव्हाण असते आणि समजा त्याचे अर्थखाते बाईंनी काढून घेऊन त्यांना उपपंतप्रधानपदी राहण्याची विनंती केली असती तर चव्हाण कसे वागले असते? मला वाटते त्यांनी खाते गेल्यावरही उपपंतप्रधानपद सभाळले असते. मोरारजी महत्वाकांक्षी असले तरी स्वाभिमानी होते. चव्हाणांच्या स्वाभिमानाच्या कल्पना गनिमी काव्याने डाव खेळण्याच्या त्यांच्या वस्तीत गुरफटलेल्या होत्या. अन्यथा १९७० साली केलेला खातेबदल त्यांनी का मान्य करावा हे समजू शकत नाही. चव्हाणांना अर्थखाते देण्यामागे त्यांचे राजकीय अवमूलन करणे हे एकमेव उद्दिष्ट होते. मी माझ्या सहकाऱ्यापेक्षा फार फार उंच आहे आणि माझ्या मनात आणते ते मी करू शकते हे बाईंना सिद्ध करायचे होते आणि चव्हाण राजी झाले. चव्हाण मंत्रिपदी कायम राहिले खरे; परंतु त्याचे हसे झाले. त्याच वेळी काय वाटेल ते झाले तरी बाईंची साथ ते सोडणार नाहीत हे स्पष्ट झाले. त्याच्या अनेक चाहत्यांना, टीकाकाराना चव्हाणांनी खातेबदल स्वीकारणे मान्य झाले नाही. त्याच्यावर कडवट टीका झाली. त्याच्याकडे देण्यात आलेले अर्थखातेही कसे लुळेपांगळे करण्यात आले होते याचा तपशील पुरविण्यात आला. चव्हाण संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत उपहासाचा विषय झाले होते. ७० साली त्यानी अर्थमंत्रिपद स्वीकारले तेव्हा ते चेष्टेचा विषय झाले. ६७ साली असलेले त्याचे तेज लोपले आणि पाकिस्तानबरोबरील युद्ध आणि त्यानतर बागला देशाची निर्मिती झाल्यावर बाई इतकी मोठी झाली


## नवीन दाखल झालेली काही पुस्तके

१ सोनेरी स्वप्न भंगलेली–(कादबरी)–वि. स. खाडेकर रु. २५/–
२ अरेबियन नाईटस्–(५ वा भाग)–अनु गौरी शंकर रु. ५०/–
३ सोनाली–(पाळलेल्या सिंहिणीची खुमासदार कथा). डॉ वा. ग. पूर्णपात्रे रु. १५/–
४ अनादि मी! अनंत मी!–(एका स्थानबद्धाची कारागृहातील रोजनिशी)–रवींद्र भट रु १२/–
५ काहिली–(कादबरी)–जयश्री खिरे रु १२/–
६ यातनाघर–(तीन एकांकिका)–महेश एलकुंचवार रु ११-५०

ENGLISH

1 Two Faces of Indira Gandhi–(On Emergency)–Uma Vasudeo Rs. 30/–
2 All The Prime Minister's Men–(Inside Story of Emergency)–Janardan Thakur Rs. 30/–
3 After Nostradamus–(Blood Curdling prophecies of atomic war etc predicted by Nostradamus)–A. Woldben Rs. 12/–

● नॉन मेंबर्सकरिता डेली बेसिसवर पुस्तके वाचावयास मिळतात.

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७ सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०.

की चव्हाणानी आपल्या राजकीय महत्त्वाकांक्षेचे पंख छाटून टाकले. 'मला कोणतीही महत्त्वाकांक्षा उरलेली नाही. माझ्या आयुष्यामध्ये मला कॉंग्रेसने पुष्कळ दिले', यासारख्या उद्‌गारांनी ते जास्तच निस्तेज झाले. रेड्डी पराभूत झाल्यावर बाईंच्या मागे येताना आपण तत्त्वांची कास धरली असे त्यांना सांगता तरी येत होते; पण आणीबाणी-पर्वातील त्यांचे मौन म्हणजे अजब ससेहोलपट होती. आणीबाणी-मधील अत्याचाराबाबत केवळ बाईंच्या नावाने बोटे मोडण्यात किंवा चांडाळ-चौकडीच्याबाबत चविष्ट कथा चघळण्यात काय हाशील आहे? सत्तेची उबदार खुर्ची संभाळणारे चव्हाण या प्रकरणात कोठेही सापडू पाहात नाहीत; जणु काही आणीबाणीचा आणि त्यांचा काही संबंधच नाही असे ते वागतात आणि त्यांचे वागणे खपवूनही घेतले जाते! हे केवळ भारतातच शक्य आहे. आणीबाणीच्या काळात सत्तेवर राहून निवडणुकीच्या काळात इंदिराजींचा पाठपुरावा करूनही चव्हाण अजून उभे आहेत, कंबरडे मोडलेल्या कॉंग्रेसची पुनर्रचना करण्याची धडपड करीत आहेत हे खरे! पण या साऱ्या प्रकारात काहीही शान नाही, तत्त्वज्ञान नाही, महत्त्वाकांक्षाही नाही. हा राजकीय फरपटीचा प्रकार आहे. वसंतराव नाइकांना बाईंनी हुसकले, चव्हाण हात चोळीत बसले होते. आज दिल्ली पालटल्यावर, चव्हाणांनी बाईंनी मुंबईच्या गादीवर बसविलेल्या शंकरराव चव्हाणांचे वाजत-गाजत विसर्जन करविले. आता येऊ घातलेल्या निवडणुकांमध्ये कॉंग्रेसचे कंबरडे मोडण्यासाठी एस्. एम्. जोशी वाटेल त्याची साथ पकडण्यास तयार आहेत तर चव्हाण निदान महाराष्ट्राचा बालेकिल्ला पडू नये यासाठी आटापिटा करणार आहेत. पी. एल्. यांच्या 'तुझे आहे तुजपाशी' मधील आचार्यांची फरफट आणि सध्या चालू असलेली कॉंग्रेसची फरफट यामध्ये तसा फारसा फरक नाही प्रवाहात पडल्यावर किनारा पकडता येत नाही आणि पकडता आला तरी लोक पुन्हा आत लोटतात असाच हा प्रकार आहे नाही तर सांगा, आज ७७ साली चव्हाणांच्या राजकारणाचे यापेक्षा वेगळे असे काही वर्णन करता येईल का? स्वतः जोपासलेले तत्त्वज्ञान पायाखाली तुडवून त्यांनी बाईंना साथ दिली. पक्ष, राजकीय विचार यापेक्षा त्यांनी ज्या दिवशी बाईंना मोठी मानली त्याच दिवशी चव्हाणांचे राजकारण संपले बाईंच्या निवडणुकी-मधील पराभवापेक्षाही चव्हाणाची ससेहोलपट जास्त वाईट आहे. बाई निदान सरळ सरळ जुगार तरी खेळल्या. जिंकल्या असत्या तर विरोधकांच्या घरावरून नांगर फिरवीत हत्तीतून मिरवल्या असत्या! हरल्या आणि बाजूला फेकल्या गेल्या! चव्हाणांची अवस्था त्यापेक्षा वाईट झाली आहे!

## भवितव्य काय?

एका मुलाखतीमध्ये चव्हाणांना प्रश्न विचारला गेला होता. 'विरोधी पक्षाचा नेता तो पक्ष सत्ताधारी झाल्यास पंतप्रधान होतो ना?' चव्हाण म्हणाले, 'होय—तांत्रिकदृष्ट्या होतो.' आता इथे तांत्रिकदृष्ट्या असा शब्दप्रयोग करण्याचे काय कारण होते? या शब्दप्रयोगामागे असलेल्या दोन्ही शक्यता त्यांना संभवनीय वाटत होत्या. पहिली शक्यता— विरोधी पक्ष सत्तास्थानी जाण्याची शक्यता नजीकच्या काळात तरी नाही आणि समजा तो सत्तास्थानी गेलाच तर त्याचे नेतेपद आपल्याकडेच राहील याबाबत त्यांना जराही खात्री नाही. म्हणूनच त्यांनी उत्तर देताना 'तांत्रिकदृष्ट्या' हा शब्दप्रयोग केला असावा. आज चव्हाण विरोधी पक्षाचे नेते आहेत. त्यांचा पक्ष सत्तेवर येईल तेव्हा येईल; पण आज त्यांच्याकडे असलेले नेतृत्व तरी त्यांना पूर्ण पाच वर्षे संभाळता येईल की नाही हीही एक शंकाच आहे. आंध्र प्रदेश, तामिळनाडू आणि कर्नाटक येथून बहुसंख्य खासदार निवडून आले असताना, चव्हाण हवेत कशाला, असा प्रथम सूर होता आणि त्यांच्या निवडीबाबत ब्रह्मानंद रेड्डी नाराज होते; पण तरी चव्हाण विरोधी पक्षाचे का होईना पण एकदाचे नेते झाले आणि लोकसभेमध्ये नेते म्हणून बसू लागले. आता फेब्रुवारीच्या निवडणुका काय कौल देतात इकडे सगळ्यांच्या नजरा आहेत. महाराष्ट्रामध्ये आणि दक्षिणेतही कॉंग्रेस जर नाकारली गेली तर चव्हाण नेते असले काय किंवा नसले काय, त्यांच्या भवितव्याची आणि कॉंग्रेसच्या भवितव्याचीही चर्चा करण्याचे प्रयोजन नाही. केलीच तरी ती तात्त्विक आणि पुस्तकी स्वरूपाची राहाणार असून त्याला व्यावहारिक पातळीवर कोणताही अर्थ नाही. आज शरद पवार, यशवंतराव मोहिते आणि यशवंतराव चव्हाणही ज्या पातळीवर उतरले आहेत ती लक्षात घेता त्यानी आपली सर्व शक्ती पणाला लावून किल्ला लढविण्याचे ठरविलेले दिसते. कॉंग्रेस जर जगली, म्हणजे निदान या चारपैकी दोन राज्यात जरी सत्ता राखण्याइतपत बळ कॉंग्रेस टिकवू शकली, तर निदान लढण्याइतपत तरी उमेद उरल्यासुरल्या वफादार मंडळीमध्ये उरेल. महाराष्ट्रामध्ये कॉंग्रेस सत्तासंपादन करू शकली तर साहेब विरोधी पक्षनेते म्हणून सन्मानाने बसू तरी शकतील. तसे झाले नाही तर मात्र जरी नेतेपद त्यांच्याकडेच राहिले तरी पक्ष कार्यकर्त्यांना उत्साही आणि कार्यमग्न ठेवण्यासाठी जी शक्ती नेत्याजवळ लागते तीच हरवून बसल्याने या निस्तेज नेतृत्वाला पक्षबांधणीचे काम करणे जास्तच अवघड होऊन बसेल! आज तरी ससेहोलपट झालेले एक निस्तेज नेतृत्व असेच चव्हाणांचे चित्र उभे आहे. □

---

## करुणानिधींचे मत

चव्हाणानी दिल्लीला जाताना कन्नमवारांची निवड का केली?

एक तर परतीची वाट मोकळी असावी आणि दिल्लीत पाय रोवले गेले तर महाराष्ट्र मजबूतपणे मागे उभा रहावा' म्हणून चव्हाण दिल्लीत उभे राहिले. वेळ आल्यावर एखाददुसरा अपवाद वगळता महाराष्ट्रही त्यांच्या मागे उभा राहिला; पण त्यांचे दुर्दैव आड आले आणि पंतप्रधानपदावर नजर ठेवणाऱ्या साहेबाना गादीवर बसलेल्या पंतप्रधानांवर छत्रचामरे हालवीत बसण्याची वेळ आली!

मद्रास गमावून बसलेल्या करुणानिधीचे हे म्हणणे.

साहेबाच्या बाबतीत दुसरी संधी सभवत नाही असेही त्यांचे मत आहे. *

[ मुखपृष्ठ २ वरून .... ]


अखेरीस हेच खरे आहे की अन्य कोणी सांगून असली घट्ट धोरणे बदलतही नसतात. या धोरणांमुळे नफा किती व तोटा किती झाला याचे गणित अन्य मंडळींनी मांडण्यात अर्थ नसतो. या विषयीचा निर्णय ज्याचा त्यानेच घ्यावयाचा असतो.

हे सर्व खरे असले तरी राष्ट्रीयदृष्टया काय तोटा झाला, याची चिकित्सा करण्याचा अधिकार मात्र सर्वांनाच आहे. गेल्या अकरा वर्षांत यामुळे काय काय नुकसान झाले याचे मोजमाप, विशेषत: मराठी माणसाच्या दृष्टीने करण्याची हीच वेळ असल्याने हे सर्व सूत्ररूपाने, संक्षेपाने शब्दांकित केले आहे.

या संदर्भात एक लहानशी बाब पण ध्यानी घेण्याजोगी आहे. "चव्हाण व संत्रस्त दशक" ( Chavan & the Troubled Decade ) नावाचे एक पुस्तक काही वर्षांपूर्वी एका दक्षिण भारतीय पत्रकाराने लिहून पूर्ण केले. त्याचे मुखपृष्ठ पाहताच व शीर्षक वाचताच अन्य एका ज्येष्ठ पत्रकाराने अभिप्राय व्यक्त केला होता की 'चव्हाण व संत्रस्त मन' (Chavan & the Troubled Mind) असे शीर्षक अधिक शोभून दिसले असते !

राजधानीत राहून सर्व जवळून पाहणाऱ्यांचे हे अभिप्राय इतके बोलके आहेत की यावर अधिक मल्लीनाथी आवश्यक भासूच नये.

**– नारायण**
दिल्ली



# क्षमस्व

गेल्या अंकी या पृष्ठावर चालू कृष्णा–कोयना विशेषांक (२) ची किमत नेहमीची म्हणजे पंचाहत्तर पैसे राहील असे चुकीने छापले गेले.

या दोन्ही अंकांच्या किमती सारख्याच आहेत. कारण पृष्ठसंख्याही सारखीच आहे. ( ३२+४)

विक्रेत्यांनी–किरकोळ ग्राहकांनी कृपया नोंद घ्यावी.

–व्यवस्थापक